


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com | एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार २९ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




## अजिदादांच्या अपघाताला दोन महिने पूर्ण; सुनेत्रा पवारांची भावूक पोस्ट

# मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतलय

**बारामती / प्रतिनिधी-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान अपघातामध्ये दुर्देवी निधन झाले. आज त्यांच्या निधनाला दोन महिने पूर्ण होत आहेत. त्या निमित्त त्यांच्या आठवणीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर भावूक पोस्ट केली आहे.

त्या म्हणाल्या, आज तुम्हाला जाउन दोन महिने पूर्ण झाले. काळ पुढे सरकतोय, पण मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतून राहिले आहे. प्रत्येक क्षणी तुमची उणीव प्रकर्षाने जाणवते आणि त्याचवेळी दैनंदिन राजकीय व सामाजिक कामकाजात तुमचे अस्तित्वही जाणवत राहते. पुढे लिहिताना, 'तुमच्यातील लोकाभिमुख' विकासाभिमुख व्यक्तिमत्व, सर्वसामान्यांशी असलेली जिव्हाळ्याची नाळ, कामासाठीची झपाटलेली वृत्ती आणि प्रत्येक निर्णयामागची दूरदृष्टी हे सगळेच मला कायम मार्गदर्शन करण्याचे काम करतील. तुम्ही केवळ एक नेते नव्हता, तर असंख्य लोकांच्या आयुष्यात विश्वास, बळ आणि आशा निर्माण करणारे आधारस्तंभ होता. तुमच्यामुळे अनेकांना दिशा मिळाली, संधी मिळाली आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद मिळाली., असे देखील त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.



**पोकळी भरून निघणार नाही-**शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर चालणा-या आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराची वाटचाल तुमच्या प्रेरणेनेच अखंड सुरू आहे. लोककल्याणासाठी निर्णय घेताना या परिस्थितीत तुम्ही काय केले असते, हा विचार मनात ठेवून मी प्रत्येक पाउल उचलण्याचा प्रयत्न करते. तुमच्या अनुपस्थितीत निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही, ही जाणीव मनाला कायम टोचत राहते, असा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

**तुम्ही दिलेली मूल्ये हीच प्रेरणा**

तुमच्या अनुपस्थितीत निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही, ही जाणीव मनाला कायम टोचत राहते. पण तुम्ही दिलेली शिकवण, तुमचे विचार आणि तुमचा वारसा हेच आता पुढचा मार्ग उजळवणारे दीप आहेत. तुमच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण, प्रत्येक संवाद आणि प्रत्येक आठवण मनात कायमची कोरलेली आहे. तुमच्या शब्दांमधील ताकद मला उभे राहण्याची उर्जा देते. दादा, तुमची उणीव शब्दांत मांडणे अशक्य आहे. पण तुमची स्वप्ने, तुमचे कार्य आणि तुमचे विचार पुढे नेण्याचा निर्धार मी कायम मनाशी जपेन. तुम्ही दाखवलेली दिशा आणि दिलेली मूल्ये हीच आमची प्रेरणा आणि मार्गदर्शक राहतील.

# खरातकडे जाणारे ते 40 आमदार कोण?

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिकमधील भोंदूबाबा प्रकरणात अनेक राजकीय नेत्यांचा संबंध असल्याचा आरोप केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून या प्रकरणामुळे राजकीय वातावरण देखील चांगलेच तापले आहे. अशातच उबाठा गटाचे नेते खासदार संजय राउतांनी मोठी मागणी करत काही सवाल उपस्थित केले आहेत.नाशिकमधील भोंदू अशोक खरातला विमानांची सोय करून देणारे सरकारमधील 'ते' बडे नेते कोण? असा सवाल राउतांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. तसेच खरातकडे ४० आमदार जात असल्याचा दावा खुद्द दीपक केसरकर यांनीच केला आहे, त्यामुळे आता त्या ४० आमदारांची नावे जाहीर करण्यात यावीत, अशी मागणी संजय राउतांनी केली आहे.

खरात दिल्लीमध्ये जात कोणाला भेटत होता हे जर पोलिस तपासात निष्पन्न झाले असेल तर ते समोर आले पाहिजे. अशोक खरात याचा



संजय राउतांच्या सवालाने खळबळ

वावर सर्वत्र होता. सरकारने त्याला राजमान्यता दिली होती. ज्यांनी त्याला राजमान्यता दिली ते लोक फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात आजही आहेत, असा दावा संजय राउतांनी केला आहे.

फडणवीसांनी त्यावर बोलावे, असे देखील राउत म्हणाले आहेत.पुढे बोलताना संजय राउत म्हणाले, एखाद्या समाजाच्या मंदिरासाठी मंत्री जर वेगळी व्यवस्था करत असतील तर त्यावर आम्ही टीका करणार नाही. नरेंद्र मोदी यांनी जी चूक केली ती देवेंद्र फडणवीस यांनी करू नये. त्यांनी विरोधी पक्षातील नेत्यांना सोबत घेत यावर बैठक घ्यावी, विरोधी पक्षनेता नेमावा तरच टीम महाराष्ट्र तयार होईल, असेही राउत यावेळी बोलताना म्हणाले. अशोक खरातसोबत शिवसेना नेते मंत्री दीपक केसरकर यांचे फोटो व्हायरल झाले आहेत. त्यांच्यावर देखील विरोधकांनी आरोप केले आहेत. त्यामुळे या प्रकरणाला घेउन खरातला राजकीय नेत्यांचा वरदहस्त होता का? असा प्रश्न विचारला जात आहे. संजय राउतांनी माध्यमांशी ➪(पान २ वर)

# लॉकडाउनच्या अफवा पसरवणा-यांवर कारवाई

## देशात इंधनाचा तुटवडा नाही- देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** देशात आणि राज्यात इंधनाचा तुटवडा नाही, एलपीजी गॅस आणि पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्यामुळे ल?कडाउन लागण्याच्या अफवा जर कुणी पसरवत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. अशा अफवा पसरवून जर कुणी गोंधळाची स्थिती निर्माण करत असेल तर ते देशविरोधी काम आहे असंही फडणवीस म्हणाले.

आपल्या देशाच्या डिप्लोमॅटिक रिलेशनशीपमुळे, पंतप्रधानांच्या नीतीमुळे इंधनाचा तुटवडा निर्माण होणार नाही, त्याची काळजी घेतली जात आहे असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री म्हणाले की, 'शहरांमध्ये महानगरच्या माध्यमातून पीएनजी गॅस पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. याचं काम जलदगतीने सुरू आहे. त्यासंबंधी सरकारने एक आदेश काढलेला आहे. शहरांवरील एलपीजीचा लोड कमी करू न पीएनजीवर भर दिला जाणार आहे. पीएनजीमुळे



एलपीजीची भविष्यात समस्या किंवा अडचण येणार नाही. आजूबाजूच्या देशात लाकडाउन सुरू असताना आपल्या देशात मात्र त्यावर कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. जरी तेलाच्या किमती वाढल्या असल्या तरी त्याचा परिणाम सामान्य ग्राहकांवर पडू दिला नाही. एलपीजी गॅसचाही कुठेही तुटवडा नाही. देशात जर कुणी अफवा पसरवून गोंधळाची स्थिती निर्माण करत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लॉकडाउन होणार असल्याच्या ज्या अफवा पसरवल्या जात आहेत, त्यावर कारवाई केली जाणार आहे.' आखाती युद्धामुळे देशात इंधन तुटवड्याची झळ बसताना दिसत आहे. अनेक ठिकाणी गॅस खरेदीसाठी एजन्सीबाहेर रांगा लागल्याचं चित्र आहे. याच संदर्भात राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी मोठं वक्तव्य केलं. कदाचित पुढच्या तीन महिन्यात पीएनजीवर भर देउन एलपीजी गॅस पुरवठा बंद होईल असं मोठं वक्तव्य मंत्री छगन भुजबळांनी केलं आहे. केंद्राच्या पत्राचा हवाला देत भुजबळांनी ही माहिती दिली. येत्या काळात एलपीजी ऐवजी पीएनजीवर भर देण्यासाठी हालचाली सुरू आहेत.

# राज्यात एलपीजी गॅस, पेट्रोलसाठी रांगाच रांगा

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू झालले एलपीजी गॅस, पेट्रोलचे संकट काही संपता संपण्याचे नाव घेत नाही. राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर (२८ मार्च) आज रोजीही भल्या मोठ्या रांगा दिसल्या. मुंबई, पुण्यासह छत्रपती संभाजीनगरमध्ये तर दोन किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. तर



काही ठिकाणी तर थेट मारामा-या होतानाही दिसत आहेत. जालन्यातील पेट्रोल पंपावर एका टोळक्याने थेट पेट्रोल पंप कर्मचा-यांनाच बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. पेट्रोल दिले नाही म्हणून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑटो एलपीजी गॅससाठी दोन किलोमीटरच्या रांगा लागल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या पैठण रस्त्यावरील नक्षत्रवाडी पंपावर ऑटो चालकांची मोठी गर्दी झाली आहे. पहाटे ५ वाजल्यापासूनच ऑटोरिक्षा चालक पंपावर गॅसच्या प्रतीक्षेत रांगेत उभे आहेत. एका दिवसात गॅसचे दर १० रु पयांनी वाढल्याने आता ऑटो एलपीजी गॅस १०० रु पये प्रति लिटरवर गेला आहे. २० दिवसांत ऑटो एलपीजी गॅसचे दर तब्बल ४९ रु पयांनी वाढले आहेत. पहाटे ४ वाजल्यापासून ऑटोरिक्षा चालक पंपासमोर रांगेत उभे आहेत. तर काही रिक्षाचालक ➪(पान २ वर)

# एलपीजी गॅसचा पुरवठा बंद होउ शकतो

**मुंबई/प्रतिनिधी :** आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह देशभरात गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. अशातच आता राज्याचे अन्न न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सामान्य लोकांची चिंता वाढवणारे एक वक्तव्य केले आहे. तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी गॅसचा पुरवठा बंद होउ शकतो, असे संकेत छगन भुजबळ यांनी दिले. ते शनिवारी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी भुजबळ यांनी एलपीजी गॅसचा पुरवठा बंद करण्याबाबतच्या केंद्र सरकारच्या पत्रकाचा उल्लेख करत राज्यातील पीएनजी गॅसच्या जोडण्या वाढवण्याची गरज व्यक्त केली.

देशातील निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल? यामध्ये कोणत्या अडचणी आहेत, याचा आढावा घेण्यासाठी आज दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलवण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर, पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी, प्रल्हाद जोशी हे केंद्रीय मंत्री होते. प्रत्येक राज्याचे मंत्री आणि सेक्रेटरींनी या बैठकीत काही सूचना केल्या. आपण केंद्र सरकारला सांगितले की, पीएनजी गॅस (Pipe Gas) सध्या स्वस्त पडत आहे. त्याचा जास्तीत जास्त उपयोग झाला पाहिजे. त्याचा जास्त प्रसार झाला पाहिजे. केंद्र सरकारच्या एका पत्रकात तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल, असा उल्लेख होता. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या करुन घेतल्या पाहिजेत. जिथे जिथे यासंदर्भात काम करणे शक्य आहे तिथे सुरु केले पाहिजे. सगळ्या नगरपालिकांनी पीएनजीच्या जोडण्या वाढवल्या पाहिजे. पाण्याचं आणि वीजेचं कनेक्शन



असल्यावरच इमारतींना ओसी दिला जातो, त्याप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनच्या सक्तीची अट टाकली पाहिजे, असे छगन भुजबळ यांनी म्हटले.

घक्र जोडण्या लवकर करायच्या आहेत. पाइपलाइन टाकण्यासाठी विविध विभागांत परवानग्या मागितल्या जातात. घक्र साठीची परवानगी मिळाली, असे समजावे. या परवानग्या २४ तासांत दिल्या जातील. पीएनजी काम करणा-यांना २४ तास परवानगी राहील, असेही छगन भुजबळ यांनी म्हटले.

राज्यात आपल्याकडे केरोसीन उपलब्ध असताना आपण ते देउ शकत नव्हतो. कारण उच्च न्यायालयाने त्यावेळी एक आदेश दिला होता. आता आपण न्यायालयाला कळवले आहे. साडेतीन हजार लिटर केरोसीन राज्यात उपलब्ध आहे. जिथे LPG, PNG कमी आहेत त्यांना केरोसीन वापरण्यासाठी परवानगी दिली आहे.

# हुथी-हिजबुल्लाहच्या एन्ट्रीने जगावर अणुयुद्धाचे संकट

## मध्य पूर्वेतील युद्ध आणखी भडकणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध आता एका महिन्यांनंतर अत्यंत भीषण वळणावर पोहोचले आहे. इराणच्या अण्वस्त्र केंद्रांवर झालेले हल्ले आणि इराणने दिलेले प्रत्युत्तर यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती निर्माण झाली आहे. या युद्धात आता येमेनमधील 'हुथी' बंडखोर आणि लेबनॉनमधील 'हिज्बुल्ला' या दोन्ही संघटनांनी उडी घेतल्याने मध्य-पूर्वेतील वातावरण अधिकच तापले आहे. **अण्वस्त्र युद्धाचा धोका वाढला?-**इराणमधील धार्मिक नेत्यांकडून आता अण्वस्त्रे बनवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. इराणने आधीच अण्वस्त्र निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या युरेनियमच्या संवर्धनाची पातळी वाढवली आहे. याच पार्श्वभूमीवर, इस्रायलने शुक्रवारी इराणच्या 'यज्द' येथील युरेनियम प्रोसेसिंग प्लांटवर जोरदार हल्ला चढवला. या हल्ल्यामुळे संतप्त झालेल्या इराणने इस्रायलला याची मोठी किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांचे मोठे विधान-**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या परिस्थितीवर भाष्य करताना म्हटले आहे की, 'आम्ही मध्य-पूर्वेतील अण्वस्त्र धोक्यांना संपवत आहोत. माझ्या नेतृत्वाखाली अमेरिका या कट्टरपंथी राजवटीचा धोका 'ऑपरेशन एपिक फ युरी'द्वारे नष्ट करत आहे. इराण गेल्या ४७ वर्षांपासून या



भागात दहशत माजवत होता, पण आता तो बॅकफूटवर आहे.'

**हुथी आणि हिज्बुल्लाची भूमिका-**येमेनच्या हुथी बंडखोरांनी प्रथमच इस्रायलवर क्षेपणास्त्र डागल्याने अरब देशांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. तर, हिज्बुल्लाने कोणत्याही परिस्थितीत माघार न घेण्याची घोषणा केली आहे. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने असा दावा केला आहे की, त्यांनी अमेरिकेचे एफ-१८ लढाउ विमान पाडले आहे, ज्यामुळे तणाव शिगेला पोहोचला आहे.

**युद्ध पेटण्याची शक्यता-** अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी असा दावा केला आहे की, हे युद्ध येत्या काही आठवड्यांत संपू शकते. मात्र, इस्रायल आणि अमेरिकेने इराणची केलेली नाकेबंदी आणि सातत्याने होणारे हल्ले पाहता, हे युद्ध शांत होण्याऐवजी संपूर्ण जगाला वेढणा-या 'अण्वस्त्र संघर्षात' रूपांतरित होते की काय? अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# स्वयंघोषित धर्मगुरूविरोधात गुन्हा

**मुंबई/प्रतिनिधी :** मी महादेवाचा अवतार आहे, असे सांगून एका महिलेवर अत्याचार केल्याच्या आरोपाप्रकरणी वसईतील स्वयंघोषित धर्मगुरूच्या विरोधात माणिकपूर पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हृषिकेश वैद्य (४०) असे या धर्मगुरूचे नाव असून एका ३५ वर्षीय महिलेने या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पुढील कारवाईसाठी हे प्रकरण पुण्यातील हडपसर पोलिसांकडे वर्ग करण्यात



आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३१ डिसेंबर २०२३ रोजी आरोपीने फिर्यादी महिलेला आपण महादेवाचा अवतार असल्याचे सांगून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने तिला पुणे येथील मांजरी परिसरातील रिक्षा स्टॅण्डजवळील एका लॉजमध्ये नेले. तेथे प्रसाद असल्याचे सांगून प्रसादामध्ये गुंगीकारक औषध दिले व महिलेवर जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच महिलेचे आक्षेपार्ह फोटो काढल्याचा आरोप आहे.

# ऊर्जा ठिकाणांवरील हल्ले सहन केले जाणार नाहीत

## मोदींची सौदी प्रिन्ससोबत चर्चा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियाचे क्राउन प्रिंस आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांच्याशी फोनवरून महत्त्वपूर्ण चर्चा केली. या चर्चेत उर्जा सुरक्षेचा मुद्दा, नागरिकांच्या जीविताची हानी आणि प्रादेशिक स्थैर्य यावर सखोल संवाद झाला. वाढत्या तणावामुळे जागतिक पातळीवर निर्माण झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

दोन्ही नेत्यांमध्ये पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला गेला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी उर्जा आणि नागरी पायाभूत सुविधांवर होणा-या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला. तसेच अशा हल्ल्यांमुळे केवळ संबंधित देशांनाच नव्हे, तर संपूर्ण जगावर परिणाम होत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे पश्चिम आशियातील परिस्थिती अधिकच चिघळली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने शांततेचा



मार्ग स्वीकारण्यावर भर दिला आहे. दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रातील जहाजांची वाहतूक सुरळीत राहणं अत्यावश्यक असल्याचं मान्य केलं.

होर्मुज सामुद्रधुनीवर भर

जागतिक उर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली होर्मुज सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित राहणं गरजेचं असल्याचं या चर्चेत अधोरेखित करण्यात आलं. या मार्गावरू न मोठ्या प्रमाणात तेल आणि गॅस वाहतूक होत असल्याने कोणताही अडथळा निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होउ शकतो.

# इस्त्रायलला मोठी किंमत मोजावी लागेल

## *इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास*

**तेहरान/ वृत्तसंस्था-**मध्यपूर्वेतील युद्धाने आता अत्यंत भीषण आणि निर्णायक वळण घेतले आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणमधील महत्त्वाच्या पोलाद कारखान्यांसह अणू प्रकल्पांवर धडाधड क्षेपणास्त्रे डागत इराणला मोठा दणका दिला आहे. या हल्ल्यांनंतर इराण कमालीचा संतापला असून, या कृत्यासाठी इस्रायलला मोठी किंमत मोजावी लागेल आणि याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा थेट इशारा इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी दिला आहे.केवळ अणू प्रकल्पच नव्हे, तर इराणच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पोलाद कारखान्यांवरही इस्रायलकडून बॉम्बवर्षाव करण्यात आला आहे. इस्फहानमधील मोबारेकेह स्टील प्लांटवर झालेल्या हल्ल्यात एका कर्मचा-याचा मृत्यू झाला असून १५ जण गंभीर जखमी झाले आहेत.इस्रायली लष्कराने या हल्ल्यांची पुष्टी केली असून, या मोहिमेला ऑपरेशन रायझिंग लायन असे नाव देण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत इराणच्या अराक हेवी वाटर प्लांट आणि यजद येथील युरेनियम प्रकल्पाला लक्ष्य करण्यात आले. इस्रायलच्या मते, हे प्रकल्प अण्वस्त्रे बनवण्यासाठी वापरले जाउ शकत होते, त्यामुळे त्यांना नष्ट करणे सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक होते. खुजेस्तानमधील एका कंपनीत १६ कर्मचारी जखमी झाले असून फिरोजाबादची खाण आणि मशहद विमानतळाच्या गोदामांचेही मोठे नुकसान झाले आहे.

# नेपाळचे माजी पंतप्रधान, गृहमंत्री यांना अटक, समर्थक पोलिसांशी भिडले

**काठमांडू/ वृत्तसंस्था-**नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना अटक करण्यात आली आहे. गेल्यावर्षी झालेल्या जेन झी आंदोलनात अनेकांचा मृत्यू झाला होता, याप्रकरणी ओली यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली शनिवारी (२८ मार्च) पहाटे अटक करण्यात आली. ओलींच्या अटकेनंतर त्यांच्या समर्थकांनी काठमांडूमध्ये विविध ठिकाणी निदर्शने केली. अनेक ठिकाणी नागरिकांनी चौकशी अहवालाच्या प्रती जाळून विरोध दर्शवला. नेपाळमध्ये सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या जनरेशन झेडच्या हिंसक आंदोलनानंतर केपी शर्मा ओली यांना➪(पान २ वर)

# रशियन ऑईल टर्मिनल्सवर भीषण हल्ला

## युक्रेनचा पुतिन यांना मोठा दणका!

**मॉस्को / वृत्तसंस्था-**गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धाने आता भीषण रू प धारण केले आहे. युक्रेनने रशियाच्या बाल्टिक समुद्रातील प्रिमोर्स्क आणि उस्त-लुगा या दोन अत्यंत महत्त्वाच्या तेल निर्यात बंदरांवर ड्रोनचा मोठा हल्ला केला. या हल्ल्यामुळे बंदरातील तेल साठ्यांनी पेट घेतला असून, आगीचे भीषण लोट शेजारील देश फिनलंडमधूनही स्पष्टपणे दिसत आहेत. या हल्ल्यानंतर रशियाने या दोन्ही बंदरांवरील कच्च्या तेलाचे लोडिंग तूर्तास थांबवले आहे.

युक्रेनच्या एसबीयू या सुरक्षा यंत्रणेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. रशियाची युद्ध अर्थव्यवस्था



कमकुवत करण्यासाठी आणि त्यांच्या परकीय चलनावर गदा आणण्यासाठी हे हल्ले करण्यात आल्याचे युक्रेनने म्हटले आहे. उस्त-लुगा बंदरातील ऑईल टँक पार्क आणि लोडिंग स्टॅण्डचे या हल्ल्यात मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे, या हल्ल्यादरम्यान दोन ड्रोन भरकटून शेजारील लाटविया आणि एस्टोनियामध्येही कोसळले, ज्यामुळे युरोपातील तणाव अधिकच वाढला आहे. फिनलंडच्या तटरक्षक दलाचे संचालक जुक्का-पेक्का लुमिलाहटी यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रिमोर्स्क बंदरातील आग अद्याप पूर्णपणे विझलेली नाही. फिनलंडच्या संसदेचे संरक्षण समिती अध्यक्ष हिक्की ऑटो यांनी हेलसिंकी विमानतळावर उतरताना आकाशात काळ्या धुराचे प्रचंड लोट पाहिल्याचे सांगितले.

# रशिया 1 एप्रिलपासून पेट्रोल निर्यात थांबविणार

**मॉस्को / वृत्तसंस्था-**रशिया-युक्रेन युद्धाच्या चौथ्या वर्षी आणि मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी देशांतर्गत इंधन पुरवठा सुरक्षित करण्यासाठी कठोर पाउल उचलले आहे. रशियाने १ एप्रिल २०२६ पासून पेट्रोलच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. देशांतर्गत बाजारपेठेत किमती स्थिर ठेवणे आणि पुरवठा सुरळीत ठेवणे हे यामागचे मुख्य कारण असल्याचे रशियाने म्हटले आहे.रशियामध्ये लवकरच शेतीचा हंगाम सुरू होत आहे. या काळात ट्रॅक्टर आणि इतर यंत्रसामग्रीसाठी इंधनाची मागणी वाढते. ही मागणी पूर्ण करण्यासाठी निर्यातीवर मर्यादा आणणे आवश्यक असल्याचे रशियाने स्पष्ट केले आहे. युक्रेनने रशियाच्या अनेक तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर ड्रोन हल्ले केल्यामुळे



उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे रशियाला आपल्या नागरिकांसाठी पुरेसा साठा राखून ठेवावा लागत आहे.जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढत असताना रशियात पेट्रोल महाग होउ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. रशियाने स्पष्ट केले आहे की, युरेशियन इकानामिक युनियनमधील सदस्य देश (उद्धा.बेलारू स, कझाकिस्तान) आणि ज्या देशांशी रशियाचे विशेष द्विपक्षीय करार आहेत, त्यांना या बंदीतून सूट दिली जाउ शकते.भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात करतो. जर रशियाने शुद्ध केलेल्या पेट्रोलच्या निर्यातीवर बंदी घातली, तर जागतिक बाजारपेठेत पेट्रोलच्या किमती वाढतील. रशियाने रिफाईन केलेल्या पेट्रोलवर बंदी आणली आहे. युरोप याचा मोठा ग्राहक आहे. भारत रशियाकडून पेट्रोल विकत घेत नाही, तर कच्चे तेल खरेदी करतो. रशियाच्या या बंदीमध्ये कच्च्या तेलाचा समावेश नाही,



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# पोलीस पाटील हा प्रशासनाचा कणा - पालकमंत्री

## परिषदेत समस्या शासनस्तरावर मार्गी लावण्याचे आश्वासन






**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात पोलीस पाटीलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून काम करणारा पोलीस पाटील खऱ्या अर्थाने प्रशासनाचा कणा आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्टेडीयम स्पोर्ट व वाणिज्य संकुल, नवसारी येथे (दि.२८) आयोजित 'पोलीस पाटील परिषदे'त पालकमंत्री बावनकुळे बोलत होते. खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, प्रवीण पोटे पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

ग्रामीण स्तरावर 'पोलीस पाटील' हे प्रशासनाचे डोळे आणि कान म्हणून काम करतात. गुन्हेगारी नियंत्रण आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी यात त्यांचा सहभाग मोलाचा असतो. त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध आहे. पोलीस पाटीलांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी लवकर मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक आयोजित करण्यात येईल. पोलीस पाटीलांच्या समस्या शासनस्तरावर मार्गी लावण्याचे आश्वासन पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

प्रशासनात पोलीस पाटीलांचे स्थान अनन्यसाधारण आहे. ग्रामीण स्तरावर होणाऱ्या प्रत्येक घडामोडीची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवण्यात पोलीस पाटील महत्त्वाची भूमिका बजावतात. गावपातळीवर वाद मिटवणे, गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांना मदत करणे आणि शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे, अशा बहुआयामी जबाबदाऱ्या ते पार पाडत आहेत.

ग्रामीण भागातील सुरक्षिततेसाठी पोलीस पाटीलांनी दिलेले योगदान मोलाचे असल्याचे गौरवोद्गार पालकमंत्री बावनकुळे यांनी काढले. उत्कृष्ट कार्य केलेल्या पोलीस पाटलांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून सत्कार करण्यात आला. पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते यावेळी तीन रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. तसेच आमदार राजेश वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त पालकमंत्री बावनकुळे यांनी त्यांना सपत्नीक शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार केला. पोलीस पाटील परिषदेला जिल्ह्यातील पोलीस पाटील, प्रशासकीय अधिकारी, पोलीस विभागातील अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

# हमालपुरा रेल्वे पुलावर युवकावर प्राणघातक हल्ला

## शोभायात्रेदरम्यान किरकोळ वादानंतर घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सिटी कोतवाली पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या हमालपुरा रेल्वे पुलावर गुरुवारी उशिरा रात्री एका २४ वर्षीय युवकावर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. किरकोळ वादातून झालेल्या या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. पवन विलास भगत असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणात विनोद सुर्यकांत अजबे (वय २५, रा. हमालपुरा) याच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी यश काटे, अथर्व ऊर्फ रायबो सगणे, सर्वेश बिलबिले या तिघांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

विनोद अजबेंच्या तक्रारीनुसार, २६ मार्च रोजी रामनवमीनिमीत्त हमालपुरा येथून शोभायात्रा निघाली होती. त्यानंतर विनोद, व त्याचे मित्र पवन भगत आणि ऋतिक गणेश समरित असे तिघेही शोभायात्रेसाठी राजकमल चौकात गेले होते. त्यावेळी नाचत असताना त्यांचा यश काटे (ता.चिचफैल) व त्याचे मित्रे सर्वेश बिलबिले (रा.माळीपुरा) यांच्याशी वाद झाला. त्यावेळी शाब्दीक वाद शांत झाला. त्यानंतर विनोद, पवन भगत व ऋतिक असे तिघेही घरी जात होते. दरम्यान बंद असलेल्या उड्डानपुलावर आरोपी यश काटेसह त्याच्या मित्रांनी वाद करून, पवनवर जीवघेणा हल्ला केला. त्यानंतर ते पळून गेले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पवनला नागरिकांच्या मदतीने तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) दाखल करण्यात आले. मात्र, त्याच्या शरीरावर गंभीर जखमा असल्याने पुढील उपचारासाठी त्याला तातडीने खासगी 'एक्सजॉन हॉस्पिटल'मध्ये हलवण्यात आले. सध्या त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला असून, जखमीच्या जबाबावरून आरोपी यश काटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पथके रवाना करण्यात आली आहेत. भरवस्तीत आणि सार्वजनिक ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# 'योनो ॲप'च्या नावाखाली निवृत्त व्यक्तीला ८.०३ लाखांनी फसविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** ऑनलाईन बँकिंग ॲप इन्स्टॉल करून देण्याच्या बहाण्याने सायबर गुन्हेगारांनी एका निवृत्त व्यक्तीची तब्बल ८ लाख ३ हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी अमरावती शहर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र दौलतराव वानखडे (वय ६६, रा. विद्यानिकेतन शाळेजवळ, रामनगर) यांनी नुकताच वन प्लस १५ आर मोबाईल घेतला होता. त्यांना स्टेट बँक ऑफ इंडियाचे योनो ॲप इन्स्टॉल करायचे होते. त्यासाठी ते फेसबुकवर माहिती शोधत असताना त्यांना संबंधित जाहिरात दिसली. यानंतर एका अज्ञात व्यक्तीने त्यांना फोन करून स्वतःला स्टेट बँक ऑफ इंडिया,




मेन ब्रँच नोएडा येथील व्यवस्थापक असल्याचे सांगितले. त्याने योनो ॲप इन्स्टॉल करण्याच्या नावाखाली फिर्यादीकडून बँक खाते, डेबिट कार्ड आणि सीव्हीसी क्रमांकासह महत्त्वाची माहिती घेतली. दरम्यान, संशय आल्याने फिर्यादीने तात्काळ बँकेत जाऊन आपले सेव्हिंग व जॉइंट खाते 'होल्ड' करण्यास सांगितले. काही दिवसांनी नवीन सिमकार्ड घेऊन त्यांनी खाते पुन्हा सुरू करून तपासणी केली असता, २३ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या खात्यातून ८,०३,००० रुपये काढण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(सी), ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई एनसीसीआर पोर्टलवरील तक्रारीनंतर वरिष्ठांच्या आदेशाने करण्यात आली.

# १ व १० वरिल उर्वरित

## खरातकडे जाणारे ते

बोलताना दीपक केसरकरांचे नाव घेत त्यांनी केलेल्या विधानावर विमानांची सोय करणारे सरकारमधील कोण लोक होते हे जाहीर केले पाहिजे अशी मागणी केली आहे. संजय राउत म्हणाले, सत्ताधारी आमदार दीपक केसरकर म्हणतात की मला एकट्यालाच का टार्गेट करता आहात, खरातकडे ४० आमदार जात होते, हे ४० आमदार कोण हे पुढे आले पाहिजे, खरातसाठी विमानांची सोय करणारे सरकारमधील कोण लोक होते हे जाहीर केले पाहिजे, अशी मागणीही संजय राउत यांनी केली आहे.

## राज्यात एलपीजी गॅस,

पंपावरच मुक्कामी आहेत.

जालन्यात पेट्रोल पंपावरच मारहाण

जास्तीचे डिझेल न दिल्यामुळे एका पेट्रोल पंप चालकास मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. काल रात्री साडेनउच्या सुमारास जालना तालुक्यातील वानडगाव येथील पेट्रोल पंपावर पेट्रोल पंप चालकास ३ ते ४ व्यक्तींनी १००० लिटर डिझेलची मागणी केली. सध्याची टंचाई पाहता पेट्रोल पंप चालकाने यास नकार दिल्यामुळे या पेट्रोल पंप चालकास बेदम मारहाण करण्यात आली. राहुल ऊाले असे पेट्रोल पंप चालकाचे नाव असून याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करून न्याय देण्याची मागणी या पेट्रोल पंप चालकाने केली आहे.

कोल्हापुरात ३० टक्के रिक्षा बंद

कोल्हापुरात एलपीजी गॅसच्या किमतीत भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. वाढलेल्या एलपीजी गॅसच्या किमतीमुळे कोल्हापूर शहरातील ३० टक्के रिक्षा व्यवसाय बंद झाला आहे. पुढच्या दोन दिवसांत शहरातील रिक्षा व्यवसाय ठप्प होण्याची चिन्हे आहेत. एलपीजी गॅसचे दर कमी करा अन्यथा आंदोलन छेडणार असल्याचा इशारा कोल्हापुरातील रिक्षाचालकांनी दिला आहे.

## नेपाळचे माजी पंतप्रधान,

पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या आंदोलनाची चौकशी करण्यासाठी अंतरिम सरकारने चौकशी समितीची स्थापना केली होती. ओली आंदोलन हताळण्यात अपयशी ठरल्याचा ठपका अहवालातून ठेवण्यात आला आहे. तसेच, १९ आंदोलकांची गोळी झोडून मृत्यू झाल्याप्रकरणी देखील त्यांना जबाबदार धरण्यात आले आहे. ओली यांच्यासह नेपाळी काँग्रेसचे नेते आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांनाही शनिवारी अटक करण्यात आली.

**राजकीय सूडबुद्धीने कारवाई, सरकारवर टीका-**माजी पंतप्रधान केपी ओली ७४ वर्षांचे असून त्यांच्यावर दोनदा मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. वैद्यकीय तपासणीनंतर काठमांडू येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, नेपाळ कम्युनिस्ट पक्षाने (एकीकृत मार्क्सवादी-लेनिनवादी) या अटकेचा तीव्र शब्दात निषेध केला असून, राजकीय सूडबुद्धीने ही कारवाई केल्याचे म्हटले आहे. पक्षाचे सचिव महेश बसनेत यांनी नुकतेच पंतप्रधानपदाची शपथ घेणा-या बालेन शहा यांच्यावर टीका केली. या विषयावर चर्चा करण्यासाठी पक्षाने तातडीची बैठक देखील बोलावली होती.

**समर्थकांची रस्त्यावर ऊतरुन निदर्शने-**केपी ओली यांच्या अटकेनंतर मोठ्या संख्येने त्यांच्या समर्थकांनी रस्त्यावर ऊतरुन निषेध नोंदवला. अनेक ठिकाणी जाळपोळ देखील करण्यात आली. आंदोलकांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मोठा पोलिस फौजफाटा रस्त्यावर तैनात करण्यात आला होता. ओलींच्या अटकेमुळे नेपाळच्या राजकीय परिघात देखील तीव्र पडसाद ऊमटल्याचे दिसून आले. अनेक राजकीय नेत्यांनी अटकेची कारवाई राजकीय सूडबुद्धीने केल्याचे मत नोंदवले. तर, अनेकांनी याप्रकरणी निपःक्ष चौकशीची गरज व्यक्त केली.

**बालेन शहा नवे पंतप्रधान-**रॅपर म्हणून प्रसिद्ध असणारे बालेन ऊर्फ बालेंद्र शहा यांनी शुक्रवारी नेपाळचे सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. गेल्या वर्षी झालेल्या आंदोलनाचे प्रतिनिधित्व बालेन यांनी केले होते. त्यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीला नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड यश मिळाले.

## शेतकऱ्यांच्या कायम पाठीशी राहू

जाणारे रस्ते अडवल्यास संबंधित शेतकऱ्यांना

पुढील पाच वर्षे कोणतीही शासकीय योजनेचा लाभ देण्यात येणार नाही. तसेच २०११ पूर्वी सरकारी जागेवर निवासी अतिक्रमण असलेल्या जागांना पंधराशे फुटांचे पट्टेवाटप करण्यात येणार असून एक हजार रुपयात नोंदणी करण्यात येणार आहे, असे सांगितले.

यावेळी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू आणि उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांनी मनोगत व्यक्त केले. रमेश बकाळ यांनी आभार मानले.

## कॅफेवर धाड, ६ युवक-युवती

आला. कारवाईदरम्यान कॅफेमध्ये ६ युवक-युवती आक्षेपार्ह अवस्थेत आढळून आले. त्यांना तात्काळ ताब्यात घेऊन राजापेठ पोलिस ठाण्यात आणण्यात आले. प्राथमिक चौकशीनंतर त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आणि नंतर त्यांना कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. याचप्रकरणी कॅफे चालक नयन बंडोपंत बागेकर (वय ३०) आणि अंकुश गजानन दवंडे (वय ३०, दोघे रा. गोपाल नगर) यांच्यावरही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी कॅफे व्यवस्थापनाच्या भूमिकेचीही तपासणी सुरू केली आहे.

## अतिक्रमणाची तक्रार केल्याने

आरोपी जीतू पिवाल पोस्टमन कॉलनीत आला आणि संबंधित प्लॉट माझाच असल्याचा दावा करत, 'तू मनपाकडे तक्रार का केली?' अशी विचारणा केली. यावर राजेश यांनी हा कॉलनीचा सामूहिक प्रश्न असल्याचे सांगितले. यामुळे संतापलेल्या आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच चाकूने हल्ला करत राजेश यांच्या बोटांना इजा पोहोचवली. या झटापटीदरम्यान राजेश यांच्या वडीलांनी मध्यस्ती केली असता आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी झाली. याप्रकरणी राजेश दारोकार यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा

तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख उपक्रमांमुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. मर्यादित संसाधनांमध्येही मोठ्या महानगरपालिकांशी स्पर्धा करत मिळवलेले हे यश विशेष उल्लेखनीय मानले जात आहे.

महानगरपालिकेने राबविलेल्या प्रमुख उपक्रमांमध्ये 'माय अमरावती' व्हॉट्सॲप चॅटबॉट, चॅनेल व मोबाईल ॲपद्वारे नागरिकांशी सुलभ संवाद, रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारित कूल रूफ उपनियम २०२५, शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) अंतर्गत सेवांचे डिजिटायझेशन व नवीन वेब पोर्टल्सची निर्मिती, ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे परवाने व प्रमाणपत्रांची पडताळणी तसेच मालमत्ता करासह विविध विभागांमध्ये GIS तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांचा समावेश आहे.

अमरावती महानगरपालिकेची ही कामगिरी राज्यातील तंत्रज्ञानाधारित व उत्तरदायी शहरी प्रशासनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात असून, भविष्यातील स्मार्ट प्रशासनासाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

## सराईत गुन्हेगार गजाआड,

झाला आहे. पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे २ लाख ६० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

या प्रकरणाची सुरुवात शामनगर येथील रहिवासी राजेंद्र हरिश्चंद्र चौधरी (वय ५८) यांच्या तक्रारीने झाली. त्यांनी २३ मार्च २०२६ रोजी रात्री त्यांची मोपेड (क्र. एमएच २७/एवाय ४७५१) घरासमोर पार्क केली असता ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे नमूद केले होते. या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन डीबी पथकाने तपासाची सूत्रे वेगाने हलवली. घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले तसेच गुप्त माहितीच्या आधारे संशयित आरोपीची ओळख पटविण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. कसून चौकशीदरम्यान आरोपीने वाहनचोरीची कबुली दिली. त्याच्याजवळील चोरीच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक रोशन शिरसाट, पीआय निलेश गावंडे, पीएसआय राहुल महाजन आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## बेनेगलांच्या 'सिने-स्वरांची' उलगडणार

श्याम बेनेगल यांनी आपल्या जाणिवा समृद्ध करणारे आणि भारतीयत्व जोपासणारे उत्तम चित्रपट देतानाच, जाहिरात क्षेत्रात 'जिंगल किंग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वनराज भाटिया यांना चित्रपट संगीताकडे वळवले. गार्डन वरेली, लिरिल यांसारख्या सुमारे ६ हजार जिंगल्स कंपोज करणाऱ्या भाटिया यांनी बेनेगलांच्या चित्रपटांच्या प्रकृतीनुसार दिलेले संगीत हे हिंदी चित्रपटांच्या लोकप्रिय धारेपेक्षा पूर्णत: वेगळे आणि वैचारिक अधिष्ठान असलेले होते. याच सांगीतिक प्रवाहाचा वेध घेण्याचा प्रयास अजेय गंपावार या कार्यक्रमात करतील.

यापूर्वी 'मानस प्रबोधिनी' तर्फे डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. नंदू मुलमुळे यांची व्याख्यान सत्रे आणि विख्यात रंगकर्मी अतुल पेठे यांच्या नाट्यवाचनाचे दर्जेदार उपक्रम राबविण्यात आले आहेत. आगामी कार्यक्रमात डॉ. श्रीकांत आणि डॉ. उषा देशमुख पाहुण्यांचे स्वागत करतील, तर डॉ. शंकर वाकोडे प्रास्ताविक करतील. डॉ. गजानन रत्नपारखी संस्थेच्या कार्याची रूपरेषा मांडतील आणि प्रा. अरुणा तसरे आभार प्रदर्शन करतील. या आयोजनात डॉ. पल्लवी मांडवगडे व डॉ. श्रीकांत पाटील यांचाही सक्रिय सहभाग आहे. हा उपक्रम पूर्णत: नि:शुल्क असून अमरावतीमधील चोखंदळ व जाणकार मंडळींनी या 'सकस' कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्याभारती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा येणकर आणि आयोजक मंडळींनी केले आहे.

## बिजीलॅंड संकुलात कर्मचा-याची

रोहित बीआरएल गॅरेजच्या बाजूला असणाऱ्या मोटर पंपच्या गोदाम मध्ये झोपत होता. गुरुवारी मित्राने त्याला फोन केला तर रोहित ने उचलला नाही. यामुळे त्याचा मित्र बिजीलॅंड संकुल मध्ये पोहोचला. त्याने शटर उचलून पाहिले तर रोहित रंक फासावर लटकताना दिसला. त्याने तत्काळ याची माहिती नांदगाव पेठ पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. रोहितच्या मोबाईलची तपासणी केली असता पोलिसांना माहिती मिळाली की त्याने काही बँके कडून कर्ज घेतलेले आहे. त्याने २५ मार्च रोजी २४ लाखांचे कर्ज घेऊन ती रक्कम शेअर मार्केट मध्ये गुंतवली होती. त्याचा पूर्ण व्यवहार गुगल पेच्या माध्यमातून दिसला आहे. शेअर मार्केटमध्ये नुकसान झाल्याने त्याने आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. पुढील तपास उपनिरीक्षक गणेश राऊत करत आहे.

## चाकू घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या

ठाण्याच्या हद्दीत नियमित पेट्रोलिंग करत होते. यावेळी नागपुरी गेट नाका चौक परिसरात एक तरुण हातात चाकू घेऊन संशयास्पदरीत्या फिरत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. संबंधित तरुण सार्वजनिक ठिकाणी लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याचेही स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी कोणताही विलंब न करता तत्काळ कारवाई केली आणि त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून १००० रुपये किमतीचा धारदार चाकू जप्त केला आहे. याप्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ४/२५ तसेच मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे परिस्थिती नियंत्रणात आली. नागरिकांनी पोलिसांच्या कार्यवाहीचे कौतुक करत संभाव्य अनिष्ट घटना टळल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. सध्या पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## बनडेरात कुल्फी विक्रेत्यावर

जवळ कुल्फी घेण्यासाठी २५ मार्चच्या रात्री ९ वाजता सुमारास आला. त्याने एक कुल्फी घेतली पण ती कुल्फी पडून गेली. यानंतर मुकुंदलाल यांनी त्याला दुसरी कुल्फी दिली. कुल्फी घेतल्यावर आरोपी त्यांना शिवीगाळ करू लागला. त्यांनी त्याला तेथून जाण्यासाठी म्हटले तर आरोपीने आपल्या जवळील चाकू काढून त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात मुकुंदलाल जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू आहे. या संदर्भात मोटू पंजवानी यांनी मुकुंदलाल यांचा मुलगा आशिषला घटनेची माहिती दिली. यावेळी आशिष इंदोरला गेला होता. माहिती मिळताच तो इंदोर वरून परत आला. यानंतर वडिलांनी त्याला घडलेल्या घटनाक्रम सांगितला. आशिष प्रजापति यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी अनिकेत गणवीर विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## विपश्यना केंद्र, सांस्कृतिक

पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगीतले की, समाजाच्या सर्वात शेवटच्या घटकाचा विकास करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शासनाने बांधलेले हे सांस्कृतिक भवन सामाजिक कार्यासाठी अग्रेसर राहावे. या ठिकाणी शासनाच्या विविध योजनांसाठी मदत करण्यासाठी केंद्र उभारावे. तसेच आधुनिक सुविधांनी युक्त इ-लायब्ररी, अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करणारे केंद्र उभे करावे. यासोबतच कौशल्य विकासासाठीही प्रयत्न करण्यात यावेत. संस्थेने उभारलेल्या कार्यासाठी सर्वोत्तरी मदत करण्यात येईल,असेही ते म्हणाले.

चांगले जीवनमान घडविण्यासाठी विपश्यना हा सर्वात चांगला मार्ग आहे. संस्कारमय जीवन आणि शांतीसाठी विपश्यनेशिवाय पर्याय नाही. जनतेचे कल्याण करण्याची शक्ती विपश्यनेमध्ये आहे. विपश्यना केल्याने मोठी शक्ती मिळते. यातून समाज विकासाचे कार्य घडण्यास मदत होत असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## चांगापूर रेल्वे अंडरपास समस्येवर

प्रतिनिधींनी चांगापूर अंडरपासमधील तांत्रिक त्रुटी आणि नागरिकांना होणारा त्रास डीआरएमसमोर मांडला. अंडरपासचे स्ट्रक्चर अरुंद आणि वळणदार असल्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

डीआरएम पुनीत अग्रवाल यांनी सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर आश्वस्त केले की, अंडरपासमध्ये काही त्रुटी असल्यास त्या निश्चितपणे दूर केल्या जातील. तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठी दुसऱ्या अंडरपासच्या पर्यायावरही रेल्वे प्रशासन विचार करेल, असे संकेत दिले. तात्काळ उपाययोजना म्हणून अंडरपासचा रस्ता समतल करणे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी पंप लावण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी दिले आहे.

रेल्वे क्रॉसिंग पुन्हा उघडण्यास नकार-

बैठकीत अनिल अग्रवाल आणि विलास इंगोले यांनी २ एप्रिल रोजी होणाऱ्या हनुमान जन्मोत्सवाचा मुद्दा उपस्थित केला. या दिवशी ५ ते ७ लाख भाविक आणि हजारो वाहने चांगापूर परिसरात येणार असल्याने सध्याचा अंडरपास अपुरा पडेल, असे सांगत रेल्वे गेट पुन्हा उघडण्याची मागणी केली. मात्र, एकदा बंद केलेले रेल्वे गेट पुन्हा उघडणे शक्य नसल्याचे डीआरएम यांनी स्पष्ट केले. त्याऐवजी सुरक्षेचे पूर्ण नियोजन केले जाईल आणि हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी स्वतः पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्याशी चर्चा करणार असल्याचे डीआरएम अग्रवाल यांनी सांगितले.

या बैठकीमुळे चांगापूर अंडरपासचा मुद्दा आता निर्णायक वळणावर पोहोचला असून, प्रशासकीय पातळीवर ठोस हालचाली सुरू झाल्या आहेत.

## तृतिय पंथीयांची भव्य मंगल कलश

मंदिरात पोहोचली. मंदिरात पोहोचल्यानंतर तृतीयपंथीयांनी देवीच्या चरणी पितळी घंटा अर्पण करून दर्शन घेतले.

शोभायात्रेदरम्यान महादेव आणि खाटू श्याम यांच्या भजनांवर तृतीयपंथीयांनी उत्साहात नृत्य केले. मार्गात ठिकठिकाणी या कलश यात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. विशेषतः राधा-कृष्णाच्या जिवंत देखाव्याने सर्वांचे लक्ष वेधले होते. या धार्मिक सोहळ्यामुळे शहरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

या शोभायात्रेमध्ये शंकराचार्य हीमांगी सखी, जगतगुरु काजल ठाकूर, किन्नर मोर्चा प्रदेश संगठन मंत्री आम्रपाली चौधरी, प्रदेशाध्यक्ष गुड्डी नायक, शिवकांत शुक्ल, प्रकाश दिवे, तर अजय चिमोटे, काशीराम कर्णधार, निखिल लिखितकर, गणेश वाहने यांच्यासह राज्यभरातून आलेले असंख्य तृतीयपंथीय मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## बकऱ्या चोरीतील कुख्यात

त्यांच्या शेजाऱ्यांच्या मालकीच्या ४ मोठ्या व ३ लहान अशा एकूण ७ बकऱ्या (किंमत सुमारे ४४ हजार रुपये) दिवसाढवळ्या चोरीला गेल्या होत्या. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणाचा समांतर तपास करत असताना एलसीबीचे पीएसआय मूलचंद भांबुरकर यांना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार अकोल्यातील वाशिम बायपासवरील हुसेनी सुपर शॉपी परिसरात सापळा रचण्यात आला. पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले असता चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली. अटक आरोपींमध्ये शेख नवाब शेख आशिक (वय २७), शेख रिजवान शेख गुलाब (वय ३२) आणि शेख सुमेर शेख लाला (वय २२, सर्व रा. अकोला) यांचा समावेश आहे. चौकशीत आरोपींनी बकऱ्यांना मका टाकून जवळ बोलावून, त्यांना वाहनात भरून पळवून नेत असल्याचे सांगितले. त्यांनी अंजनगाव सुर्जी परिसरातून एकूण ९ बकऱ्या चोरी केल्याची कबुली दिली आहे.

या कारवाईमुळे अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन स्वतंत्र चोरीचे गुन्हे उघडकीस आले असून, पुढील तपासासाठी आरोपींना संबंधित पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई एलसीबी प्रमुख किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय मूलचंद भांबुरकर व त्यांच्या पथकाने केली.

## मजूरांना घेऊन जाणारा पिकअप

या अपघातात महिला आणि मुलेही जखमी झाल्याची माहिती आहे. माहिती नुसार जखमी दीपक दिनकर, भानू दिनकर ,आपल्या मजूर साथीदारांसह भैसदेही वरून आर्वी येथे चना कापण्यासाठी आले होते. काम झाल्यावर सर्व मजूर आर्वी वरून चांदूर बाजार मार्गे भैसदेही कडे जात होते. चांदूरबाजार येथील हिंदू स्मशान भूमी जवळ राष्ट्रीय महामार्गावर डिव्हायडरवर त्यांचे पिकअप वाहन धडकले आणि पलटी झाले. यामुळे डिव्हायडरवर लागलेले पाईप तुटून मजूर जखमी झाले.भानू आणि दीपक गंभीर जखमी असल्यामुळे त्यांना जिल्हा सामान रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २९ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात ; ट्रक चालक ठार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

**समृद्धी महामार्गवर पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली असून यात एका ट्रक चालकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे महामार्ग प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**

**मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून मुंबईकडे जात असलेला इँ० ५ँइ९ २४२ क्रमांकाचा ट्रक रात्री सुमारे २ वाजण्याच्या सुमारास लोकेशन क्रमांक १९७ येथे डिझेल पाईप फुटल्यामुळे बंद पडला. हा ट्रक १०० किमी वेगाच्या लेनमध्येच उभा राहिला होता. संबंधित चालकाने वारंवार हेल्पलाइनवर संपर्क साधून मदतीची आणि बॅरिकेट लावण्याची विनंती केली, मात्र पहाटेपर्यंत कोणतीही मदत घटनास्थळी पोहोचली नाही.**




दरम्यान, सकाळी सुमारे ५ वाजता श्प१४ प्ळ ३२९२ क्रमांकाचा दुसरा ट्रक कोलकाताहून मुंबईकडे जात असताना उभ्या असलेल्या कंटेनरला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चालक केबिनमध्ये अडकून गंभीर जखमी झाला. त्यालाही मदतीसाठी वारंवार संपर्क साधूनही वेळेत मदत मिळाली नाही.

घटनेची माहिती मिळताच कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी तसेच १०८ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाले. डॉक्टर गणेश आणि पायलट यांच्या टीमने जखमी चालकाला बाहेर काढण्यासाठी क्रेनची गरज असल्याचे सांगितले. मात्र, संबंधित ठेकेदाराने 'क्रेनमध्ये डिझेल नाही' असे कारण देत विलंब केल्याचा आरोप आहे.

तेथे हजर असलेल्या नागरीकांच्या मते, वेळेत क्रेन उपलब्ध झाली असती तर चालकाचा जीव वाचू शकला असता. अखेर सकाळी उशिरा मदत मिळाल्या नंतरही चालकाचा मृत्यू झाला. मृत चालकाचे नाव फुलचंद यादव (वय ३०, आझमगड, उत्तर प्रदेश) असून जखमीचे नाव अरविंद यादव (वय २९) असे आहे. या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेच्या उपाययोजनांवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. महामार्गावर नादुरुस्त वाहने वेगवान लेनमध्ये उभी राहत असतानाही बॅरिकेट लावण्यात सातत्याने दिरंगाई होत असल्याचे समोर आले आहे. तसेच पेट्रोलिंग व्यवस्थेचा अभावही प्रकर्षाने जाणवत आहे. समृद्धी महामार्गावर प्रवास करणारे नागरिक व आपत्कालीन सेवांच्या कर्मचाऱ्यांनी संबंधित ठेकेदारावर आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## कार्ली येथे साचलेल्या दूषित पाण्याने नागरिक त्रस्त

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील कार्ली येथील रहिवासी गजानन रामचंद्र नालिंदे यांनी त्यांच्या घरासमोर रस्त्यावर साचणाऱ्या दूषित पाण्यामुळे गंभीर आरोग्यधोका निर्माण झाल्याची तक्रार करत जिल्हा परिषद वाशिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी अर्ज सादर केला आहे.

तक्रारीनुसार, घरासमोरील रस्त्यावर साचणारे घाणपाणी थेट घरात तसेच दारासमोरील नळाच्या खड्ड्यात शिरत असून परिसरात अस्वच्छता वाढली आहे. या साचलेल्या दूषित पाण्यामुळे डासांची उत्पत्ती, दुर्गंधी आणि विविध आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः परिसरातील लहान मुले वारंवार आजारी पडत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

अर्जदार गजानन नालिंदे यांनी नमूद केले आहे की, या समस्येबाबत यापूर्वीही दि. १३ मार्च रोजी ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांना लेखी तक्रार देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

तसेच, ग्रामपंचायत सरपंच, सचिव आणि सदस्यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी करून अडविलेले पाणी कायदेशीर व तांत्रिक पद्धतीने नालीमार्गे वाहून जाण्याची व्यवस्था करावी, अशी



मागणी अर्जातून करण्यात आली आहे. भविष्यात कोणतीही जीवितहानी, साथीचे आजार किंवा अन्य दुर्घटना घडू नयेत, यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरीत दखल घेऊन रस्ता मोकळा करणे, साचलेले दूषित पाणी हटविणे आणि जबाबदारांवर कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## दोन दिवस रंगली महाड सत्याग्रह स्मृती व्याख्यानमाला



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाड सत्याग्रहाच्या स्मृती जागविणाऱ्या महाड सत्याग्रह स्मृती व्याख्यानमालेची यशस्वी सांगता झाली. दि. १९ व २० मार्च २०२६ रोजी ही व्याख्यानमाला पार पडली. यंदा या व्याख्यानमालेने १५ व्या वर्षात पदार्पण केले.

व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पात दि. १९ मार्च रोजी शिक्षक आमदार अमरावती विभाग किरणराव सरनाईक हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा प्रा. संजय खडसे होते.यावेळी ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. ऋषिकेश कांबळे यांनी 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला माणसात आणलं, आपण शुद्धीवर आहोत काय ?' या विषयावर अभ्यासपूर्ण विचार मांडले.या कार्यक्रमाला सेवानिवृत्त प्रकल्प संचालक विलास खिल्लारे , प्राचार्य नवोदय विद्यालय, सचिन दत्तात्रेय खरात यांची प्रमुख उपस्थिती लाभली.व्याख्यानमालेच्या द्वितीय पुष्पात दि. २० मार्च रोजी प्रतिभाताई रामप्रभू सोनोने या अध्यक्षस्थानी होत्या.या सत्रात अँड. वैशाली डोळस यांनी 'भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर आपले विचार व्यक्त केले.यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ एस. के. उंडाळ, बालरोग तज्ञ डॉ. विजय कानडे, महिला व बालविकास अधिकारी गजानन पडघन यांची प्रमुख उपस्थिती होती.या व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनासाठी अँड. पी. पी. अंभोरे, हरिश्चंद्र पोफळे, महेंद्र ताजने, दिलीप गवई, विलास भालेराव, एस. पी. चौरे, प्रा. मधुकर बनसोड, किसन ह. राजे, पंढरी खिल्लारे, अरविंद उचित, भीमराव सावळे आदींनी परिश्रम घेतले.

## महानगरात मोफत रोग तपासणी सप्ताह

**अकोला :** महानगरात आपल्या वैद्यकीय सेवेची २५ वर्षीय रजत जयंती साजरी करणारे जेष्ठ वैद्यकीय तज्ञ डॉ कमलकिशोर लड्ढा व जेष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ सुनीता लड्ढा व त्यांच्या कुटुंबातील सहा विविध विषयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या वतीने सर्व महिला पुरुष नागरिकांसाठी मोफत रोगनिदान तपासणी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून एकाच संयुक्त कुटुंबात हा नागरिकांसाठी मोफत अभिनव वैद्यकीय तपासणी सप्ताह आयोजित करण्यात आला असल्याची माहिती डॉ कमलकिशोर लड्ढा व डॉ सुनीता लड्ढा यांनी दिली.

## 'चिपको महोत्सवानिमित्त' वृक्ष दिंडीचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

चिपको महोत्सवानिमित्त एसएमसी इंग्लिश स्कूल, वाशिम येथील राष्ट्रीय हरित सेना आणि सामाजिक वनीकरण विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्ष दिंडीचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

या दिंडीचा मुख्य उद्देश पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करणे व 'झाडे वाचवा, जीवन वाचवा' हा संदेश समाजापर्यंत पोहोचवणे हा होता. विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन विविध घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. शहरातील प्रमुख मार्गांवरून ही दिंडी



काढण्यात आली.

या कार्यक्रमाला प्राचार्या मीना उबगडे तसेच वनपाल बेले, वनरक्षक भगवान वानखडे, अनिल लामेले यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.

राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तसेच मास्टर ट्रेनर अभिजीत मुकुंदराव जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्षांचे जतन व संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी वृक्षारोपण करून 'एक विद्यार्थी – एक झाड' हा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून समाजातही सकारात्मक संदेश पोहोचला.सदर उपक्रम शाळेच्या प्राचार्य मीना उबगडे, राष्ट्रीय हरित सेनेचे समन्वयक तथा मास्टर ट्रेनर अभिजीत जोशी, सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी अशोक प-हाड, सहायक वनसंरक्षक पदमाकर मोगरे, वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र कातखेडे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आला. हा उपक्रम वाशिम शहरासाठी प्रेरणादायी ठरला.

## भगवान महावीर जयंती महोत्सवाचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रम्हचर्य, अपरिग्रह या महान तत्वाचा उपदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तिर्थंकर भ. महावीर यांचा जयंती महोत्सव संपूर्ण भारतात चैत्र शु.१३ सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे. या जयंती महोत्सवाचे आयोजन स्थानिक सैतवाळ दि. जैन मंदिर किल्ल्याजवळ करण्यात येत आहे. त्यानिमित्त खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन कार्यकारीणीद्वारा करण्यात आले आहे.

## पोहरादेवी यात्रेत लाखो भाविकांची अभूतपूर्व गर्दी

### रामनवमी निमित्त महिलांना साडी वाटप



■ प्रतिनिधी | मानोरा ■

संत सेवालाल महाराज आणि अखंड बालब्रह्मचारी निरंकारी दैवत संत रामराव महाराज यांच्या पावन पदस्पर्शाने पवित्र झालेली पोहरादेवी ही अखिल बंजारा समाजाची 'काशी' म्हणून सर्वत्र ख्यातनाम आहे. शेकडो वर्षांची आध्यात्मिक परंपरा लाभलेल्या या भूमीत दरवर्षी चैत्र महिन्यात भरत असलेली भव्य यात्रा यंदाही प्रचंड उत्साहात पार पडत असून, देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक भक्त येथे दरवर्षी हजेरी लावतात. यावर्षी सुद्धा पोहरादेवी यात्रेत लाखो भाविकांची गर्दी पहावयास मिळाली असून रामनवमी निमित्त महिलांना साडी वाटप करून सन्मान करण्यात आला.

चैत्र शुद्ध रामनवमीच्या मंगलमय पर्वानिमित्त संत रामराव महाराज आश्रम व समाधी स्थळ परिसरात भक्ती, सेवा आणि श्रद्धेचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळत आहे.यात्रेत दाखल होणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी संत रामराव महाराज समाधी स्थळाचे मुख्य पुजारी महंत शेखर महाराज आणि महंत संजय महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य आणि शिस्तबद्ध भोजन व्यवस्थेची उत्कृष्ट आखणी करण्यात आली. याच पवित्र दिवशी महिला भगिनींचा सन्मान व्हावा, या उदात्त हेतूने एक विशेष उपक्रम राबविण्यात आला.


**Change In Name**

MY OLD NAME IS
**AALIYA KHATUN KAMIL RASHID**
Which now I am Changing as new name
**ALIYA KHATUN KAMIL RASHEED**
hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same
Sign by
**ALIYA KHATUN KAMIL RASHEED**
R/O KABADI PURA BALAPUR WARD No.18 TQ.BALAPUR Dist AKOLA Pin 444302 Maharashtra
mob.8446027359

**जाहीर सुचना**

दि. २८.३.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, श्री नेमिचंद मोतीलाल बनवट यांना खालील वर्णन केलेली मालमता दि. ४.६.१९९७ रोजीचे रजी वाटणी पत्राने मालकी हक्कात मिळालेली व नंतर त्यांनी त्यांचे हिंदू एकत्र कुटुंबात सामील केलेली मालमत्ता ज्याचे वर्णन: मौजे जांभूळधाचा ता. मलकापुर जि. बुलढाणा येथील गट नं ३५० मधील १० हेक्टर ३७ आर एवढी शेतजमीन व पोटखराब ० हेक्टर १७ आर एवढी शेतजमीन अशी एकूण १० हेक्टर ५४ आर शेतजमीन में. फीनक्राफ्ट ओवरसिस प्रा.ली. यांना दि १९.०१.२०२६, दस्त क्र २६४ रोजीचे खरेदी खताप्रमाणे विकली आहे. सदर मालमतेत आता हिंदू एकत्र कुटुंबाचे कोणतेही हक्क नाहीत.

सदर मालमत्तेबाबतचे वाटणीपत्र श्री नेमिचंद मोतीलाल बनवट यांचेकडे नाही हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधून सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर कार्यवाही केली आहे. तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि,

आपला
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो: ९८२३०९१३७७


## अभिजीत आठवले यांची सोशल मीडिया प्रमुखपदी

**अकोला :** सर्किट हाऊस येथे शिवसेना सामाजिक न्याय विभागाची विभागीय बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे प्रविण वाहुरवाघ यांची शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या जिल्हा सरचिटणीस पदावर नियुक्ती करण्यात आली.


## जे.डी. चवरे विद्यामंदिरात ग्रंथालयाचे नामकरण सोहळा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■

स्थानिक जे.डी. चवरे विद्यामंदिर येथील ग्रंथालयाचे 'स्व. निरंजनजी कळमकर वाचन कक्ष' असे नामकरण अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे येथील चार्टर्ड अकाउंटंट श्री मनोज कळमकर होते. यावेळी शाळा समितीच्या अध्यक्षा डॉ. लीना उदय चवरे, संचालक श्री श्रेयांस चवरे, संतोष चवरे, मुख्याध्यापक श्रीनिवास जोशी, पर्यवेक्षक कैलास सोनुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संगीत शिक्षक प्रमोद चव्हाण व विद्यार्थ्यांनी गीतांद्वारे पाहुण्यांचे स्वागत केले. महावीर शिक्षण



प्रसारक मंडळाचे सदस्य प्रमोद चवरे यांच्या हस्ते अध्यक्षांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात डॉ. लीना चवरे यांनी स्व. निरंजनजी कळमकर यांच्या सेवाभावी कार्याचा आढावा घेत, वाचन संस्कृतीबद्दल त्यांचे असलेले प्रेम आणि सामाजिक योगदान यांची माहिती दिली. त्यांच्या स्मृती चिरकाल जपण्यासाठी ग्रंथालयाला त्यांचे नाव देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी मुख्याध्यापक अविनाश मुधोळकर, सौ. अनिता महाजन व मुख्याध्यापक श्रीनिवास जोशी यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा. डॉ. दिनेश तांदळे लिखित 'खेळ व योगशिक्षण' या पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिल्याबद्दल श्रीनिवास जोशी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात श्री प्रमोद चव्हाण यांनी 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे' तर श्री देवलाल बोर्डे यांनी 'अशी पाखरे येती' ही गीते सादर करून वातावरण भारावून टाकले.

'संवाद लेखकांशी' या उपक्रमांतर्गत सुप्रसिद्ध लेखक अतुल कहाते यांच्याशी संवाद साधलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात श्री मनोज कळमकर यांनी शाळेतील संगणकीकृत ग्रंथालय, उपलब्ध पुस्तके आणि डिजिटल बोर्डांचा विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रभावी वापर होत असल्याचे समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पंकज संघई यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री यशवंत गांभवा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## शिवाजी महाराज यांचे तैलचित्र सौंदर्यीकरण कामाचा शुभारंभ



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिरपूर जैन बसस्थानक चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे तैलचित्र लावलेल्या ठिकाणचे सौंदर्यीकरण कामाचा शुभारंभ प्रशासक सिंधु कांबळे यांच्या शुभहस्ते सोमवारी करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी रवींद्र चौधरी, सादीक सेठ बागवान, संजय जाधव, मा पं सं सदस्य गजानन इरतकर प्रशासक समितीचे सदस्य कलीम रेगीवाले, असलम परसुवाले, पप्पु देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. शिरपूर येथील बस स्थानक चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा लावलेल्या ठिकाणाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे. अशी मागणी गावातील शिवप्रेमीं कडुन करण्यात आली होती. ही मागणी ग्रामपंचायतच्या वतीने काही दिवसांपूर्वी मान्य करण्यात आली. त्यानुसार सोमवार २३ मार्च रोजी सौंदर्यीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

## 'संशोधन पद्धती' वर विशेष ऑनलाईन वेबिनार

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथिल स्थानिक ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था द्वारा संचलित, श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि IQAC सेलच्या संयुक्त विद्यमाने 'संशोधन पद्धती आणि क्षेत्रीय प्रकल्प' (Research Methodology and Field Project) या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन वेबिनारचे नुकतेच यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी संशोधनाचे महत्त्व विषद करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. जया भगत मॅडम यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या भाषणात या वेबिनारच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधनाच्या जागतिक प्रवाहात सामील करून घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण व्हावी आणि



त्यांनी आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक एम.ई.एस. कॉलेज, मेहकर येथील डॉ. वासुदेव गोलाईत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना 'संशोधन' या विषयातील तांत्रिक बाबी अत्यंत सोप्या भाषेत मांडल्या. ते म्हणाले की, 'पदवी (B.A./B.Com) आणि पदव्युत्तर (M.A./M.Com) स्तरावर केलेले हे छोटे प्रकल्प केवळ गुण मिळवण्यासाठी नसून, ते तुमच्या भविष्यातील मोठ्या संशोधनाचा पाया आहेत.' त्यांनी प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर प्रकाश टाकला क्षेत्रीय कार्याचे (Field Work) महत्त्व: पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष क्षेत्राला भेट देऊन गोळा केलेली माहिती अधिक विश्वासार्ह असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेटीवर भर द्यावा. माहितीचे संकलन व विश्लेषण: संकलित केलेली माहिती कशा प्रकारे वर्गीकृत करावी आणि त्यातून अचूक निष्कर्ष कसे काढावेत, याचे सविस्तर तंत्र त्यांनी समजावून सांगितले. अहवाल सादरीकरण: संशोधनाचा अहवाल लिहिताना तो तर्कशुद्ध आणि स्पष्ट असावा, जेणेकरून वाचणाऱ्याला विषयाचे गांभीर्य समजेल.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. जया भगत मॅडम यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी आपल्या भाषणात या वेबिनारच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संशोधनाच्या जागतिक प्रवाहात सामील करून घेणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण व्हावी आणि त्यांनी आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.


कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुनिल बोरचाटे यांनी केले तर डॉ. सचिन कडू यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी मुख्य मार्गदर्शक प्रा. डॉ. वासुदेव गोलाईत यांचे त्यांच्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, आयोजक समिती आणि विशेषतः तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या टीमचे कौतुक केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अत्यंत शिस्तीत सहभागी होऊन प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी विशेष आभार मानले. या वेबिनारला बी.ए., एम.ए., बी.कॉम आणि एम.कॉमच्या ६३ विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शवून या संधीचा लाभ घेतला. महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२१ ■ रविवार, २९ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### हमीभावाचा खेळखंडोबा

# सिंदी बाजार समितीतील तूर, हरभरा खरेदी कोलमडली

## १७ तारखेपासून केवळ चारच दिवस झाली खरेदीःढिसाळ नियोजनामुळे शेतकरी हवालदिल





**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** शासन हमीभाव देताय की शेतकऱ्यांची थट्टा करताय असा प्रश्न उपस्थित करत सिंदी कृषी उत्पन्न बाजार समितीतील तूर व हरभरा खरेदीचा अक्षरश; खेळखंडोबा झाल्याचे चित्र समोर आले आहे, १७ मार्चपासुन सुरु झालेली नाफेडची हमी भावाने हरभरा व तुर खरेदी केवळ चारच दिवस सुरळीत चालली इतर दिवस बंदच असल्याने नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची फजिती होते आहे.

आपला शेतमाल विक्रीसाठी आणावा म्हणून शेतकऱ्यांच्या मोबाईलवर संदेश गेल्याने आजुबाजुच्या खेड्यातुन किरायांने गाडी करुन हे शेतकरी शेतमाल घेऊन येतात मात्र येथे आल्यावर खरेदी बंद असल्याचे समजल्याने या शेतकऱ्यांची चांगलीच फजिती आणि गाडीभाडे,चढाई उतराईची हमालीसाठी मोजावे लागणाऱ्या पैशामुळे आर्थिक कोंडी होत आहे.

हंगाम २०२५-२६ मध्ये तूर व हरभरा पिकांची हमीभावाने खरेदी करण्यासाठी केंद्र शासनाने नाफेडमार्फत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून सिंदी कृषी उत्पन्न बाजार समितीत तूर व हरभरा खरेदीचा शुभारंभ मंगळवारी (ता.१७) ला मोठ्या दिमाखात करण्यात आला. शासनाने तुरीसाठी रुपये ८००० प्रतिक्विंटल तर चण्यासाठी रुपये ५८७५ प्रतिक्विंटल असा हमीभाव जाहीर केल्याने तुरीसाठी १२ तर हरभरासाठी ५४३ शेतकऱ्यांनी शासकीय हमीभावाने खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे.

मात्र मागील १२ दिवसांत केवळ चारच दिवस येथे नोंदणीकृत शेतकऱ्यांचा हरभरा घेण्यात आला. तर तुरीची अद्याप एक दाण्यांची पण खरेदी करण्यात आली नाही.

नोंदणीच्या अग्रक्रमानुसार शेतकऱ्यांना त्यांनी नोंदणी करताना दिलेल्या मोबाइल क्रमांकावर संदेशाद्वारे शेतमाल विक्रीसाठी समिती आवारात आणण्याबाबत कळविण्यात आले.जसजसे संदेश मिळु लागले तसतसे शेतकरी शेतमाल घेऊन दिलेल्या तारखेला बाजार समीतीत येऊ लागले मात्र येथे खरेदी बंदचा फलक पाहुन कोंडीत सापडलेले शेतकरी संताप व्यक्त करु लागले.

### खरेदी बंद राहण्याची कारणे

रजीस्टर नोंदनी पोर्टल कोलमडल्याने एकामागून एक दरदिवशी २० शेतकऱ्यांना माल आणण्याचे संदेश पोहचत गेले मात्र खरेदी दरदिवशी न झाल्याने गोंधळ झाला. शेतकऱ्यांनी संदेश पोहचल्याने विक्रीसाठी आणलेला शेतमाल नाईलाजाने खरेदीच्या जागी साठवल्याने खरेदीसाठी जागाच शिल्लक नाही. व्हेअरहाऊस ला खरेदी केलेला शेतमाल रिजेक्ट केला जात असल्याने खरेदीत अडचण. करीता शेतमाल खरेदीची जबाबदारी असणारे ग्रेडर स्वतः माल घेऊन व्हेअरहाऊसला जात असल्याने इथे ग्रेडींगसाठी कोणी नसल्याने खरेदी बंद ठेवावी लागत आहे. असे एक ना अनेक कारने बाजार समिती प्रशासन खरेदी बंद असल्याबाबत देत आहे.

हीच खरेदी सिंदी खरेदी-विक्री सहकारी सोसायटीकडे होती तेव्हा शेतकऱ्यांची अशी अडचण होत नोंव्हती. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ढिसाळ, नियोजन आणि कारभारामुळे हा फटका शेतकऱ्यांना बसतो आहे.

**देवीदास कोपरकर,** शेतकरी मौजा परसोडी

# वनविभाग झोपेत; जंगलातील आग शेतात धडकली

## -पोलीस पाटलांचे गहू पीक खाक; सिंचन साहित्य जळून लाखोंचे नुकसान

**आष्टी जनमाध्यम :** तालुक्यातील लिंगापूर शिवारात जंगलातील आगीने धुमाकूळ घालत एका शेतकऱ्याचे मोठे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. जंगलात लागलेली आग थेट शेतात शिरल्याने पोलीस पाटील प्रतीक आंबेकर यांच्या गव्हाच्या उभ्या पिकासह सिंचनाचे साहित्य जळून खाक झाले. या प्रकारामुळे शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.



माहितीनुसार, दि. २६ मार्च रोजी लिंगापूर गावालगतच्या जंगलात आग लागली होती. सुरुवातीला किरकोळ वाटणारी ही आग हळूहळू भीषण रूप धारण करत जंगल व्यापत गेली. आगीमुळे वन्य प्राणी जीव वाचवण्यासाठी शेताकडे धाव घेत होते. मात्र, या गंभीर परिस्थितीत वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर घटनास्थळी न पोहोचल्याने आग नियंत्रणाबाहेर गेल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

दि. २७ मार्चच्या मध्यरात्री हीच आग शेजारील शेतात पोहोचली. किन्हाळा येथील पोलीस पाटील प्रतीक आंबेकर यांच्या शेतातील गव्हाचे उभे पीक ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी पडले. यासोबतच शेतातील पाइप, स्प्रिंकलर व नोजल देखील जळून पूर्णतः नष्ट झाले. सकाळी शेतात गेल्यानंतर हा प्रकार उघड झाला.

वनविभागाने वेळीच उपाययोजना केल्या असत्या, तर हे नुकसान टळले असते. आवश्यक मनुष्यबळ व साधने दिली असती, तर आग आटोक्यात आली असती, अशी संतप्त प्रतिक्रिया आंबेकर यांनी व्यक्त केली. या घटनेनंतर शेतकऱ्यांनी तहसीलदार व वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन देऊन नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

तसेच घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, वनविभागाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचा आरोप पुन्हा एकदा पुढे आला असून, प्रशासनाने यावर तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# कोसुर्ला शिवारात भीषण अपघात; एक ठार, दोघे जखमी

**अल्लीपुर जनमाध्यम :** राळेगाव तालुक्यातील कोसुर्ला शिवारात शनिवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले. ट्रिपल सीट दुचाकीला भरधाव टिप्परने कट मारल्याने हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे.



सावंगी (पेरका) येथील हर्षल अरुण कन्नाके (२०), राहुल राजू कन्नाके (२८) आणि सौरभ विष्णू उईके (२०) हे तिघे युवक वायगाव (निपाणी) येथून आपल्या गावाकडे परतत होते. एमएच ३२/एल-६५९१ क्रमांकाच्या दुचाकीवरून येत असताना समोरून येणाऱ्या एमएच २२/एएन-२९११ क्रमांकाच्या टिप्परने अचानक कट मारला. यामुळे दुचाकी घसरून खाली पडली आणि चालक हर्षल कन्नाके यांच्या डोक्यावरून टिप्परचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातात जखमी झालेल्या राहुल कन्नाके व सौरभ उईके यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत अद्याप माहिती मिळू शकली नाही.

दरम्यान, कानगाव ते कोसुर्ला दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. रस्त्याची एक बाजू खोदून ठेवण्यात आल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच रस्त्यावर पाणी शिंपडल्याने दुचाकी घसरण्याचा धोका वाढल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

या घटनेची नोंद अल्लीपूर पोलिसांत करण्यात आली असून ठाणेदार विजयकुमार घुले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# लिफ्टच्या बहाण्याने दुचाकी लंपास; आरोपी काही तासांत जेरबंद

### हिंगणघाट गुन्हे प्रगटीकरण पथकाची झटपट कारवाई

**हिंगणघाट जनमाध्यम :** लिफ्ट मागण्याच्या बहाण्याने दुचाकी चोरणाऱ्या सराईत आरोपीला हिंगणघाट पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. या कारवाईमुळे शहरात पुन्हा एकदा पोलिसांच्या तत्परतेची छाप उमटली आहे.

पवनी (ता. हिंगणघाट) येथील स्पनील अंकुशराव बेलखेडे (वय ३६) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ४ मार्च रोजी ते शेतीच्या कामासाठी मजूर पाहण्याकरिता मोटारसायकल (क्र.एम एच ३२ ए ई ५३६२ ) घेऊन हिंगणघाट येथे येत होते. दरम्यान, छोटी वणी परिसरात एका अनोळखी इसमाने लिफ्ट मागितली. काही अंतरानंतर त्या इसमानेच गाडी चालवित फिर्यादीला मागे बसवून हिंगणघाटपर्यंत आणले.



शिवाजी मार्केट परिसरात फिर्यादी बाथरूमसाठी थांबले असताना, त्या इसमाने संधी साधत चावीसह मोटारसायकल लंपास केली. या घटनेनंतर फिर्यादीने स्वतः शोध घेऊनही काहीच धागादोरा न लागल्याने २५ मार्च रोजी हिंगणघाट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार अप. क्र. ४०५/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.

तपासाची सूत्रे हाती घेताच हिंगणघाट पोलीसांच्या गुन्हे प्रगटीकरण पथकाने सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तसेच मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपीचा माग काढत लिलेश्वर वामनराव वरभे (वय ३६, रा. सिरुड, ता. हिंगणघाट) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीस गेलेली यामाहा सॅलुटो मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशील नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात स.पो.नि. पद्माकर मुंडे, पो.हवा. नरेंद्र डहाके, श्रीकांत खडसे, जगदीश चव्हाण, सुनिल मेंढे तसेच इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

दरम्यान, नागरिकांनी अनोळखी व्यक्तींना लिफ्ट देताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### धुरात हरवतेय मुलांची भूक

# सिलेंडरअभावी चुलीवर पोषण आहार; महाबळा शाळेत विद्यार्थ्यांचे हाल

**सेलू जनमाध्यम :** एका बाजूला शासन मोठमोठ्या घोषणा करत विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार देण्याचे आश्वासन देते, तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात महाबळा येथील इंदिरा हायस्कूलमध्ये मुलांना चुलीच्या धुरात जेवणाची वाट पाहावी लागत आहे. गॅस सिलेंडरच उपलब्ध नसल्यामुळे पोषण आहार चुलीवर शिजवला जात असून प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फटका थेट विद्यार्थ्यांना बसत आहे.

पोषण आहार योजनेचा उद्देश विद्यार्थ्यांना गरम व स्वच्छ जेवण देण्याचा असताना महाबळा शाळेत मात्र योजनेचीच 'चूल' पेटलेली दिसते. चुलीवर स्वयंपाक करताना होणारा धूर, वाढणारा वेळ आणि अस्वच्छता यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचे चित्र आहे. लहानग्या विद्यार्थ्यांना वेळेवर जेवण मिळत नसल्याने त्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे.दरम्यान, पालक व ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून 'शासनाच्या योजना कागदावरच का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष घालून गॅस सिलेंडरची व्यवस्था करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

# आई माता मायच्या दारी घाणीचा विळखा; प्रशासन झोपेत

## -हिंगणीकरांचा संताप उसळला; अतिक्रमण हटवण्याची मागणी

**सेलू जनमाध्यम :** भक्ती, श्रद्धा आणि गावाच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या हिंगणी येथील आई माता माय मंदिर परिसरात सध्या घाणीचे अक्षरशः साम्राज्य पसरले असून, प्रशासनाच्या बेजबाबदार भूमिकेमुळे भाविकांच्या संतापाचा कडेलोट झाला आहे. ज्या दैवताच्या चरणी गावकरी संकटात धाव घेतात, त्याच पवित्र स्थळाची आज झालेली दुर्दशा पाहून ग्रामस्थांच्या भावना दुखावल्या आहेत.

मंदिरालगतच्या मोकळ्या जागेवर काहींनी बिनधास्त अतिक्रमण करून ती जनावरे बांधण्याची जागा बनवली आहे. परिणामी, शेण, कचरा आणि दुर्गंधीने परिसर व्यापला असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना नाकाला रुमाल लावून जावे लागत आहे. श्रद्धेच्या वातावरणावर अस्वच्छतेचा हा काळा डाग उमटला आहे.



शारदीय आणि चैत्र नवरात्रोत्सवात हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. गावातील प्रत्येक शुभकार्याची सुरुवात याच मंदिरातून होते. मात्र, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे आज या पवित्र स्थळाचे रुपांतर अक्षरशः कचराकुंडीत झाले आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी कुंभकर्णी झोपेत असल्याचे दिसून येते. अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची इच्छाशक्ती प्रशासनात नाही का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला आहे,

मंदिर परिसरातील अतिक्रमण तात्काळ हटवावे, घाण करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी आणि परिसराचे सुशोभीकरण करावे; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

ज्या मातेने गावाचे रक्षण केले, तिच्या मंदिराची ही अवस्था आम्ही सहन करणार नाही. ही आमच्या श्रद्धेची आणि अस्मितेची लढाई आहे.

संतप्त ग्रामस्थ, हिंगणी

# राज्यात पीएनजी प्रक्रियेला गती; खत उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा सुरू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई जनमाध्यम :** जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने संतुलित आणि प्रभावी धोरण राबवले असून, यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची महत्त्वाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या संकटकाळात महाराष्ट्रात पीएनजी (पाईप्ड पद्धतीने वितरण) प्रक्रियेला गती देण्यात येत असून, खतांच्या उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा घेतला जात असल्याची माहिती त्यांनी दिली.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या वतीने महत्त्वाचे मुद्दे मांडले. बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, मंत्रिमंडळ सचिव तसेच विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल उपस्थित होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल व मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनीही सहभाग नोंदविला.

सध्याच्या कठीण काळात पश्चिम आशियातील युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक संकटाचा परिणाम देशातील नागरिकांवर होऊ नये, यासाठी केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभारही मानले. राज्यातील उपाययोजनांबाबत माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यात खतांची उपलब्धता पुरेशी असून त्यावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. आगामी खरीप हंगाम लक्षात घेता शेतकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी कडक कारवाई केली जात असून, 'अ?ग्रीस्टॅक' प्रणालीद्वारे शेती व्यवस्थापन अधिक पारदर्शक करण्याचे काम सुरू आहे. केंद्र सरकारच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करत राज्यात पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) वितरणाला गती देण्यात आली आहे. 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'च्या माध्यमातून प्रक्रिया सुलभ केली जात असून उद्योग व नागरी सुविधा मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, जगातील अनेक देश या संकटामुळे मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहेत. फिलिपाईन्स, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान यांसारख्या देशांनी कठोर निर्बंध लागू केले आहेत. मात्र भारतात परिस्थिती तुलनेने नियंत्रणात ठेवण्यात यश आले आहे.

इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने उत्पादन शुल्कात केलेली कपात ही सर्वसामान्यांसाठी दिलासादायक ठरली आहे. 'राष्ट्र प्रथम' या तत्त्वानुसार केंद्राने आर्थिक भार स्वतः उचलत नागरिकांना संरक्षण दिले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# दिव्यांग क्रीडेत भावेश मंगरूळकर अव्वल; तालुकास्तरावर प्रथम क्रमांक

### हिंगणघाट तालुक्यातील विद्यार्थ्याची उल्लेखनीय कामगिरी; सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव



**हिंगणघाट जनमाध्यम :** संजय गांधी मराठी उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवीचा विद्यार्थी भावेश विठ्ठलराव मंगरूळकर याने दिव्यांग धावणे स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा वडनेर येथील नि. मु. घटवाई विद्यालयात पार पडली.

भावेशने जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले असून त्याच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सावसागडे, गटशिक्षणाधिकारी राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष टाकळे यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष के. के. वाघमारे, सचिव वैशाली वनीकर, मुख्याध्यापिका बांदुरकर मॅडम, वर्गशिक्षक चंद्रकांत वैद्य यांच्यासह शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या. भावेशने आपल्या यशाचे श्रेय क्रीडा शिक्षक बी. एल. खांडरे व आई-वडिलांना दिले आहे.

# ट्रकला दुचाकीची भीषण धडक; तरुणाचा जागीच मृत्यू

### राष्ट्रीय महामार्गावरील हिंगणघाटातील घटना

**हिंगणघाट जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्गावर छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड समोरील पुलावर शुक्रवारी (२७ मार्च) रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्पण अमोल वानखेडे हा तरुण आपल्या दोन मित्रांसह दुचाकीने महामार्गावरून जात होता. दरम्यान, त्यांच्या दुचाकीची समोरून जात असलेल्या ट्रकला जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की, अर्पण वानखेडे याचा जागीच मृत्यू झाला. त्याच्या अकाली मृत्यूने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघातात इंदिरा गांधी वार्ड येथील प्रियांश पोहणीकर आणि बसंतरसिंग टाक हे दोघे किरकोळ जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले. सुदैवाने त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे समजते.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

## गंगुबाई ईखार यांचे निधन



**सिंदी रेल्वे :** येथील कोलबा स्वामी वार्ड परिसरातील ज्येष्ठ नागरिक गंगुबाई विठोबा ईखार (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्यावर जांभुळघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्या राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षक सुरेश ईखार यांच्या मातोश्री होत.

## श्रावण तिरपुडे यांचे निधन

**वर्धा :** तालुक्यातील उमरी (मेघे) येथील प्रगतिशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते श्रावण तिरपुडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. शेती क्षेत्रात नवनवीन प्रयोग करत त्यांनी प्रगतिशील शेतकरी म्हणून ओळख निर्माण केली होती. तसेच सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. गावातील विविध उपक्रमांमध्ये ते नेहमी पुढाकार घेत असत. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि. २८ मार्च) सकाळी स्थानिक हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कांद्याच्या दरात घसरण

## सरकारने तातडीने बाजार हस्तक्षेप योजना राबवावी



**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या आर्थिक संकटात आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांद्याच्या दरात झालेल्या तीव्र घसरणीमुळं शेतक-यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी शेतक-यांच्या कांद्याला सरासरी केवळ ३०० ते ८०० रुपये प्रति क्विंटल इतका कमी दर मिळत असून हा दर उत्पादन खर्चाच्या निम्म्याहूनही कमी आहे. यामुळं सरकारनं तातडीनं बाजार हस्तक्षेप योजना राबवावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेनं केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र देण्यात आलं आहे. कांद्याचा उत्पादन खर्च १५०० ते १८०० प्रति क्विंटल इतका असताना सध्याच्या दरात शेतक-यांना काढणी व वाहतूक खर्च देखील भरून काढणे अशक्य झाले आहे. परिणामी, शेतक-यांवर मातीमोल विक्री करण्याची वेळ आली असून अनेक ठिकाणी शेतकरी कांदा रस्त्यावर फेकण्याच्या परिस्थितीत पोहोचले आहेत. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठवून केंद्र सरकारची म्हणजेच बाजार हस्तक्षेप योजना तातडीने राज्यात लागू करण्याची ठाम मागणी केली आहे. सध्याच्या परिस्थितीत कांद्याच्या दरात ५० टक्यांपेक्षा जास्त घसरण झाली असून ही परिस्थिती स्पष्टपणे Distress Sale ची आहे. त्यामुळे MIS लागू करण्यासाठी आवश्यक अटी पूर्ण झालेल्या आहेत. MIS (बाजार हस्तक्षेप योजना) लागू झाल्यास शासन बाजारात खरेदीदार म्हणून उतरल्यामुळे बाजारातील घबराट विक्री थांबेल, कांद्याच्या दरात स्थैर्य येईल आणि व्यापा-यांकडून होणारी दरकपात नियंत्रित होईल. त्यामुळे शेतक-यांना किमान उत्पादन खर्च परत मिळण्यास मदत होईल. ही योजना अति तातडीने लागू केली नाही तर राज्यभर तीव्र आंदोलने छेडली जातील, असा इशारा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. राज्य शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने निर्णय घेउन कांदा उत्पादक शेतक-यांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे

# गव्हाला चांगला उतारा, पण बाजारभावात दणका

## शेतक–यांची आर्थिक कोंडी, कमी दराने खरेदी

**यवतमाळ :** यंदा पुरेशी थंडी व पोषक वातावरणामुळे रब्बी गहू पिकाचे चांगले उत्पादन झाले आहे. एकीकडे भरघोस उत्पादनामुळे शेतकरी खुश असताना बाजारपेठेतील गव्हाच्या दरात मोठी घसरण झाली आहे. त्यामुळे उत्पादन खर्च निघणार किंवा नाही, याची गहू उत्पादक शेतक-यांना चिंता वाढली आहे.आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या



युद्ध परिस्थितीचा कृषी क्षेत्रावर व्यापक परिणाम होत असून, शेतमालाच्या घसरलेल्या दरामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. केळी, टरबूज, कांदा, द्राक्ष यांसह गहू उत्पादकांनाही मोठा आर्थिक फटका बसला आहे. चालू रब्बी हंगामात कृषी मूल्य आयोगाने गव्हाच्या हमीभावात केवळ १४० रुपयांची वाढ करत तो दोन हजार ५८५ रुपये प्रति क्विंटल एवढा निश्चित केला आहे. मात्र, प्रत्यक्ष बाजारपेठेत गव्हाला केवळ दोन हजार १०० ते दोन हजार २०० रुपये दर मिळत असल्याने शेतक-यांची आर्थिक कोंडी झाली आहे. दर केवळ दोन हजाराच्या घरात-यंदा पोषक हवामानामुळे गव्हाचे उत्पादन चांगले झाले असून, काही ठिकाणी एकरी १५ ते २० क्विंटल उत्पादन मिळत आहे. मात्र, वाढत्या उत्पादनासोबतच बाजारभाव घसरल्याने उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे. गेल्या वर्षी तीन ते ३ हजार ५०० रुपये प्रति क्विंटल दर मिळणा-या गव्हाला यंदा अवघा २ हजार रुपयांच्या आसपास दर मिळत आहे.विशेष म्हणजे, पंजाब आणि हरियाणा राज्यांमध्ये एफसीआयमार्फत हमीभावाने गहू खरेदी केली जाते. मात्र महाराष्ट्रात अशा प्रकारची प्रभावी खरेदी व्यवस्था नसल्याने शेतक-यांना खासगी व्यापा-यांच्या दयेवर अवलंबून राहावे लागत आहे. नाफेडकडूनही गहू खरेदीसाठी कोणतीही ठोस यंत्रणा उभारण्यात आलेली नाही. महाराष्ट्रात गव्हाचे क्षेत्र सुमारे १५ लाख २७ हजार हेक्टर इतके मोठे असतानाही शासकीय पातळीवर हमीभाव खरेदी केंद्रांचा अभाव असल्याने शेतक-यांना हमीभावाचा लाभ मिळत नाही.भावांतर योजनेचा लाभ द्यावा-राज्य शासनाने तातडीने गहू खरेदी केंद्र सुरू करावीत किंवा बाजारभाव व हमीभावातील सुमारे ६०० रुपयांचा फरक भावांतर योजनेद्वारे शेतक-यांना द्यावा. केंद्र व राज्य सरकारने याबाबतीत तातडीने पावले उचलावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मनीष जाधव यांनी केली आहे. एकरी खर्च १० हजार-गहू उत्पादनासाठी एकरी खर्च नउ हजार ८८२ इतका आला आहे. त्यात नांगरणी खर्च एक हजार ५०० रुपये, पेरणी यंत्र खर्च ८०० रुपये, गहू बियाणे (एक बॅग) दोन हजार २०० रुपये, डीएपी खत एक हजार ३५० रुपये, तणनाशक ३०० रुपये, मजुरी ५०० रुपये, युरिया (२ बॅग)५३२ रुपये, फवारणी (बुरशीनाशक/कीटकनाशक) ७०० रुपये, हार्वेस्टिंग (कापणी) दोन हजार रुपये असा प्रति एकर एकूण खर्च किमान नउ हजार ८८२ रुपये आला आहे.

# आता प्लास्टिकही महागले

**नवी दिल्ली :** इराण-अमेरिका युद्धामुळे केवळ पेट्रोल-डिझेलच नाही, तर आता तुमच्या स्वयंपाकघरातील प्लास्टिकचे डबे, बादल्या आणि अगदी औषधांच्या किमतीही कडाडणार आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे कच्च्या मालाच्या (पालिमर) किमतीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील कंपनी ने २५ मार्च रोजी प्लास्टिकच्या कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ केल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार आहे.बिझनेस टुडेच्या वृत्तानुसार, होमोपालिमर पालीप्रोपाईलीनच्या किमतीत प्रति टन ४,००० रुपयांची, तर कोपालिमर आणि पालीइथिलीनच्या दरात प्रति टन ७,००० रुपयांची वाढ झाली आहे. या महिन्यात तब्बल चार वेळा (१, ३, ११ आणि २५ मार्च) हे दर वाढवण्यात आले आहेत. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे, प्लास्टिक दरवाढीचा फटका आरोग्य क्षेत्रालाही बसणार आहे. असोसिएशन ऑफ इंडियन मेडिकल डिव्हाईस इंडस्ट्री नुसार, होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे प्लास्टिकच्या खर्चात ५०-६० टक्के वाढ झाली आहे. यामुळे इंजेक्शनच्या सिरिंज, आयव्ही बाटल्या, डायग्नोस्टिक किट आणि औषधांचे पॅकेजिंग, सर्जिकल हातमोजे यांच्या किमती एप्रिल महिन्यापासून वाढू शकतात.तज्ज्ञांच्या मते, कंपन्या अचानक किमती वाढवण्याऐवजी उत्पादनाचे वजन किंवा आकार कमी करू शकतात. उदाहरणार्थ, १० रुपयांच्या बिस्किट पुड्याची किंमत तीच ठेवून त्यातील बिस्किटांची संख्या कमी केली जाउ शकते.

# ‘पल्स २०२६’ मुळे आरोग्य क्षेत्राला नवी दिशा

## परिषदेत १५ सामंजस्य करार, ७२० कोटींची गुंतवणूक-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :**विकसित महाराष्ट्र २०४७ च्या दिशेने राज्याने आरोग्य क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे, पल्स २०२६ परिषदेमुळे आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान व संशोधन आणि नवकल्पनांना चालना मिळाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी कार्यक्रमाच्या समारोपानंतर पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी श्री.फडणवीस यांनी माहिती दिली.

मुख्यमंत्री म्हणाले की, दोन दिवस चाललेल्या या परिषदेत एकूण १५ सामंजस्य करार (MoUs) करण्यात आले. त्यापैकी ३ करारांद्वारे सुमारे ७२० कोटी रुपयांची गुंतवणूक निश्चित करण्यात आली, तर १२ करार धोरणात्मक भागीदारीचे होते. परिषदेत १० हून अधिक देशांतील १३० पेक्षा जास्त तज्ञ आणि ३००० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला. ही केवळ परिषद आयोजित केली नाही, तर पुढील दशकात महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेची दिशा निश्चित करण्यात आल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.उद्योग विभागामार्फत करण्यात आलेल्या करारांमध्ये ’बल्क ड्रग्ज पार्क’साठी सॅव्वी केअर आणि फार्मॅक्स या कंपन्यांकडून एकत्रित ५२० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. तसेच निप्रो फार्मा पॅकेजिंग कंपनीने २०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा करार केला आहे. यामुळे राज्यातील औषधनिर्माण क्षेत्र अधिक बळकट होणार आहे.मुख्यमंत्री म्हणाले की, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाअंतर्गत ११ महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. यात रायल कालेज ऑफ फिजिशियन्स अँड सर्जन्स ऑफ ग्लासगो आणि युनिव्हर्सिटी ऑफ लीड्स यांच्यासोबत वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षणासाठी सहकार्य करार करण्यात आले. तसेच मँचेस्टर युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्याने क्रीडा औषधनिर्माण क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र उभारण्यात येणार आहे.




कर्करोग व अत्याधुनिक उपचारांसाठी ’४बेस केअर’ सोबत कॅन्सर इंटेलिजन्स प्रकल्प, तर मेड्ट्रानिक सोबत स्ट्रोक सेंटर ऑफ एक्सलन्स उभारण्यासाठी करार करण्यात आले. यामुळे राज्यातील विशेष उपचार सुविधा अधिक सक्षम होणार आहेत.पर्यटन व मानसिक आरोग्य क्षेत्रातही महत्त्वाचे करार झाले. सायप्रस चेम्बर ऑफ कामर्स अँड इंडस्ट्री सोबत मेडिकल टुरिझमला चालना देण्यासाठी सहकार्य करार करण्यात आले असून, ग्रॅव्हिटस फाउंडेशनच्या माध्यमातून बाल मानसिक आरोग्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात येणार आहेत. या परिषदेदरम्यान वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन, एआय-आधारित शिक्षण, रोबोटिक शस्त्रक्रिया तसेच उद्योग-अकॅडेमिया सहकार्य यावर सखोल चर्चा झाली. विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, आरोग्य संस्था आणि उद्योग क्षेत्रासोबत महत्त्वाचे करार करण्यात आले.

# *उद्योग परवानग्यांमध्ये सुलभतेसोबत महाराष्ट्रात वीजदरातही टप्प्याटप्प्याने घट होणार*-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्रात उद्योग सुलभतेसाठी परवानगी प्रक्रियेत मोठे बदल करण्यात आले असून ३३ परवानग्यांपैकी २० परवानग्या स्व-प्रमाणनावर (Self Certification) आणण्यात आल्या आहेत. उर्वरित १३ परवानग्यांची संख्याही लवकरच कमी करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रामकी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज आणि एमआयडीसी यांच्या संयुक्तविद्यमाने बल्क ड्रग पार्क व लाइफ सायन्सेस हब उभारण्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उद्योग प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योजकांना विश्वासपूर्वक सांगितले की, राज्यातील वीजदर पुढील पाच वर्षांत



टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. सध्या असलेला १०.८८ प्रति युनिट हा वीजदर पुढील पाच वर्षात १५.८७ पैसे इतका न होता कमी होउन ९.९७ पर्यंत येणार असून २०२८-२९ पर्यंत महाराष्ट्र देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला. उद्योगांना सुलभ वातावरण देण्यासाठी मैत्री पोर्टलला सर्वसमावेशक अधिकार देण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मैत्री पोर्टलमुळे एकाच ठिकाणी सर्व परवानग्या मिळणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवत प्रत्येक अर्जाचा मागोवा घेता येणार असून, ठराविक कालावधीत सेवा न दिल्यास संबंधित यंत्रणांवर कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.हरित व शाश्वत पायाभूत सुविधा उभारण्यावर भर देण्यात येणार असून कामन इफ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लांट (CETP), सर्क्युलर इकानामी आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून उद्योगांना ग्रीन बनविण्याचा प्रयत्न होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या प्रकल्पात एमएसएमई उद्योगांनाही प्रोत्साहन देण्यात येणार असून मोठ्या उद्योगांसोबत त्यांच्या पुरवठादारांनाही सवलती देण्याची शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. शासन आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीत जागतिक दर्जाची, परवडणारी आणि स्पर्धात्मक उद्योग परिसंस्था निर्माण करण्यावर भर दिला जाणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. राज्यातील औद्योगिक धोरण अधिक गतिमान करत नो नानसेन्स बिझनेस इज अवर स्ट्रॅटेजी इन बिझनेस ही भूमिका घेत स्थिर व पारदर्शक वातावरण निर्माण करण्याचा शासनाचा निर्धार आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

# सौरउर्जा वापरकर्त्या घरगुती ग्राहकांना फटका बसणार?

**नागपूर/प्रतिनिधी :**राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) महावितरणच्या याचिकेवर नुकतेच वीज दर जाहिर केले आहे. त्यात महाराष्ट्र नवीकरणीय उर्जा धोरण २०२५-२६ अंतर्गत घरगुती सौरउर्जा ग्राहकांसाठी नेट मीटरिंग सुविधांमध्ये महत्त्वाचे बदल प्रस्तावित करण्यात आले असून, यामुळे लहान ते मोठ्या सौर प्रकल्पधारकांवर परिणाम होण्याची शक्यता सौर उर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. नव्या प्रस्तावानुसार नेट मीटरिंगचा लाभ आता केवळ ३ किलोवॅटपर्यंतच्या (सिंगल फेज) सौर यंत्रणांपुरता मर्यादित ठेवण्याची शक्यता आहे. या मर्यादेपलीकडे असलेल्या ग्राहकांना सध्याचे काही फायदे कमी होणार आहेत. दरम्यान ३ ते १० किलोवॅट ग्राहकांना नवीन अटी लावण्यात आल्या आहे. त्यानुसार ३ ते १० किलोवॅट क्षमतेच्या ग्राहकांना आता मासिक बँकिंग पद्धती लागू होणार असून, त्यांना यापुढे ग्रिड सपोर्ट चार्जेस भरावे लागणार आहेत.सध्या १० किलोवॅटपर्यंतच्या अनेक ग्राहकांना हे शुल्क लागू होत नव्हते. तर १० किलोवॅटपेक्षा जास्त क्षमतेवर नेट बिलिंग सक्ती केली जाणारर आहे. त्यानुसार १० किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या ग्राहकांसाठी नेट मीटरिंगचा पर्याय बंद करून नेट बिलिंग प्रणाली लागू करण्याचा प्रस्ताव आहे. या ग्राहकांना मासिक बँकिंग सुविधा मिळेल, मात्र त्यांनाही ग्रिड सपोर्ट चार्जेस भरावे लागतील. सध्याच्या धोरणात अशा ग्राहकांसाठी ५ मेगावॅटपर्यंत नेट मीटरिंगची सुविधा उपलब्ध होती, अशी माहिती ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे (एआयआरईए) सल्लागार सुधीर बुधे यांनी दिली.

स्मार्ट मीटरद्वारे वेळनिहाय मोजणी नव्या धोरणात उर्जा वापर आणि निर्मितीची मोजणी टाइम ऑफ डे (टी. ओ. डी. मिटर) स्लाटनुसार केली जाणार आहे. ही प्रक्रिया केवळ स्मार्ट मीटर किंवा टीओडी मीटरद्वारेच होणार आहे. तर अतिरिक्त वीज दर व बाजारभावानुसार खरेदी केल्यानुसार लागेल. ग्राहकांनी महावितरणच्या ग्रीडमध्ये पाठवलेली अतिरिक्तसौर उर्जा संबंधित वितरण कंपनीकडून त्या महिन्यातील टीओडी स्ल?टनुसार सरासरी जी- डॅम बाजारभावाने खरेदी केली जाणार आहे. म्हणजेच वीज दर बाजारभावावर अवलंबून असतील, असेही बुधे म्हणाले.



**स्लॉट बदलाची मर्यादा आणि उर्जा समायोजन-** नव्या प्रस्तावानुसार ३ किलोवॅटपर्यंतच्या यंत्रणांसाठी सध्याची स्लॅब-समायोजन पद्धत लागू राहणार नाही. मात्र ३ ते १० किलोवॅट दरम्यान ती मर्यादित स्वरूपात लागू असेल. १० किलोवॅटपेक्षा जास्त क्षमतेच्या ग्राहकांसाठी ही सुविधा उपलब्ध नसेल. या बदलांमुळे लहान सौर प्रकल्पधारकांना काही प्रमाणात दिलासा मिळत असला तरी मध्यम व मोठ्या घरगुती ग्राहकांना नेट मीटरिंगचे फायदे कमी होण्याची शक्यता आहे. तसेच ग्रिड सपोर्ट चार्जेस आणि टीओडी आधारित दरांमुळे वीज खर्च वाढू शकतो, असेही बुधे म्हणाले.

# वन विभागाला ई-गव्हर्नन्समध्ये राज्यात दुसरे स्थान

## अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात महाराष्ट्र वन विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात दुसरे स्थान पटकावले आहे. विभागाला २०० पैकी १७१.५ गुण मिळाले असून डिजिटल कारभारात तो अग्रगण्य विभागांपैकी एक ठरला आहे. या यशाबद्दलचा पुरस्कार वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्वीकारला. सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. राज्यात ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आला. वेबसाईट, आपले सरकार, ई-ऑफिस, डॅशबोर्ड, चॅटबाट, एआय/ब्लाकचेन आणि जीआयएस या सात निकषांवर विविध विभागांचे मूल्यमापन करण्यात आले. विविध विभागांच्या कामगिरीचे मूल्यमापन क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाकडून १२७ निकषांवर करण्यात आले. या यशाबद्दल अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर म्हणाले की, वन विभागाने गेल्या काही काळात ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून ठोस बदल घडवून आणले आहेत. ई-ऑफिसमधील प्रक्रिया सुलभ करून निर्णयक्षमता वाढवली, तर रिअल-टाइम डॅशबोर्डमुळे कामकाजावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य झाले. एआयच्या मदतीने वनाग्नी पूर्वसूचना आणि वन्यजीव निरीक्षण अधिक सक्षम झाले असून, यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रात जलद प्रतिसाद देणे शक्य झाले आहे. तसेच जीआयएस जिओ-पोर्टलमुळे वैज्ञानिक पद्धतीने नियोजन करण्यास मदत होत आहे. या सर्व उपक्रमांमुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुख सेवा देण्यात वन विभागाने महत्त्वाची झेप घेतली आहे.

# १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणा-या विभागांचा गौरव

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील नागरिकांना सर्व शासकीय सेवा आणि योजनांचा लाभ एकाच माध्यमातून मिळण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्राचे ध्येय साध्य करताना प्रशासकीय कामात पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हता या त्रिसुत्रीच्या आधारावर सर्व विभागांनी काम करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सह्याद्री अतिथिगृह येथे ’१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा’ कार्यक्रमांतर्गत निवडलेली उत्कृष्ट कार्यालये व सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या उत्कृष्ट कार्यालय प्रमुखांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देउन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान तथा संस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह सर्व मंत्रालय विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव सचिव यांच्यासह १५० दिवसांच्या ई- गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणारे प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष व दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले की, माहिती तंत्रज्ञान विभागाने ’एक राज्य, एक पोर्टल’ ही संकल्पना राबवावी. शासनाच्या अनेक वेगवेगळ्या संकेतस्थळांमुळे नागरिकांचा होणारा संभ्रम टाळण्यासाठी सर्व सेवांचे एकत्रीकरण असलेले एकच पोर्टल माहिती व तंत्रज्ञान विभागाने तयार करावे. सर्व शासकीय सुविधा नागरिकांना सहजरित्या उपलब्ध होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने प्राधान्याने काम करावे.महाआयडी (ग्ठुण्ठु क्ष्ऩ) प्रणालीच्या माध्यमातून नागरिकांसाठी एक विशिष्ट ’महाआयडी’ तयार करण्यात येईल. आणि केवळ एका आयडीच्या आधारावर सर्व शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. ज्यामुळे डेटा फिल्टर होउन सेवांचा दुरुपयोग थांबण्यास मदत होईल. यासोबतच अनेक विभागांचे कामकाज हे बहुतेक प्रमाणात ई- ऑफीस झाले असून ते ’लो पेपर’ वरून ’नो पेपर’वर नेण्यासाठी मुख्य सचिवांनी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा, अशा सूचनाही यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. या कार्यक्रमा दरम्यान माहिती तंत्रज्ञान विभागाने तयार केलेल्या ’महासारथी’ या संकेतस्थळाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महासारथी संकेतस्थळाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री म्हणाले की, हे संकेतस्थळ म्हणजे आपली डेटा बँक आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून सर्व शासकीय डेटा एकत्रित करण्यात आला असून त्याद्वारे एकमेकांशी संवाद साधता येईल. तसेच नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्सचेंज तयार करत असून ज्यामुळे डाटा ड्रिव्हन निर्णय प्रक्रिया राबविता येणे शक्य होणार आहे.एआय आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे अहोरात्र अविरत सेवा देण्यासाठी जनरेटिव्ह एआय आणि चॅटबाट्स, ब्लाकचेन यांचा वापर वाढवण्यावर अधिक भर दिला जाणार आहे. या अंतर्गत कृषी विभागाने तयार केलेले ’महा-विस्तार’ हे एआय अप्लिकेशन देशात पथदर्शक ठरले असून, त्यात आदिवासी भाषांचाही समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शेतीशी संबंधित सर्व माहिती, हवामान अंदाज याबाबत देखील माहिती उपलब्ध आहे. इतरही विभागांनी कृषी विभागाने तयार केलेल्या या महा-विस्तार एआय प्रणाली सारखे एआयचा उपयोग करून काही वेगळे करण्यायसाठी प्रयत्न करावेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी यावेळी सांगितले. प्रशासकीय कामगिरीत गेल्या १५०-२०० दिवसांत ४२ विभागांचा आढावा घेउन या काळात साधारण ४०,००० पदांवर अधिकारी - कर्मचा-यांना पदोन्नती देण्यात आली आहे, ज्यामुळे कर्मचा-यांच्या कामात गतिमानता आली आहे. तसेच त्क्र्त्र प्लॅटफ?र्मवर महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आहे. १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्सच्या कालावधीतील पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला असल्याने सर्व शासकीय विभागाचे आणि सहभागी कर्मचा-यांचे आणि सेवाकर्मींचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी अभिनंदन केले.

# पंतप्रधान मोदींनी देशातील सर्वात मोठ्या विमानतळाचे उद्घाटन केले

## नोएडा येथे म्हणाले- युद्धाच्या संकटातून देशाला एकजूट होउन लढायचे आहे



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दुपारी १२.३० वाजता यूपीमधील जेवर येथे नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले. हे सध्या भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील दुसरे सर्वात मोठे विमानतळ आहे. ४ टप्पे पूर्ण झाल्यावर हे आशियातील सर्वात मोठे विमानतळ बनेल. पंतप्रधान मोदींनी जनसभेदरम्यान लोकांना इस्त्रायल-अमेरिका आणि इराणमधील युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाशी एकजुटीने लढण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, काल सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे. चांगली चर्चा झाली आहे. देशवासियांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला शांत मनाने, धैर्याने, एकजुटीने या संकटाचा सामना करायचा आहे. हे संपूर्ण जगाला त्रास देणारे संकट आहे.पंतप्रधान म्हणाले-देशातील सर्व राजकीय पक्षांना मी आग्रहाने सांगू इच्छितो की, संकटाच्या काळात अशा गोष्टी बोलणे टाळा, ज्या देशासाठी हानिकारक आहेत. देशाला नुकसान पोहोचवणा-या कृतींना देशाची जनता कधीही माफ करणार नाही. पहिल्या टप्प्यात ३३०० एकरमध्ये टर्मिनल आणि धावपट्टी (रनवे) बांधण्यात आली आहे. एका धावपट्टीसह या टर्मिनलची वार्षिक क्षमता ३ कोटी प्रवाशांना हाताळण्याची असेल. यासाठी सुमारे ११ हजार कोटी रुपये खर्च आला आहे. नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ ५२ चौरस किलोमीटरमध्ये बांधण्याचा प्रस्ताव आहे. सध्या चीनमधील बीजिंग डेक्सिंग आंतरराष्ट्रीय विमानतळ आशियातील सर्वात मोठे आहे. त्याचे क्षेत्रफळ ४७ चौरस किलोमीटर आहे. तथापि, पूर्ण होण्यासाठीची अंतिम मुदत २०४० आहे. नोएडा विमानतळ प्राधिकरणाशी संबंधित अधिका-यांनी सांगितले की, विमानतळावरून मे महिन्यापासून विमानांची उड्डाणे सुरू होउ शकतात. विमानतळाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य हे आहे की प्रवेश केल्यानंतर २० मिनिटांपेक्षा कमी वेळेत बोर्डिंग शक्य आहे. पंतप्रधान मोदींनी नोएडा विमानतळाचे माडेल पाहिले. अधिका-यांकडून त्याची सविस्तर माहिती घेतली. पंतप्रधान मोदींनी नोएडा विमानतळाची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्री योगी त्यांच्यासोबत उपस्थित होते.पंतप्रधान म्हणाले- पश्चिम आशियामध्ये युद्ध सुरू आहे. यामुळे अनेक देशांमध्ये संकट निर्माण झाले आहे. भारत मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आणि वायू युद्धग्रस्त भागातून आयात करतो. त्यामुळे सरकार असे प्रत्येक पाउल उचलत आहे, ज्यामुळे सामान्य कुटुंबे आणि आपल्या शेतकरी बांधवांवर ओझे पडू नये. १४० कोटी देशवासीयांनी या संकटाचा एकजुटीने सामना करावा. मोदी म्हणाले की, नोएडाला पूर्वी अंधश्रद्धेमुळे त्याच्या नशिबावर सोडून देण्यात आले होते. खुर्ची जाण्याच्या भीतीने पूर्वीचे सत्ताधारी येथे येण्यास घाबरत होते. जेव्हा येथे सपा सरकार होते आणि मी नोएडाला येण्याचा कार्यक्रम आखला, तेव्हा जुने मुख्यमंत्री इतके घाबरले होते की ते त्या कार्यक्रमाला आलेच नाहीत. मलाही घाबरवण्याचा प्रयत्न करण्यात आला, सांगितले गेले- नोएडाला जाउ नका. नुकतेच पंतप्रधान बनले आहात.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ‘उडान’ पुढील आव्हाने

जगात आखाती युद्धाचा पेच कायम राहणार नाही. हे लक्षात घेऊनच केंद्र सरकारने देशांतर्गत हवाई वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या उडान योजनेच्या सुधारीत स्वरूपास मंजुरी दिली. यानुसार २०२६-२७ ते २०३५-३६ या काळात दहा वर्षांकरीता २८,८४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला, उडान म्हणजे ‘उड़े देश का नागरिक’ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली योजना. तिचा उद्देश हवाई प्रवास सर्वसामान्य नागरिकांना परवडण्याजोगा, सुखसोयींनी युक्त असा करण्याचा होता. या योजनेचे सर्वात लक्षणीय लाभ म्हणजे प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढवणे, कपात केलेला खर्च आणि सामान्य नागरिकांनाही विमान प्रवासाचा लाभ मिळवून देण्याचा होता. योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः सध्याच्या युद्धाच्या पेच प्रसंगात जेथे विमान प्रवास अत्यंत अडचणीचा झाला आहे आणि दुबई, कतार आणि कुवेत या देशांच्या हवाई मार्गावर प्रचंड संकटाचे ढग घोंघावत आहेत त्यावेळी ही योजना निश्चितच लोकांना पर्वणी वाटेल. प्रवास परवडण्याजोगा झाल्यामुळे अगदी सामान्य लोकही विमान प्रवास करू लागतील अशी यामागे मोदी यांची इच्छा होती. कपात केलेल्या भाड्यात सामान्य प्रवाशांना हवाई प्रवास सोयीचा झाला. पण याचा सर्वात मोठा लाभ असा आहे की, द्वितीय आणि तृतीयस्तरीय शहरांत विमान प्रवास सहज होत असल्यामुळे आर्थिक परिणाम सकारात्मक झाले. देशात ज्या हवाई पट्टया आहेत त्यांचा अजून वापर झाला नाही. त्यांना या योजनेद्वारा मुख्य प्रवाहात आणण्याचा उद्देश आहे आणि तो साध्य होणार आहे. पण या योजनेचा सर्वाधिक लाभ हा आहे, की स्थानिक रोजगाराच्या संधी पर्यटन, विमान कंपन्या आणि वाहतूक क्षेत्रात सहज उपलब्ध होणार आहेत. ईशान्येकडे भारताचे राज्यकर्ते लक्ष देत आहेत. उडान ही प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठीची योजना होती. देशात ३९८ उपयोगात न आलेल्या धावपट्टया होत्या आणि त्यांचा वापर आता या योजनेतून केला जात आहे. या योजनेने दोन हेतू साध्य होणार आहेत. एक म्हणजे सामान्य नागरिकही विमान प्रवास करू शकतात, हा विश्वास मोदी यांनीच सामान्यांना दिला. दुसरी गोष्ट म्हणजे लहान शहरातील धावपट्टया आता वापरात येत आहेत. पूर्वी लहान शहरात प्रवासाच्या सोयी नव्हत्या. मुंबई, पुणे, हैदराबाद, चेन्नई आणि कोलकता अशा शहरांनाच हा लाभ मिळत होता. तो आता नांदेड, परभणी, औरंगाबाद आणि अशा कितीतरी शहरांना मिळत आहे. हाच या योजनेचा उद्देश आहे. या योजनेचा उद्देश स्पष्ट आहे. तो म्हणजे आम नागरिकाला विमान प्रवासाचा परवडणाऱ्या किंमतीत करून द्यायचा आणि आता तर देशभरातील १०० विमानतळ विकसित करण्याचा सरकारचा हेतू आहे. भारत २०४७ मध्ये विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे आणि त्यासाठीच ही योजना आहे. भारताच्या विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेत ही योजना मैलाचा दगड ठरेल यात काही शंका नाही. ही योजना २०१६ मध्येच सुरू करण्यात आली होती आणि काल तिला केंद्राने योजनेच्या सुधारित आवृत्तीसाठी २८,८४० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. या योजनेच्या मार्गात महत्त्वपूर्ण अडसर आहे हे निश्चित. त्यातील एक आहे ते म्हणजे छोट्या शहरांत विमान प्रवासांसाठी कमी मागणी असते आणि त्यामुळे विमान कंपन्या या मार्गांवर चालवण्यास सहसा तयार नसतात. तिसरे आव्हान आहे ते म्हणजे अनेक लहान शहरातील धावपट्ट्या या फारच छोट्या असतात. त्यामुळे येथे वैमानिकांची कसोटी असते. अनेक विमानतळांवर प्राथमिक सुखसोयी नसतात आणि त्यामुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. हे पर्वतीय प्रदेश आहेत, उदाहरणार्थ हिमाचल प्रदेश किंवा कारगील या ठिकाणी उंचावरून जावे लागते आणि तेथे अनेक विमाने क्षतिग्रस्त झाली आहेत. आकडेवारी असे सांगते, की २०२५च्या सुरुवातीला ६० टक्के विमान प्रवास लोकांनी केला आणि हा सर्व नॉन मेट्रो शहरांतून केला. म्हणजे लहान शहरातून. उडान योजनेद्वारे १.५६ कोटी लोकांना हवाई सफर घडली आहे, ती केवळ २०२५ या वर्षात, तर ५ लाख लोक दैनंदिन देशभर प्रवास करतात. आता ही काही आकडेवारी देण्याचे स्थळ नव्हे, पण २०१४ मध्ये २०९ मार्ग होते ते २०२४ मध्ये ६०० झाले. यावरून योजनेचा आवाका लक्षात यावा. अमृतसर, लखनऊ आणि थिरूवनंतपुरम येथून दुबईला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली, याचे कारण आहे ती उडान योजना; परंतु अजूनही देशातील फक्त तीन टक्के लोक विमानाने प्रवास करतात. गेल्या दहा वर्षांत भारतीय आकाश खूप गजबजून गेले आहे. सरकारचा दृष्टिकोन आहे, की २०४७ पर्यंत विमानतळांची संख्या ३५० ते ४०० पर्यंत जाईल. विकसित भारताच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे. नवी मुंबई विमानतळ आता कार्यरत आहे आणि त्यामुळे मुंबई विमानतळावरील बरीचशी वाहतूक हटली आहे. त्यामुळे दोन्ही विमानतळ पुरेशा क्षमतेने कार्यरत आहेत. उडान योजनेत काही आव्हाने समोर आहेत. एक तर वैमानिकांचा तुटवडा आणि लहान मार्गांवर पायाभूत सुविधांची वानवा हे आव्हान मोठे आहे. यावर मात करायचे सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्रुटी दूर होतील आणि विमान कंपन्या पुन्हा जोमात येतील. लहान शहरांना मोठ्या शहरांशी हवाई वाहतुकीने जोडले जातील अशी चिन्हे आहेत.

# केरळमध्ये युडीएफचे पारडे जड !

**पराभवामुळे मनोबल खच्ची झालेल्या कॉंग्रेसला मोठ्या प्रमाणात गळती लागेल आणि त्याचा फायदा भाजपाला मिळेल. म्हणूनच भाजपाची प्रगती रोखण्यासाठी, अल्पसंख्य समाज यावेळी विधानसभा निवडणुकीत, कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला मोठ्या प्रमाणात मतदान करु शकेल.**




येत्या ९ एप्रिल रोजी केरळ विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डावी लोकशाही आघाडी आणि कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडी, या प्रतिस्पर्धी आघाड्यांसाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. २०१६ आणि २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत लागोपाठचा विजय मिळवणाऱ्या डाव्या लोकशाही आघाडीला या खेपेस विजयाची हॅट्ट्रिक साधण्याची चांगली संधी आहे तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत नेत्रदीपक कामगिरी करून सुद्धा, कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीला २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्याने, या खेपेस तरी संयुक्त लोकशाही आघाडीला विजय मिळतो का, ते पहावे लागेल.

संयुक्त लोकशाही आघाडीच्या दृष्टीने जमेची बाब म्हणजे २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत या आघाडीने, केरळमधील लोकसभेच्या एकूण २० जागांपैकी १८ जागांवर विजय मिळविला होता. तर उरलेल्या दोन जागांपैकी एक जागा डाव्या लोकशाही आघाडीला आणि एक जागा भाजपाला मिळाली होती. अशाप्रकारे केरळ मधील मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीचा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला होता. त्या शिवाय मध्यंतरी केरळमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीने सपाटून मार खाल्ला होता. या पार्श्वभूमीवर केरळ विधानसभा निवडणुकीचा आढावा घ्यावा लागेल.

केरळमध्ये अल्पसंख्यांक समाजाची मते लक्षणीय असल्याने बऱ्याच मतदार संघात निवडणुकीचे गणित हा समाज ठरवत असतो. विशेषत: उत्तर केरळमधील मलप्पुरम, कोझीकोडे, कन्नुर, कासारगोड या जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्य समाजाची संख्या २५ टक्क्यांच्या आसपास आहे. हे जिल्हे कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीतील घटक पक्ष असलेल्या इंडियन युनियन मुस्लिम लीगचे बालेकिल्ले मानले जातात. मात्र मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीला गेल्या दोन विधानसभा निवडणुकांत या जिल्ह्यांमध्ये चांगला पाठिंबा मिळाला होता. या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत जर कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीचा, लागोपाठ तिसऱ्यांदा पराभव झाला तर केरळमधील अल्पसंख्य समाजाला अशी भीती वाटू शकेल की, पराभवामुळे मनोबल खच्ची झालेल्या कॉंग्रेसला मोठ्या प्रमाणात गळती लागेल आणि त्याचा फायदा भाजपाला मिळेल. म्हणूनच भाजपाची प्रगती रोखण्यासाठी, अल्पसंख्य समाज, या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत, कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला मोठ्या प्रमाणात मतदान करु शकेल. गमतीची गोष्ट म्हणजे, भाजपाचा धाक दाखवून अल्पसंख्य समाजाची मते आपल्याकडे आकर्षित करण्याचा जोरदार प्रयत्न कॉंग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून सध्या सुरू आहे.

भाजपा आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट यांच्यात टॅसिट अंडरस्टॅंडिंग असल्याचा आरोप कॉंग्रेसकडून केला जात आहे तर कॉंग्रेस ही भाजपाची ’बी’टीम असल्याचा आरोप मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून केला जात आहे. हे आरोप अल्पसंख्य समाजाची मते आपल्याकडे वळवण्यासाठी केले जात आहेत, याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही. २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत अल्पसंख्य समाजाने कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला भरभरून पाठिंबा दिला, मात्र २०१६ आणि २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत अल्पसंख्य समाजाने मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीला मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. ही गोष्ट लक्षात घेतली तर या खेपेच्या विधानसभा निवडणुकीत अल्पसंख्य समाज, कुणाच्या पाठीशी उभा रहाणार यावर निवडणुकीचा निकाल मोठ्या प्रमाणात अवलंबून राहील.

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्रिशूर मतदारसंघात विजय मिळवून, भाजपाने डावी लोकशाही आघाडी आणि संयुक्त लोकशाही आघाडी या प्रमुख प्रतिस्पर्धी आघाड्यांना आश्चर्याचा धक्का दिला होता. त्यानंतर तिरुवनंतपुरम महानगर पालिका निवडणुकीत विजय मिळवून भाजपाने आणखी एक धक्का दिला होता. या पार्श्वभूमीवर या खेपेस भाजपाला लाईटली घेण्यास, दोन्हीही आघाड्या तयार नाहीत. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत, दारुण पराभव झाल्यानंतर, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीकडून हिंदू समाजाची मते मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे केरळमधील मुस्लिम समाजाला असे वाटत आहे की, डावी लोकशाही आघाडी आता पुर्वीसारखी, भाजपाच्या विरोधात आक्रमक राहिलेली नाही. त्याचा परिणाम म्हणजे केरळ मधील मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीच्या बाजूने झुकू शकेल.

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी डाव्या लोकशाही आघाडीने सपाटून मार खाल्ल्यानंतर, मध्यंतरी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही डाव्या लोकशाही आघाडीची कामगिरी अतिशय खराब झाली. २०२१ मध्ये झालेल्या केरळ विधानसभा निवडणुकीत, विधानसभेच्या एकूण १४० जागांपैकी मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीला ९९ जागांवर विजय मिळाला होता, तर कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला ४१ जागांवर विजय मिळाला होता. या पार्श्वभूमीवर या खेपेची विधानसभा निवडणूक, डाव्या लोकशाही आघाडीला जड जाण्याची शक्यता आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला १११ विधानसभा क्षेत्रांमध्ये आघाडी मिळाली होती. डाव्या लोकशाही आघाडीला केवळ १८ विधानसभा क्षेत्रांत आघाडी मिळाली होती, तर भाजपाला ११ विधानसभा क्षेत्रांत आघाडी मिळाली होती. त्या निवडणुकीत कॉंग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीला ४५ टक्के मते मिळाली होती तर मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या लोकशाही आघाडीला ३३.६ टक्के मते मिळाली होती. याचा अर्थ दोन आघाड्यांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत मोठा फरक होता. म्हणुनच या खेपेस कॉंग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीला विजय मिळण्याची दाट शक्यता आहे.

**अभय गोखले**

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. चार वर्षापूर्वी ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जातात. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएचडी मिळवली.



१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. दरम्यान त्यांच्या ‘गांधरीचे डोळे’ आणि ‘मध्यरात्र’ या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी.रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# इंधन टंचाईवर उपाययोजना

इराण अमेरिका युद्धामुळे भारतात जी इंधन टंचाई निर्माण झाली आहे त्यावर सरकार लक्ष ठेवून आहेच पण सोबतच देशातील नागरिकांनीही ह्या संकटसमयी सरकारच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. सरकार जर काही कठोर निर्णय लागू करत असेल तर नागरिकांनीही कोणताही गोंधळ किंवा विरोध न करता सरकारच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. ह्या संकटकाळात विरोधी पक्ष आणि काही सरकारविरोधी संघटना किंवा लोकं सरकारविरुद्ध नागरिकांमध्ये असंतोष पसरविण्याचा प्रयत्न करतील. कोरोना महामारीमध्ये नागरिकांनी त्याचा अनुभव घेतला आहेच. पण तरीही सरकारने त्यावेळी नागरिकांच्या सहकार्याने कोरोना महामारीला यशस्वीपणे लढा देऊन देशात शांतता आणि स्थिरता राखली होती. ह्यावेळीही नागरिकांनी हाच समजूतदारपणा दाखविण्याची गरज आहे.

युद्धात आखाती देशांतील तेलविहिरी आणि कारखान्यांवर हल्ले झाले आहेत. त्यांच्या डागडुजीसाठी आणि तेलपुरवठा पूर्ववत होण्यासाठी एक ते पाच वर्षांचा काळ लागू शकतो. दरम्यान आखाती देशांत युद्ध किंवा अशांतता सुरूच राहिल्यास जगभर इंधन टंचाई आणखी वाढू शकते. भारताची प्रचंड लोकसंख्या बघता भारताला त्याची सर्वाधिक झळ बसेल. पण नागरिकांनी जर संयम राखला आणि सरकारला खंबीरपणे सहकार्य केले तर ह्या टंचाईचा सामना भारत सहजपणे करू शकेल. सरकारने सुद्धा भविष्याचा वेध घेऊन आतापासूनच पावले उचलण्याची गरज आहे आणि तशी त्याची सुरुवात झालीही असेलच. एक सजग आणि जबाबदार नागरिक म्हणून सरकारला काही सूचना करत आहे त्याचा सरकारने आणि नागरिकांनीही विचार करावा.

खाजगी चारचाकी वाहनांना म्हणजे कार्सना पुढील तीन महिन्यांपर्यंत पेट्रोल डिझेल देणे बंद करावे. कारची सरासरी इंधन खपत प्रति लीटर १५ ते २० किमी असते. त्यामुळे खाजगी कार्ससाठी पेट्रोल डिझेल देणे बंद केल्यास लाखो लीटर इंधनाची बचत होऊ शकते. प्रत्येक कारधारकाकडे दुचाकी आहेतच. आपल्या कामासाठी ते दुचाकीचा वापर करू शकतात. दुचाकीची

## माझेही मत

सरासरी इंधन खपत प्रति लीटर ४० ते ९० किमी असते. हे लाखों लीटर इंधन वाचले तर देशाच्या अर्थव्यवस्थेवरील ताण कमी होईलच शिवाय कुणालाही दैनंदिन कामासाठी लागणाऱ्या इंधनाची टंचाई होणार नाही. दुचाकींना सुद्धा एकावेळी जास्तीत जास्त २०० रुपयाचे पेट्रोल मिळेल असा नियम करावा. त्यामुळे पेट्रोलची साठेबाजी होणार नाही. कुणी पेट्रोलची साठेबाजी करताना आढळल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करावी. जिल्हाधिकाऱ्यांनी शहरातील प्रत्येक पेट्रोल पंपावरील उपलब्ध साठ्याची माहिती रोज घ्यावी आणि जनतेला अफवांपासून दूर ठेवण्यासाठी रोज उपलब्ध साठ्याची माहिती जनतेला देत राहावी. जेणेकरून जनतेत पॅनिक निर्माण होणार नाही. सध्या गरज नसताना लोकं गाड्यांच्या टाक्या फुल भरून घेत आहेत आणि ज्यांना खरोखरच गरज असते त्यांना पेट्रोल मिळत नाही आहे. त्यामुळेच पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगा लागत असल्याचे दिसून येते. वरील उपाययोजना केल्यास जनतेत पॅनिक निर्माण होणे बंद होऊन प्रत्येकाला आवश्यक तेवढे पेट्रोल मिळेल आणि पेट्रोल पंपावर लागणाऱ्या रांगा बंद होतील.

सरकारी पातळीवर वरील उपाययोजना करण्यासोबतच जनतेनेही स्वतःवर काही बंधने स्वतःहून घातली पाहिजेत. कारण नसताना दुचाकीने फिरणे बंद केले पाहिजे. जवळच्या कामासाठी जाताना दुचाकीचा वापर न करता पायी गेले पाहिजे. बाहेरच्या कामासाठी जाताना दुचाकीऐवजी पब्लिक ट्रान्सपोर्टचा म्हणजे ऑटोरिक्षा, सिटी बस, मेट्रो आदींचा वापर केला पाहिजे. शाळा महाविद्यालयात दुचाकीने जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी बसने गेले पाहिजे. कारधारकांनी, श्रीमंत असो वा सर्वसाधारण, कारऐवजी दुचाकीचा वापर केला पाहिजे. कित्येक कारधारक ऑफिसला जाताना किंवा कोणत्याही कामासाठी जाताना कार घेऊन जातात. कारधारक एकटाच असतो आणि त्या एकट्यासाठी हजारो लीटर पेट्रोल डिझेलची नाहक खपत होत असते. हे हजारो लीटर पेट्रोल डिझेल वाचले तर पुढील किमान तीन ते चार महिने देशासमोरील इंधन टंचाईचा प्रश्न मिटू शकते. एवढेच नव्हे तर कोरोना काळासारखे पर्यावरण शुद्धीसाठी हातभारही लागू शकतो. नुसत्या तोंडाच्या वाफा दवडून देशप्रेमाचे प्रदर्शन करण्यापेक्षा आज कठीण समयी थोडे त्याग करून सुद्धा खऱ्या देशप्रेमाची पावती देता येऊ शकते.

**अतुल सोमेश्वर कावळे**
मो. क्र.९७३०५३५१९६

# युद्ध: सत्तेचा माज की हव्यास

सध्या सुरू असलेले अमेरिका, इजराइल, इराण युद्ध म्हणजे मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी आणि मानव जातीच्या नाशासाठी उचललेले अविचारी पाऊल आहे. राजकारणात प्रत्येकाला सत्ता हवी असते. मग ते राजकारण गावातील असो की राष्ट्राचे असो, त्या सत्तेचा स्वतःच्या स्वार्थासाठी, महत्त्वकांक्षासाठी आणि अहंकारासाठी उपयोग केला जातो. ज्या जनतेच्या जीवावर हे नेते सत्तेत येतात त्यांचा विचार यात गौण असतो. अहंकार ,ईर्षा आणि हव्यास या तीन मानवी दोषांची एकत्रित परिणती म्हणजे आताचे युद्ध. अमेरिका एक प्रगत देश आहे. जगात तिचा दबदबा आहे. तरीसुद्धा अमेरिकेला पूर्ण जग आपल्याच अधिपत्याखाली असावे असे वाटते. इराण काही धुतल्या तांदळासारखा नाही, पण त्याला स्वतःचे रक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. आक्रमण करणारे दोन्ही देश अन्वस्त्रधारी आहेत. पण इराणने अणुबॉम्ब बनवू नये म्हणून आक्रमण करतात हेच मुळी आश्चर्य आहे. सुरुवातीला या युद्धाचे गांभीर्य कोणालाच नव्हते. पण जसजसे युद्ध लांबू लागले तसे त्याचे गांभीर्य वाढले. आणि काळजी वाटू लागली. आखाती देशात बरेच भारतीय नागरिक नोकरी निमित्त आणि मुले शिक्षणासाठी आहेत.

या युद्धात पाकिस्तान मध्यस्थता करणार हे ऐकून हसावे की रडावे हेच कळले नाही. परंतु एक मात्र खरे की या परिस्थितीचा फायदा उचलून पाकिस्तान भारत विरोधात नक्की काहीतरी आगळिक करू शकतो. त्यासाठी सर्वांनी सावध राहणे गरजेचे आहे. पहिल्या महायुद्धात दुसऱ्या महायुद्धाची बीजे पेरली गेली आणि दुसऱ्या महायुद्धात तिसऱ्या महायुद्धाचे बीज पेरले गेले. ही युद्धबंदी लवकर होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करूया. हे असेच युद्ध सुरू राहिले तर ते युद्ध समुद्रात सुरू होईल. आणि त्याचे चटके संपूर्ण जगालाच सोसावे लागतील. आणि युद्धबंदी झाली तरी त्याचे परिणाम अनेक वर्ष भोगावे लागतील. संपूर्ण अर्थव्यवस्था खीळखिळी होईल, रोगराई पसरेल. निसर्गाने एवढे भरभरून मानवाला दिले, तरी मनुष्याचा हव्यास मात्र संपत नाही. कर्मफल सिद्धांत त्याचे काम करेलच, पण तोपर्यंत उशीर झालेला असेल.



**माधवी पत्की**

जनमाध्यम

# “प्रेमातून पेटलेला सूड चेहरा जाळून ओळख पुसण्याचा प्रयत्न!

## तासलोट जंगलातील खुनाचा थरार उघड”

**जनमाध्यम प्रतिनिधी**
(विवेक वानखडे जि.प्र.)




यवतमाळ - तासलोटच्या जंगलात सापडलेला एक विद्रूप, कुजलेला मृतदेह चेहरा जाळलेला ओळख पुसण्याचा स्पष्ट प्रयत्न आणि मागे उरलेला फक्त एक प्रश्न ही महिला कोण? आणि तिचा इतक्या निर्दयी पद्धतीने खून कोणी केला? या थरकाप उडवणाऱ्या प्रश्नांची उत्तरे अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या काटेकोर तपासातून समोर आली आहेत. ही घटना केवळ खूनाची नाही, तर मानवी संवेदनांना हादरवून टाकणारी क्रूरता उघड करणारी आहे.

पोलीस ठाणे कळंब हद्दीतील तासलोट जंगलात आढळलेला मृतदेह इतका कुजलेला होता की, ओळख पटवणे जवळपास अशक्य झाले होते. वन्य प्राण्यांनी केलेले नुकसान आणि चेहरा जाळल्यामुळे हा गुन्हा कायमच गूढ राहील, असेच सुरुवातीला वाटत होते. मात्र पोलीसांनी हार मानली नाही.पोलीस अधीक्षक कुमार चिता यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल ८ विशेष पथके तयार करण्यात आली. तपासाची व्याप्ती जिल्ह्याबाहेर, राज्या बाहेरही नेण्यात आली. ४० हजार मोबाईल क्रमांकांचा डंप डेटा, १९६ सीसीटीव्ही कॅमेरे, शेकडो बेपत्ता महिलांची नोंद, गावोगावी चौकशी, हॉस्पिटल, लॉज, बसस्थानके, धार्मिक स्थळे एकही धागा सुटू नये यासाठी पोलीसांनी अक्षरशः जमीन-आस्मान एक केले. आणि अखेर त्या मृतदेहाला नाव मिळाले राणी किशोर वानखडे (वय 26, रा. चापडोह, जि. यवतमाळ) तपास जसजसा पुढे गेला, तसतसे सत्य अधिक भयंकर होत गेले. आरोपी सतीश रमेश कश्यप (वय 20), पाणीपुरी विक्रेता, याने 10 मार्च रोजी राणीला पुण्यातून यवतमाळला आणले. 11 मार्च रोजी दिवसभर तिच्यासोबत फिरल्यानंतर संध्याकाळी तासलोटच्या निर्जन जंगलात नेले आणि तिथेच प्रेम संबंधातील वादाचा शेवट रक्तरंजित झाला. दुपट्ट्याने गळा आवळून खून त्यानंतर चाकूने गळ्यावर आणि पोटावर वार मृतदेह दगडाने विद्रूप आणि शेवटी पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न इतकी निर्दयी योजना आखून हा खून करण्यात आला होता. पुरावे नष्ट करण्यासाठी मृत महिलेचे सर्व साहित्यही जाळण्यात आले. या संपूर्ण कृत्यात एका विधीसंघर्षग्रस्त बालकानेही साथ दिल्याचे उघड झाले आहे.

या सर्वानंतर आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आणि तासलोटच्या जंगलात दडलेले गूढ अखेर उघड झाले. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व कळंब पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. तासलोटच्या जंगलात घडलेली ही घटना केवळ एक खून नाही, तर समाजातील वाढत्या असंवेदनशीलतेचा आणि विकृत मानसिकतेचा आरसा आहे. प्रेम संबंधाच्या नावाखाली होत असलेले हिंसाचाराचे प्रकार चिंताजनक असून, अशा घटनांवर कठोर सामाजिक व कायदेशीर नियंत्रणाची गरज अधोरेखित होते.

# २९-३० मार्चला यवतमाळ महोत्सवात सांस्कृतिक मेजवानी !


## नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा – पालकमंत्री संजय राठोड व जिल्हाधिकारी विकास मीना यांचे आवाहन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ जिल्हा कृषि महोत्सव 2026 अंतर्गत 29 व 30 मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांची भव्य मेजवानी आयोजित करण्यात आली असून, जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री संजय राठोड व जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दि. 29 मार्च रोजी “शिवशंभो गर्जना” हा छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमावर आधारित लोकप्रिय सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे. शिवगीते, पोवाडे, गोंधळ तसेच संबळ व दिमडीच्या गजरात सादर होणारा हा कार्यक्रम मावळ्यांचा इतिहास जिवंत करणार आहे. तरुणाईमध्ये राष्ट्रप्रेम व शिवभक्तीची भावना जागवणारा हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे. तसेच दि. 30 मार्च रोजी प्रसिद्ध गायक सलमान अली यांचा लाईव्ह हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. इंडियन आयडॉल सीझन 10 विजेता असलेले सलमान अली आपल्या सुरेल गायनातून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार असून, हिंदी चित्रपट गीतांसह लोकप्रिय गाण्यांची मैफल रंगणार आहे. या दोन दिवसांत महोत्सव परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी अपेक्षित असून, नागरिकांसाठी सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनाचा



अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. कृषि, तंत्रज्ञान, शासकीय योजना व स्थानिक उत्पादनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने महोत्सवाचे महत्त्व अधिक वाढले आहे. पालकमंत्री संजय राठोड व जिल्हाधिकारी विकास मीना यांनी जिल्ह्यातील नागरिकांना कुटुंबासह उपस्थित राहण्याचे आवाहन करत, महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## • वेचक

### झाडगावात सामाजिक दायित्वातून रामनवमीला विवाह सोहळा संपन्न



राळेगाव – तालुक्यातील झाडगाव येथे सामाजिक बांधिलकी जपत रामनवमीच्या पावन पर्वावर गरजू कुटुंबातील मुलीचा विवाह सोहळा उत्साहात पार पडला. गावाचे पोलीस पाटील प्रशांत वाणी यांच्या पुढाकारातून व गावकऱ्यांच्या आर्थिक सहकार्याने हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो. यंदा राजू मांढरे यांच्या कन्या दीपाली हिचा विवाह या माध्यमातून करण्यात आला. दीपालीच्या वडिलांचे काही वर्षांपूर्वी निधन झाल्याने कुटुंब आर्थिक अडचणीत होते. ही बाब लक्षात घेऊन गावकऱ्यांनी एकत्र येत सुमारे एक लाख रुपयांचा खर्च उचलत विवाह सोहळा पार पाडला. विशेष म्हणजे, गावातील नागरिक स्वतःच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे उपस्थित राहून सोहळ्याला हातभार लावतात.



### जिजाऊ-सावित्री-रमाईंचा वारसा जोपासा; महिलांनी सशक्त व्हावे : ॲड. वैशाली डोळस

पुसद - देशमुख महिला मंडळातर्फे नवजीवन कॉन्व्हेंट, शंकरनगर येथे आयोजित महिला दिन कार्यक्रमात “२१ व्या शतकातील स्त्री : स्वातंत्र्य, समानता व सक्षमीकरण” या विषयावर ॲड. वैशाली डोळस यांनी मार्गदर्शन केले. जिजाऊ, सावित्रीबाई व रमाई यांच्या विचारांचा वारसा स्वीकारून महिलांनी आत्मनिर्भर व सक्षम बनावे, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैशाली संजय देशमुख होत्या. यावेळी शुभांगी पानपट्टे, आशाताई कदम, अर्चना जगताप, रूपाली सूर्यवंशी, संगीता जाधव आदी उपस्थित होते. जिजाऊ वंदना सादर करण्यात आली तसेच नगरसेविका शिल्पा देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

### आर्णी SIR प्रक्रियेत गोंधळ! “आमचा BLO कोण?” नागरिकांचा सवाल

आर्णी - निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू असली तरी आर्णी शहरात याबाबत मोठा गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. कार्यक्रमाचा अर्धा कालावधी उलटून गेला असतानाही अनेक नागरिकांना आपल्या प्रभागातील BLO (बूथ लेव्हल ऑफिसर) कोण आहे, याचीच माहिती नसल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. SIR प्रक्रियेत BLO ची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. प्रत्येक घरापर्यंत जाऊन मतदार यादीतील माहिती तपासणे, दुरुस्ती करून घेणे आणि नागरिकांना मार्गदर्शन करणे ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र आर्णीत BLO ची वारंवार बदली होत असल्याच्या चर्चा असून, नेमकी कोणत्या प्रभागात कोण कार्यरत आहे हे स्पष्ट होत नसल्याने नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

# व्यसन सोडा, आयुष्य जोडा : गणेश धर्माळे यांचे आवाहन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात प्रगती सोबत वाढणाऱ्या व्यसनाधीनते मुळे समाजासमोर गंभीर संकट उभे राहिले असून, तरुणांनी व्यसनापासून दूर राहून सुदृढ आयुष्य घडवावे, असे आवाहन गणेश धर्माळे यांनी केले. ते आसरपेंड येथील पीएम श्री अनुसूचित जाती मुलींच्या शासकीय निवासी शाळेत आयोजित ‘व्यसनमुक्ती काळाची गरज’ या प्रबोधन कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका एस. एस. घरजारे होत्या. प्रमुख उपस्थितींमध्ये डॉ. देवश्री काळबांडे, एम. एम. लंबे, एम. आर. अमृते, पी. पी. नाईक, डी. आर. पवार व पी. एम. राठोड यांचा समावेश होता. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकात सहाय्यक शिक्षक संदीप चव्हाण यांनी शाळेतील विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी डॉ. देवश्री काळबांडे यांनी व्यसनमुक्तीवरील भजने सादर करून वातावरण भारावून टाकले. धर्माळे यांनी व्यसनाचे दुष्परिणाम स्पष्ट करताना दारू, तंबाखू, ड्रग्स यांसोबतच मोबाईल, इंटरनेट, जुगार व अति खरेदी हीदेखील व्यसनांची रूपे असल्याचे सांगितले. व्यसनामुळे शरीर, कुटुंब, संपत्ती आणि नातेसंबंध उद्ध्वस्त होतात, असे त्यांनी नमूद केले. महिलांनी नशा मुक्तीच्या लढ्यात पुढाकार घेऊन समाजात जागृती करावी, असेही त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींनी नशामुक्त भारताची सामूहिक शपथ घेतली. सूत्रसंचालन साक्षी धवसकर व आराध्या कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्वाती भालेराव यांनी केले.



### भाजप केळापूर तालुका सरचिटणीसपदी प्रदीप भनारकर

पांढरकवडा - केळापूर तालुक्यात भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बळकटीसाठी प्रदीप नागोराव भनारकर यांची तालुका सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी तालुका अध्यक्ष आनंद वैद्य, भाजयुमो अध्यक्ष बालू जाधव, शेखर जयस्वाल आदी उपस्थित होते. भनारकर हे पक्षातील सक्रिय व जुने कार्यकर्ते असून त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. भोई समाज क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष, भाजपा मच्छीमार सेलचे जिल्हाध्यक्ष तसेच पंचायत राज व ग्रामविकास विभागाचे तालुका संयोजक म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे केळापूर तालुक्यात भाजप संघटना अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मानवतेची सेवा हीच खरी इबादत हाच ईद चा खरा संदेश : डॉ. शहरेयार खान

## मोफत हृदयरोग रुग्णांची तपासणी शिबिर संपन्न, युथ मोहमेन्ट जमाते इस्लामी हिंद चा उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - युथ मुव्हमेंट महाराष्ट्र तर्फे रमजान ईद निमित्त मोफत हृदय रोग निदान शिबीर घेण्यात आठवडी बाजार सराफ लाईन येथे घेण्यात आले. या शिबिरात नागपुर चे नामवंत हृदयविकार तज्ञ डॉ. शहीरियार खान ( एमबीबीएस , एमडी ,डी एम कार्डीयो लॉजिस्ट नागपुर) यांनी अत्यंत उत्कृष्ट आणि समर्पित सेवा दिली. या शिबिरात सुमारे 55 हून अधिक रुग्णांनी आपली तपासणी करून घेतली. विशेष म्हणजे डॉ . खान यांनी सकाळी अकरा वाजल्यापासून तब्बल 6.30 तास अखंड, न थांबता रुग्णांची तपासणी केली.

प्रत्येक रुग्णाची त्यांनी अत्यंत बारकाईने, संयमाने आणि आपुलकीने तपासणी केली. अनेक रुग्ण गंभीर हृदयविकाराच्या समस्यांनी त्रस्त होते. मात्र डॉक्टरांच्या योग्य मार्गदर्शनामुळे त्यांच्या मनात नवीन आशा निर्माण झाली. हाच खरा मानवतेचा संदेश आणि



ईदचा खरा अर्थ आहे. सर्वात विशेष बाब म्हणजे डॉ. खान ईद निमित्त आपल्या परिवारासाठी वेळ देण्यासाठी आले होते . त्या वेळे तून वेळ वेळ काढून त्यांनी ही सेवा दिली. सुरुवातीला फक्त 2 तासांचा वेळ अपेक्षित होता, मात्र रुग्णांची संख्या पाहून त्यांनी पूर्ण 6.30 तास सेवा दिली. त्यांचा हा सेवाभाव अत्यंत कौतुकास्पद आहे.शिबिरात आलेले रुग्ण तपासणीनंतर अत्यंत समाधान आणि आनंद व्यक्त करत होते. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी हे शिबिर मोठा दिलासा ठरले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी युथ मूव्हमेंटच्या सर्व कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली. साबीर नाईक, आलम सर, शाहीद खान, आजीम अली, अकरम शेख, मुस्तकीम भाई, माज सोदागर वकार अहमद रेहान खान यांचे विशेष योगदान राहिले. शेवटी जमाते इसलामी हिन्द चे अध्यक्ष जहीरुद्दीन काजी यांनी परमेश्वर - अल्लाह त्यांच्या या सेवेला कबूल करो आणि त्यांना या जगात व पारालौकीक जिवना उत्तम मोबदला देओ अशी दुवा केली .मानवता ची सेवा हीच खरी इबादत उपासना आहे हाच ईदचा खरा संदेश या शिबीरातुन देण्यात आला . मेड लाईफ फार्मा चे वकार अहेमद , नेहाल खान तसेच डॉ खांबाडकर यांचे विशेष सहकार्य या शिबिरास लाभले त्यांचे साबीर नाईक यांनी आभार व्यक्त केले.

# इंधनटंचाईने शेतकरी हैराण !

## मशागतीवर परिणाम, प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - तालुक्यात इंधनटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पेट्रोल व डिझेल सहज उपलब्ध नसल्याने अनेकांना रात्रभर पंपांवर रांगा लावाव्या लागत आहेत. तरीही पुरेसे इंधन मिळत नसल्याने पेरणीपूर्व मशागत, फवारणी यांसारखी महत्त्वाची शेतीकामे ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत.बियाणे व खतांच्या वाढत्या किमतीमुळे आधीच खर्च वाढलेला असताना, इंधनअभावी शेतीचे नियोजन कोलमडत आहे. त्यातच अलीकडील वादळी वाऱ्यामुळे गहू व हरभरा पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे.प्रशासनाकडून इंधनपुरवठा सुरळीत असल्याचा दावा केला जात असला, तरी



प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याने या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. स्थानिक पातळीवर शेतकरी वर्गात नाराजी वाढत आहे. युवा शेतकरी बाळू पाटील नरवाडे यांनी सांगितले की, “इंधन उपलब्ध असल्याचे सांगितले जाते, मात्र प्रत्यक्षात मिळत नाही. रात्रभर रांगेत उभे राहण्याची वेळ येत आहे. तातडीने इंधनपुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.” एकूणच, इंधनटंचाई, महागाई आणि नैसर्गिक आपत्ती या तिहेरी संकटात शेतकरी अडकला असून, तात्काळ उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे.

# साखरा चौफुलीवर गतिरोधक बसविण्यास सुरुवात !

## दै. जनमाध्यमच्या बातमीचा प्रभाव ; आ. तोडसाम यांच्या पाठपुराव्याला यश

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी - तालुक्यातील साखरा (खु.) येथील चौफुलीवर अखेर गतिरोधक बसविण्याच्या कामास सुरुवात झाली असून, सतत घडणाऱ्या अपघातांना आळा बसण्याची आशा व्यक्त केली जात आहे. दै. जनमाध्यम मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा प्रभाव आणि आ. प्रा. राजूभाऊ तोडसाम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाला अखेर जाग आली आहे.

साखरा येथून घाटंजी–पारवा व पांढरकवडा हे दोन राज्य मार्ग जात असून, बसस्थानकाजवळ या मार्गांची चौफुली तयार झाली आहे. या ठिकाणी वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र, गतिरोधक नसल्यामुळे सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे वारंवार अपघात घडत होते. काही अपघातांमध्ये निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटनाही घडल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या ठरावासह अनेक निवेदने देऊनही संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष केले होते. अलीकडेच घाटंजी–पारवा मार्गावर एका ट्रॅक्टरचा अपघात होऊन मजुराचा मृत्यू झाल्यानंतर हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. या घटनेनंतर दै. जनमाध्यम ने सातत्याने बातम्या प्रसिद्ध करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ढिसाळ कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दरम्यान, स्थानिक प्रतिनिधींनी आ. राजूभाऊ तोडसाम यांचे स्वीय सहाय्यक अक्षय वातीले यांच्यामार्फत हा विषय आमदारांपर्यंत पोहोचविला. आमदार तोडसाम यांनी तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारत कामाला गती देण्याचे निर्देश दिले. याचा परिणाम म्हणून २७ मार्च २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साखरा चौफुलीवर गतिरोधक बसविण्याचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गतिरोधकांमुळे वाहनांच्या वेगावर नियंत्रण येऊन अपघातांची मालिका थांबेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# ७ कोटींच्या घोटाळ्यातील मंदार दुधेचा जामीन फेटाळला !



**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - सुमारे ७ कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात आरोपी मंदार दुधे याचा जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायालय, दारव्हा यांनी फेटाळल्याने गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात ३९ फिर्यादींच्या वतीने ॲड. ओंकार काळे यांनी ठोस पुराव्यांसह जोरदार युक्तिवाद करत आरोपीच्या जामीनाला तीव्र विरोध केला.

## गुंतवणूकदारांच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांवर कठोर कारवाईची गरज

दिग्रस येथील या बहुचर्चित प्रकरणात मनोज पाटील, गिरीश दुधे, विनोद दुधे, अपर्णा दुधे आणि पुष्पांजली रंधेरिया यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहितेतील विविध कलमांसह एमपीआयडी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान मंदार दुधे याचा सक्रिय सहभाग समोर आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली होती.बचाव पक्षाने आरोपीचे नाव एफआयआरमध्ये नसल्याचा मुद्दा मांडत जामीन मागितला. मात्र, ॲड. काळे यांनी न्यायालयासमोर बँक स्टेटमेंट, कागदोपत्री पुरावे आणि फिर्यादींचे जबाब सादर करत आरोपीची थेट भूमिका स्पष्ट केली.

# पांढरकवड्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न चिघळला..!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

## रुग्णवाहिका अडकण्याच्या घटना वाढल्या

पांढरकवडा - शहरातील शिबला पॉईंट परिसरात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नाने आता तीव्र स्वरूप धारण केले आहे. या पार्श्वभूमीवर युवा टायगर फोर्स, पांढरकवडा यांनी आक्रमक भूमिका घेत पोलीस व नगरपरिषद प्रशासनाला थेट जबाबदार धरत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

सदर भागात एका हार्डवेअर व बिल्डिंग मटेरियल दुकानासमोर दिवसभर मालवाहतूक वाहनांद्वारे सिमेंट, लोखंड व इतर साहित्याची रस्त्यावरच उतराई केली जाते. त्यामुळे मुख्य मार्ग अडवला जात असून सतत वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. विशेष म्हणजे हा रस्ता उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणारा अत्यावश्यक मार्ग असून परिसरात महाविद्यालये



व मंगल कार्यालय ही आहेत. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिका वेळेत पोहोचू शकत नसल्याच्या घटना समोर येत आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. नगरपरिषदेकडून मोठ्या वाहनांच्या प्रवेशासाठी सकाळी ९ पूर्वी व रात्री ९ नंतरच परवानगी देण्याचा नियम असतानाही त्याचे उघड उल्लंघन होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. मात्र संबंधित प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.दरम्यान, तात्काळ कारवाई न झाल्यास कायदेशीर लढा व जनआंदोलन छेडण्याचा इशारा युवा टायगर फोर्सने दिला आहे.

# पोलीस शिपाई पदी नियुक्त झालेल्या तरुणांचा मराठा सेवा संघ महागाव वतीने सत्कार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने शासकीय नोकरीमध्ये नियुक्त झालेल्या युवकांचा सत्कार घेऊन त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा देण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. काल सुद्धा महागाव तालुक्यातील वाघनाथ येथील अभिजीत गजानन शिंदे व करंजखेड येथील अविनाश देविदास भांगे हे दोन तरुण अकोला येथील महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेमध्ये पोलीस कॉन्स्टेबल/ शिपाई म्हणून निवड झाली आहे.

ओपन मधून निवड झालेल्या अभिजीत शिंदे 134 गुण व अविनाश भांगे याला 133 गुण मिळाले आहेत. या दोन्ही तरुणांचे प्राथमिक शिक्षण आपल्या मूळ गावी जिल्हा परिषद शाळेत झाले तर



पुढील शिक्षण मातोश्री विद्यालय महागाव येथे झाले. यानंतर महागाव शहरातील सुसज्ज अशा श्री अभ्यासिका सेंटरमधून अभ्यास करून, जिद्द मेहनत कष्ट घेऊन पूर्ण तयारी करून हे यश संपादन केले. या दैदीप्यमान यशाबद्दल मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने या दोन तरुणांचा व त्यांच्या आई-वडिलांचा प्रशस्तीपत्र, शिवरायांचे शिवकार्य हे पुस्तक, शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन यथोचित सन्मान करण्यात आला व पुढील उज्वल भविष्याच्या शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले. या सत्कार सोहळ्यासाठी मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव डॉ.संदीप शिंदे, तालुका अध्यक्ष उदय भाऊ नरवाडे, तालुका सचिव पंकज देशमुख, तालुका कार्याध्यक्ष सतीश ठाकरे, तालुका उपाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, प्रसिद्धीप्रमुख गजानन वाघमारे, राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव, श्री कम्प्युटर व श्री अभ्यासिका सेंटरचे संचालक मंगेश पाटील वानखेडे, राज पाटील,गजानन पाटील, गजानन शिंदे, सुचिता शिंदे व सत्कारमूर्ती तसेच सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्याचा अभिमान! उत्कृष्ट आयटीआयमध्ये नांदगाव खंडेश्वर राज्यात टॉप- ३ मध्ये

## विभागीय नंतर राज्यातही यशाची सलग परंपरा कायम
## आधुनिक सुविधांच्या बळावर राज्यातील उत्कृष्ट संस्थांमध्ये स्थान

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

कष्ट, नाविन्य आणि टीमवर्कची सांगड घातली तर यश नक्की मिळते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे नांदगाव खंडेश्वर येथील एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय)! राज्यभरातील संस्थांमध्ये स्पर्धा असतांना या आयटीआयने थेट राज्यात तिसऱ्या क्रमांकावर झेप घेत अमरावती जिल्ह्याचा मान उंचावला आहे.

मुंबई येथे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची 'राज्यस्तरीय उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार'साठी निवड करण्यात आली. सन २०२३-२४ साठी झालेल्या या प्रतिष्ठेच्या



निवड प्रक्रियेत नांदगाव खंडेश्वर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने राज्यात तिसरा क्रमांक पटकावत मोठा मान मिळवला आहे. या पुरस्कारात प्रशस्तीपत्रासह २ लाख रुपयांच्या रोख पारितोषिकाचा समावेश आहे. संस्थेत नाविन्यपूर्ण उपक्रम, अत्याधुनिक सुविधा आणि १०० टक्के प्रवेश क्षमता पूर्ण करण्यासोबतच प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. स्मार्ट क्लासरूम, सीसीटीव्ही निगराणी, खेळाचे मैदान, जिम, शुद्ध पाण्याची व्यवस्था अशा विविध सुविधा उभारण्यात आल्या. तत्कालीन सहसंचालक प्रदीप घुले व विद्यमान सहसंचालक अनंत सोमकुंवर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य नंदनसिंह भुकवाल यांच्या नेतृत्वात ही प्रगती साध्य झाली. संचालनालयामार्फत २७ मार्च रोजी घोषित झालेल्या निकालात नांदगाव खंडेश्वर आयटीआयची राज्यात तृतीय क्रमांकासाठी निवड झाली. विशेष म्हणजे, यापूर्वीही २०२१-२२ मध्ये नांदगाव खंडेश्वर आयटीआयला विभागीय स्तरावर प्रथम पुरस्कार मिळाला होता. तसेच २०२४ मध्ये मुंबईतील डिपेक्स राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शनात आयटीआय गटातून 'शेतकरी मित्र' यंत्राला प्रथम क्रमांक मिळाला होता. विभागीय आणि राज्यस्तरावर सलग पुरस्कार पटकावणारी जिल्ह्यातील ही एकमेव आयटीआय ठरली आहे.

या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे, शिल्प निदेशक तुषार जैन, राजकुमार धोटे, प्रफुल्ल कचरे, वैभव जाधव, निलेश देऊळकर, राम इखार, शहजाद खान, सुशिल सरोदे, सागर डांगे, चिन्मय दहाट, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, सचिन वाहणे, सचिन दुवदने, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, रूपाली लांडे, कार्यालयीन कर्मचारी अनंत खेडकर, निलेश खंडार, मनोज पकडे, राजकुमार कांबळे, गौरव मोगरे व प्रशिक्षणार्थ्यांनी आनंद व्यक्त करत संस्थेचे अभिनंदन केले. ही कामगिरी नांदगाव खंडेश्वरसाठी अभिमानाची ठरली असून भविष्यात आणखी मोठी झेप घेण्याचा संस्थेचा निर्धार आहे.

**सर्वांच्या अथक प्रयत्नातून मिळाला बहुमान**

तत्कालीन कार्यरत असलेले कर्मचारी व सद्याचे शिल्पनिदेशक-कर्मचारी तथा प्रशिक्षणार्थ्यांचे सहकार्य आणि सातत्यपूर्ण उपक्रम यामुळेच हा पुरस्कार मिळू शकला. हा सन्मान संपूर्ण संस्थेच्या टीमवर्कचा आहे.

**नंदनसिंह भुकवाल**
प्राचार्य, आयटीआय नांदगाव खंडेश्वर

# अमरावती विभागात २०० तरुणांना 'टूरिस्ट गाइड' बनण्याची संधी

## पर्यटन संचालनालयातर्फे ७ दिवसांचे विनामूल्य प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विभागातील पर्यटन स्थळांचा विकास आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन संचालनालयाने पुढाकार घेतला आहे. 'नमो पर्यटन कौशल्य प्रशिक्षण योजना' अंतर्गत अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या पाचही जिल्ह्यांतील इच्छुक युवक-युवतींसाठी 'टूरिस्ट गाइड ट्रेनिंग' आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक विजय जाधव यांनी दिली आहे.

या सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात प्रामुख्याने पर्यटन स्थळांवर प्रभावी मार्गदर्शन करणे, आदरातिथ्य सेवा आणि पर्यटन संबंधित तांत्रिक कौशल्यांचे धडे दिले जाणार आहेत. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या पर्यटकांना स्थानिक वारसा आणि ऐतिहासिक स्थळांची शास्त्रोक्त माहिती मिळावी, या उद्देशाने हे 'पर्यटन सुलभ मार्गदर्शक' तयार केले जात आहेत. विशेष म्हणजे, ग्वाल्हेर येथील नामांकित 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टूरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट' आणि महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाचे तज्ज्ञ प्रशिक्षक हे प्रशिक्षण देणार आहेत.

प्रशिक्षणासाठी एकूण २०० उमेदवारांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल. अर्जदार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याचे वय १८ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना पर्यटन संचालनालयाचे अधिकृत प्रमाणपत्र दिले जाईल. तसेच, सिंहस्थ कालावधीत 'टूर गाइड' म्हणून अधिकृतपणे काम करण्यासाठी विशेष ओळखपत्रही प्रदान करण्यात येणार आहे.इच्छुक उमेदवारांनी ३० मार्च रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे (https://forms.gle/M6gq9JgMiFfB7Efv7) आपले अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवार प्रादेशिक पर्यटन कार्यालय, अमरावती येथील दूरध्वनी क्रमांक ०७२१-२९९०४५७ वर संपर्क साधू शकतात. पर्यटन क्षेत्रात करिअर करण्याची आणि फिरण्याची आवड असलेल्या तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जाधव यांनी केले आहे.

# परिमंडळातील आरोग्य यंत्रणेवर ४.२० कोटींचे वीज बिल थकीत

## बिल भरून सहकार्य करा- मुख्य अभियंता साळुंके

**अमरावती/का.प्र.**

परिमंडळातील उच्चदाब व लघुदाबाचा वीज पुरवठा असलेल्या शासकीय आरोग्य संस्थांकडे एकूण ४ कोटी २० लाख रुपयांचे वीज बिल थकीत असून, आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी संबंधित रुग्णालय प्रशासनाने तातडीने बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

महावितरणच्या माहितीनुसार, वीज बिल वसुली ही केवळ आर्थिक बाब नसून संस्थेच्या अस्तित्वाशी निगडीत आहे. त्यामुळे कर्मचारी भर उन्हात थकबाकी वसुलीसाठी प्रयत्न करत असून, प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई सुरू आहे. आरोग्य सेवा ही जीवनवाहिनी असल्याची जाणीव ठेवून महावितरणने शासकीय रुग्णालयांचा वीज पुरवठा तातडीने खंडित न करता संबंधित प्रशासनाशी प्रत्यक्ष भेटी, पत्रव्यवहार आणि स्मरणपत्रांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. मात्र अद्याप अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने, नाईलाजास्तव वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई करावी लागू शकते, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

परिमंडळातील उच्चदाब वर्गवारीतील नऊ महत्त्वाच्या रुग्णालयांमध्ये थकबाकीची स्थिती गंभीर आहे. अमरावती जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयाकडे १ कोटी ४६ लाख रुपये थकीत आहेत. अचलपूर येथील वैद्यकीय अधीक्षक या नावे असलेल्या तीन वीज जोडण्यांवर १ कोटी १४ लाख लाख रुपयांची थकबाकी आहे. मोर्शी येथील संबंधित खात्यावर १.१८ लाख रुपये थकीत आहेत. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या दोन वीज जोडण्यांवर ५६ लाख रुपये थकीत आहेत. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकडे ८ हजार रुपये, तर मेडीकल अधीक्षक यांच्या नावावर ५९.३० लाख रुपयांचे बिल थकीत आहे.

यासोबतच लघूदाब वर्गवारीतील आरोग्य यंत्रणेच्या १५२ वीज जोडण्यावर ४४ लाख २८ हजार रूपयाचे वीज बिल थकले असून यात अमरावती जिल्ह्यातील ९९ आरोग्य यंत्रणेच्या ग्राहकाकडे ११ लाख ९ हजार आणि यवतमाळ जिल्ह्यातील ५३ ग्राहकाकडे ३३ लाख १८ हजार रूपयाचे वीजबिल थकीत आहे.महावितरणने संबंधित रुग्णालय प्रशासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने थकबाकी भरावी, अन्यथा वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई अपरिहार्य ठरेल, असा इशारा दिला आहे.

# कचरा डेपोवर नियमांचा भंग, ठेकेदारावर कारवाईची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

भारतीय राष्ट्रीय कांग्रेसच्या नगरसेविका सुमय्या बख्तियार रऊफ खान यांनी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देत कचरा डेपोवरील गंभीर अनियमितता उघड केली आहे. कचरा व्यवस्थापनाचे काम पूर्णपणे नियमांच्या विरोधात व निष्काळजीपणे सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



त्यांच्या तक्रारीनुसार, संबंधित ठेकेदार शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन नियमांचे तसेच काम आदेशातील अटींचे सर्रास उल्लंघन करत आहे. डेपोवर ओला व सुका कचरा वेगळा न ठेवता एकत्र मिसळला जात आहे. याशिवाय वैद्यकीय कचरा (सिरिंज इ.) सामान्य कचऱ्यात मिसळला जात असल्याने नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

कचरा उघड्यावर टाकला जात असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून रोगराई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डेपोवर स्वच्छता व सॅनिटेशनचा पूर्ण अभाव असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.नगरसेविका सुमय्या खान यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, कचरा डेपोची तात्काळ तपासणी करून संबंधित ठेकेदारावर आर्थिक दंड आकारण्यात यावा. तसेच वारंवार नियमभंग होत असल्यास ठेका रद्द करून ठेकेदारास कारण दाखवा नोटीस देण्यात यावी.यासंदर्भात योग्य ती कारवाई न झाल्यास उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.या तक्रारीच्या प्रती आरोग्य विभागाचे सभापती, जिल्हाधिकारी अमरावती तसेच विभागीय आयुक्त अमरावती यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# छ.संभाजी महाराज चौकात 'दादा स्मृती' पाणपोई

**अमरावती/का.प्र.**

सद्या कडाक्याची ऊन तापत असून लखलखत्या उन्हाने जीवाची लाही लाही होत आहे. अशावेळी तृष्णा-तृप्तीसाठी वाटसरुंची भटकंती होऊ नये, म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज चौक नवसारी रिंगरोड येथे श्रीरामनवमीच्या पावन पर्वावर या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आ. संजय खोडके व आ. सुलभा खोडके यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी युवक काँग्रेस हि शहरात सामाजिक कार्य व विविध उपक्रम राबविण्यात अग्रणी असून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेता स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जतन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवककाँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत, सामाजिक कार्यकर्ता संकेत महल्ले,रायुकॉ शहर उपाध्यक्ष मनीष पाटील,योगेश लंगोटे,आदित्य निर्मळ, प्रणाल किटूकले,तेजस तडकीत, सुनील खिची, पंकज वाकोडे, सुधीर वाकले,वैभव निचळ, निलेश नांदणे,अजिंक्य खरड,अक्षय भुयार, संदीप हाडोळे,सुशील तायडे,आकाश गोटे ,विकास महल्ले ,अनिकेत महल्ले, विपुल मोहोड, पवन भोरे,आदित्य श्रीवास, राम देशमुख ,उमेश देशमुख सुमित वानखडे,पंकज गायकवाड,अविनाश गायकवाड, स्वाप्निल मिल्के, आदींसह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व सर्व सहकारी उपस्थित होते

# हवामान अनुकूल शेतीसाठी जिल्ह्यात 'डिजिटल शेतीशाळा'

## १ एप्रिलपासून तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**

मागील काही वर्षांत हवामानातील बदलामुळे निर्माण झालेली पावसाची अनिश्चितता, पावसातील खंड, मान्सूनचे उशिरा आगमन आणि गारपीट यांसारख्या आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली जाणार आहे. राज्य शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरू केलेल्या 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.०' अंतर्गत, अमरावती जिल्ह्यासह राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये 'हवामान



अनुकूल तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने येत्या एप्रिल २०२६ मध्ये विशेष 'डिजिटल शेतीशाळा' आयोजित करण्यात आल्या आहेत.

पाणी फाउंडेशनद्वारे संचालित ही डिजिटल शेतीशाळा झूम आणि यूट्यूब यांसारख्या ऑनलाईन माध्यमांतून चालविली जाणार आहे, जिथे तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना पीकनिहाय शास्त्रोक्त मार्गदर्शन मिळेल. या नियोजित शेतीशाळांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, सर्व सत्रे सायंकाळी ७:३० वाजता सुरू होतील. यामध्ये प्रामुख्याने १ एप्रिल रोजी पेरणीपूर्व तंत्रज्ञान, बेड तयार करणे आणि बीज प्रक्रिया यावर चर्चा होईल. त्यानंतर ८ एप्रिल रोजी बीजामृत, जीवामृत व दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक निविष्ठा उत्पादनाचे धडे दिले जातील, तर १५ एप्रिल रोजी एकात्मिक कीड व्यवस्थापन, सापळा पिके आणि मित्रकिडींचा वापर या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना घरबसल्या प्रगत तंत्रज्ञान शिकता येणार असून, खते आणि कीडनाशकांचा खर्च कमी करून उत्पादकता वाढवणे शक्य होणार आहे. हवामानानुसार पेरणीचे अचूक नियोजन आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे प्रकल्प संचालकांनी नमूद केले आहे. तरी, जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधव, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला बचत गटांनी या डिजिटल शेतीशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन 'आत्मा' प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

## संक्षिप्त

### पुनरर्बंध परिचय पुस्तिकेचे आज विमोचन

**अमरावती-** माळी समाजातील विधवा, विदूर, घटस्फोटित युवक युवती, प्रौढ व्यक्तीचा पुनरविवाह परिचय मेळावा आज रविवार २९ मार्च रोजी रेशीमबाग चौकातील महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहात सकाळी ११ वा. आयोजित केला आहे.सदरील मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. अरुण पवार उपस्थित राहतील.उदघाटक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती किशोर रोही उपस्थित राहतील. प्रमुख अतिथी म्हणून नागपूरचे धर्मदाय उपायुक्त किशोर मसने आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदरील मेळाव्यात पुनरर्बंध परिचय पुस्तिकेचे विमोचन उपस्थित अतिथी करतील. सर्व शाखीय माळी समाजातील इच्छुक युवक युवती पालकांनी मेळाव्यात उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### राजश्री खाजोने यांचा नवोपक्रमासाठी सन्मान



**अमरावती-** राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२५-२६ मध्ये राजश्री खाजोने, सहायक शिक्षिका, जिल्हा परिषद शाळा, बगदरी, पं. स. चिखलदरा यांनी शाळेत राबविलेला नवोपक्रम प्राथमिक गटातून जिल्हास्तरावर बक्षीस पात्र ठरला. त्यानिमित्त जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती येथे मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्फत विविध शैक्षणिक गटासाठी नवोपक्रम स्पर्धा सन २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. या नवोपक्रम स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा, बगदरी येथील सहायक शिक्षिका, राजश्री खाजोने यांनी राबविलेला रीडिंग रेन्बो कॉर्नर या उपक्रमाला जिल्हा स्तरावर उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. त्यानिमित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती येथे आयोजित बक्षीस वितरण समारंभात राजश्री खाजोने यांना मिलिंद कुबडे, प्राचार्य डायट, अमरावती, डॉ. विजय शिंदे (अधिव्याख्याता),पवन मानकर (अधिव्याख्याता),डॉ. दिपक चांदूरे (अधिव्याख्याता) तथा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

### शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती-** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. २८ मार्च ते दि. ११ एप्रिलच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

### भाषा विभागाच्या क्षेत्रभेटीतून उलगडला प्रकाशन विश्वाचा प्रवास

**अमरावती-** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील भाषा विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी



नुकतीच एक विशेष क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी 'मुक्त मंथन' या त्रैमासिक कार्यालयाला आणि कोमल आर्ट प्रिंटिंग प्रेसला भेट देऊन प्रकाशन व मुद्रण क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेतला.'विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड व्हावी आणि त्यांनी अधिक सकस लिखाण करावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी पुढे जावे,' असे मत मुक्त मंथन त्रैमासिकच्या संपादिका सुनंदा बोदिले यांनी व्यक्त केले. याप्रसंगी मुक्त मंथन त्रैमासिकाच्या संपादक सुनंदा बोदिले, प्रा. डॉ. शुद्धोधन कांबळे, प्रा. जी. एच. पांडे, प्रा. हेमंत सावळे,प्रा.एन.डी. अढाऊ,प्रा.महेश बनसोड, प्रा. दीपाली गवई आदी प्राध्यापक उपस्थित होते. या क्षेत्रभेटीला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

### मूकबधिर विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर भरारी



**आसेगाव पूणा -** गुजरात युनिव्हर्सिटी ग्राउंड, अहमदाबाद (गुजरात) येथे आयोजित १० वी नॅशनल डेफ सब-ज्युनिअर व ज्युनिअर स्पोर्ट्स चॅम्पियनशिप तसेच २७ वी नॅशनल सीनियर स्पोर्ट्स चॅम्पियनशिपमध्ये सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचालित निवासी मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत ५ रौप्य व १ कांस्य पदकांची कमाई केली. या स्पर्धेत जान्हवी काळे हिने २०० मीटर धावण्याच्या प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला, तर माधुरी गारकर हिने गोळाफेक प्रकारात द्वितीय स्थान मिळवले. सुरेश अळासे याने ४००×४ मीटर रिले स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून कांस्यपदक पटकावले.या दैदिप्यमान यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.आ.बच्चू कडू (माजी राज्यमंत्री तथा दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे जनक) यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या जिद्दीचे व क्रीडाक्षेत्रातील कौशल्याचे विशेष कौतुक केले.संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नयना कडू, सचिव राहुल म्हाला, प्रशासकीय अधिकारी चंद्रशेखर मोहोड, विद्यालयाचे मुख्याध्यापक, क्रीडा प्रशिक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या या यशामागे क्रीडाशिक्षकांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि नियोजनबद्ध प्रशिक्षण महत्त्वाचे ठरले असून विद्यार्थ्यांची मेहनत व चिकाटीही तितकीच कारणीभूत ठरली आहे.

# दत्ता मेघे...राजकारणातला सहृदयी माणूस !

**दत्ता मेघेंच्या कामाचा हा विस्तार केवळ शिक्षण संस्थांपुरता मर्यादित नव्हता तर सहकारी बँक,सूतगिरणी अन्य उद्योग या क्षेत्रातही तो पसरलेला होता.इतक्या मोठ्या साम्राज्याचे धनी असूनही दत्ता मेघे यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा गर्व नव्हता.**



महाराष्ट्रातले एक जेष्ठ राजकारणी दत्ता मेघे यांचे गेल्या आठवड्यात निधन झाले. वय झाले होते आणि (राज्यपालपद वगळता) आयुष्यात जे काही करायचे होते-नव्हते ते सगळे करुन झालेले होते.गेल्या आठवड्यात एका सायंकाळी दत्ता मेघे शांतपणे मृत्यूच्या स्वाधीन झाले.ते कोणत्या पक्षाचे होते याला काही अर्थ नाही.कारण माणूस म्हणून दत्ता मेघे सहृदयी होते.राजकारणात राहूनही दत्ता मेघे यांनी सहृदयीपणा निगुतीने शेवटचा श्वास घेईपर्यंत जपला,हेच महत्त्वाचे आहे.राजकारणात अशा पद्धतीने जगणारी माणसे फार थोडी असतात म्हणूनच ती कायमची स्मरणात राहतात.

दत्ता मेघे यांची ओळख झाली ती मुंबईत,ते राज्यमंत्री असताना म्हणजे १९७९ यावर्षी. राजकारणात आणि त्यातही सत्तेच्या दालनात दत्ता मेघे तेव्हा नवखे होते;माझ्याही पत्रकारितेची ती जेमतेम सुरुवात होती.राजकारणात असूनही हा माणूस पुरेसा बेरकी आणि बनेल नाही,हे पहिल्याच भेटीत लक्षात आले.तेव्हा मी चिपळूणला 'सागर' या दैनिकात होतो आणि नजीकच्या भविष्यकाळात नागपूरला 'नागपूर पत्रिका' या दैनिकात रुजू होणार होतो,हे मी सांगितले तेव्हा दत्ता मेघे म्हणाले,'नागपूरला आलात की फोन करा.काही गरज लागली तर नक्की मदत करेन.'

तेव्हा झालेली ही ओळख पुढे चांगल्या मैत्रीत रुपांतरित झाली. सगळे जग त्यांना 'दत्ताभाऊ' म्हणून ओळखायचे,मीही त्यांना मग दत्ताभाऊ म्हणून ओळखू लागलो.दत्ताभाऊंना आमदार,खासदार,मंत्री असताना आणि नसतानाही पाहिले;नुसते पाहिले नाही तर जवळून अनुभवलंही.ते कोणत्या पदावर आहेत किंवा नाहीत त्यामुळे कोणताही फरक पडलेला नसायचा.दत्ताभाऊ जसे होते तसेच वागायचे.खामल्यातील त्यांच्या घरच्या दरबारातील गर्दीला कधी ओहोटी लागल्याचे स्मरत नाही.राष्ट्रीय पातळीवरच्या सर्वपक्षीय नेत्यांपासून ते नागपूरच्या गल्लीतल्या पंटर पुढाऱ्यापर्यंत असे कुणीही दत्ता मेघे यांच्याकडे भेटणे शक्य शक्य असायचे.पुढे त्या घराचा खूप मोठा विस्तार झाला,घर अवाढव्य झाले. घर वाढले म्हणून दत्ता मेघे आणि त्यांच्या घरातले अन्य सदस्य बदलले नाहीत. त्यांच्याही आगत-स्वागतात व्यापक बदल होत गेले. पूर्वीच्या घरी पहिल्या मजल्यावर एका खोलीत आमच्या मंतरलेल्या सोनेरी पाण्यासोबतच्या बैठका होत असत.पुढे या बैठका मेघेंच्या विस्तारित घरात एका छोट्या टॅंकच्या शेजारी सुरु झाल्या,एवढाच काय तो बदल. दत्ताभाऊंचा स्वभाव दिवसाचे २४ तास राजकारण करावे,असा मुळीच नव्हता.दिवसभर राजकारण झाले की संध्याकाळी शुचिर्भूत होऊन चार मित्र जमवावे आणि जगण्याचा रसिकपणे आस्वाद घ्यावा असा त्यांचा रिवाज होता.हा रिवाज दत्ताभाऊंनी एखादा वसा पाळावा तसा पाळला;त्यात अनेकांना सहभागी करुन घेतले.

दत्ता मेघे राजकारणात राहूनही बेरके आणि बनेल नव्हते हे खरे असले तरी,धोरणी मात्र नक्की होते.ते आधी काँग्रेसमध्ये होते तेव्हा त्यांची निष्ठा शरद पवार यांच्यावर होती. दत्ता मेघे राष्ट्रवादीत गेले तरी त्यांची निष्ठा शरद पवार यांच्यावरच कायम राहिली.पुढे शरद पवार यांनी दूर सारल्यावरही (त्याचीही एक हकीकत आहे!) ही निष्ठा मुळीच पातळ कशी झाली नाही हे चांगले ठाऊक असणाऱ्या मोजक्या लोकांपैकी मी एक आहे. नागपूर, मुंबई, अकोला, दिल्ली, जबलपूर,भोपाळ अशा अनेक ठिकाणी दत्ता मेघे यांच्यासोबत मी प्रवास केला.हा प्रवास काही अर्थातच मुक्यांने होत नव्हता तर साहजिकच भरपूर गप्पा होत. लहानपणची गरिबी जशी दत्ता मेघे आवर्जून सांगत तशी त्यांची शरद पवारांवरील निष्ठाही सांगत.'एक वेळेस साहेब मला सोडतील पण मी त्यांना सोडणार नाही' असे त्यांनी अनेकदा म्हंटल्याचे स्मरते.घडले तसेच,शरद पवार यांनी दत्ता मेघे यांना दूर सारले.पण,दत्ता मेघे यांच्या मनात शरद पवार यांच्या विषयी भक्तीभाव ओतप्रोत भरलेला होता.२०२४नंतर ते भारतीय जनता पक्षात गेले मात्र,मनाने ते शरद पवारांचेच भक्त राहिले. शरद पवारानंतर त्यांच्या मनात नितीन गडकरी, अटलबहादूर सिंग आणि गिरीश गांधी यांना अपरंपार जागा होती.पुढे त्यांचा विश्वास नितीन गडकरींवर जास्त जडला. अर्थात याचा अर्थ त्यांच्या मनात अटलबहादूर सिंग आणि गिरीश गांधी यांच्या विषयीचे महत्व कमी झालेले होते,असे मुळीच नाही .

दत्ता मेघे यांनी विदर्भात आणि त्यातही नागपूर तसेच वर्धा जिल्ह्यात शिक्षण संस्थांचे जाळे विणले.शिक्षण संस्था कसल्या,तो शिक्षणाचा केलेला अतिशय दर्जेदार व्यवसायात होता.दत्ता मेघेंच्या कामाचा हा विस्तार केवळ शिक्षण संस्थांपुरता मर्यादित नव्हता तर सहकारी बँक,सूतगिरणी अन्य उद्योग या क्षेत्रातही तो पसरलेला होता. इतक्या मोठ्या साम्राज्याचे धनी असूनही दत्ता मेघे यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची घमेंड नव्हती.मुंबई असो का दिल्ली,नागपूर ,वर्धा...आलेल्या प्रत्येकाशी चार शब्द बोलणे आणि त्याची जी काही समस्या असेल तर ती सोडवणं हा दत्ता मेघे यांचा 'डीएनए' होता.आपल्याला फार उच्च शिक्षण घेता आले नाही पण,उच्च शिक्षणाची संधी समाजातल्या प्रत्येकाला मिळावी अशी सदिच्छा दत्ता भाऊंच्या मनात कायम दरवळत असे. त्यांनी किती लोकांना मदत केली आणि त्याची वाच्यता कशी केली नाही,याचा एक साक्षीदार मीही आहे. 'अमुक एक माणूस गरजू आहे त्याला तुमच्याकडे पाठवतो आहे' असे भाऊंना सांगितले की मग ते प्रवेशाचे काम असो की आर्थिक सहाय्य दत्ता मेघे यांनी त्यांना भेटायला आलेल्या कोणाही गरजू माणसाला रिकाम्या हाताने पाठवलं नाही .

एक प्रसंग सांगायला हवा 'लोकसत्ता'ची नागपुरातून प्रकाशित होणारी विदर्भ आवृत्ती सुरू झाली तेव्हा बारावीच्या परीक्षेचे निकाल देताना गुणवंत विद्यार्थ्यांचे भाराभर फोटो छापण्याची प्रथा होती.तसे न करता काही गरजू मुलांच्या मुलाखती प्रकाशित कराव्या आणि केवळ पहिल्या पाच गुणवंतांची मनोगते प्रकाशित करावी असे मी ठरवले.पहिल्या वर्षी त्यातील काही मुलांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षणात भावी शिक्षणात येणाऱ्या संभाव्य आर्थिक अडचणींविषयी सूतोवाच केलेले होते.ते वाचल्यावर दत्ता भाऊंनी मला फोन केला आणि 'यापैकी पाच खरेखुरे गरजू विद्यार्थी निवडा आणि त्यांना माझ्याकडे पाठवा त्यांना हव्या त्या अभ्यासक्रमासाठी मोफत प्रवेश देतो' अशी ऑफर दत्ताभाऊंनी दिली;एवढंच नाही तर ती पाळलीही.पुढे तीन-चार वर्षानंतर ते काम करायचा मला कंटाळा आला आणि ती योजना बंद पडली.या गरजू मुलांना वैद्यक,फार्मसी,अभियांत्रिकी अशा विविध शाखात दत्ता मेघे यांनी एक पैसा न घेता प्रवेश दिले आणि त्यांचे शिक्षण पूर्ण होईल हे बघितले.त्याआधीही अशी गरजू मुले-मुली दत्ताभाऊकडे मी पाठवत होतोच. धनाअभावी शिक्षण न घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जी कळकळ दत्ता मेघे यांनी सातत्यानं दाखवली,त्यासाठी प्रशंसनीय हा शब्द थिटा आहे.

बरे,अशी मदत दत्ता मेघे काही एका दोघांसाठी करत होते अशातला भाग नाही.दारी आलेल्या प्रत्येकासाठी मग तो ओळखीचा असो अथवा नसो,त्यानं कुणाचा संदर्भ आणलेला असो अथवा नसो,दत्ता मेघे यांनी त्यांचा हात कधी आखडता घेतला नाही. दात्याचा तो हात गरजूंना कायम देत राहिला तरी मेघे यांनी मात्र या केलेल्या मदतीचा कधीच कुणाकडेही उच्चार केला नाही.

संस्था उभारताना दत्ता मेघे यांनी कोणती कंजुषी दाखवल्याचे किंवा जात,धर्म आड आणल्याचे कधी घडले नाही.त्यांच्या शिक्षण संस्थात सर्व जाती-धर्मांचे लोक गुण्या गोविंदाने नोकरी करत राहिले.विद्यार्थ्यांबाबतही त्यांचा दृष्टिकोन असाच होता.संस्थेच्या उभारणीमध्ये 'जे जे उत्तम असेल ते ते'आपल्या संस्थेत असले पाहिजे,असा त्यांचा कायमच कटाक्ष राहिला.त्यासाठी खर्च किती होतो आहे आणि तो आवश्यकतेपेक्षा जास्त आहे का,याचा विचार कधी दत्ता मेघे यांनी केल्याचे कधीच दिसले नाही.त्यामुळे अगदी अलीकडच्या दहा-पंधरा वर्षांच्या आधीपर्यंत दत्ता मेघे सर्वार्थाने 'सधन' या वर्गात नव्हते. जे काही धन संस्थेतून मिळत होते त्या व्यतिरिक्त कर्ज काढून त्यांनी उत्तम दर्जाच्या संस्थांची उभारणी केली.त्यामुळे दत्ता मेघे यांची संस्था म्हणजे उच्च दर्जा हे समीकरण आपोआपच तयार झाले.या संदर्भात एक अनुभव आवर्जून सांगावा असा आहे.शिक्षण संस्था उभारण्याच्या काळात दत्ता मेघे राजकारणात सक्रिय होते.ही घटना घडली तेव्हा ते राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री होते आणि मी 'लोकसत्ता'च्या औरंगाबाद ब्युरोला तेव्हा होता.बँक कर्मचाऱ्यांचा नेता असलेला देवीदास तुळजापूरकर हा माझा जुना मित्र.त्याने एक दिवस महाराष्ट्रातल्या कोणत्या राजकारण्याकडे राष्ट्रीयकृत बँकांच्या कर्जाची किती थकबाकी आहे याची यादी मला दिली.त्या यादीत विदर्भातील दत्ता मेघे आणि श्रीकांत जिचकार अशी दोन नावे माझ्या ओळखीची होती.बातमी अर्थातच खळबळजनक होती. ती दिल्यावर जी काय चर्चा व्हायची ती झाली.दोनेक दिवसाने दत्ता मेघे यांचा फोन आला आणि त्यांनी सांगितले की 'तुम्ही म्हणता ती थकबाकी आता माझ्यावर नाही गेल्याच आठवड्यात ती सर्व थकबाकी मी भरुन टाकलेली आहे.त्यासाठी मी वेगळे कर्ज काढले होते पण, हा काही तुम्हाला सांगायचा मुद्दा नाही,' सांगायचे तात्पर्य हे की, सरकारमध्ये राहून सरकारचे पैसे बुडवावे असा दृष्टिकोन दत्ता मेघे यांच्यामध्ये कधीच आढळला नाही. अर्थात सवलतीच्या दरात शैक्षणिक संस्थांसाठी त्यांनी सरकारकडून जमिनी धोरणीपणाने मिळवल्या हेही तेवढेच खरे.

पावणे सहा फूट उंची,शिडशिडीत शरीरयष्टी, गर्द सावळा रंग,तरतरीत नाक आणि हिवाळा वगळता पांढरे स्वच्छ कपडे,असे दत्ता मेघे यांचे व्यक्तीमत्व होते.त्यांचा स्वभाव तसा मृदू होता.फार काही कुणावर चिडावे कुणाला अद्वातद्वा बोलावे किंवा कुणाचा अपमान करावा,अशी त्यांची वृत्ती नव्हती.फारच चिडले तर समोरच्याला 'तू आता इथून जा बाबा' असं ते सौम्य स्वरात सांगत.त्यांचा एक स्वीय सहाय्यक होता त्याचे नाव सोडून द्या पण,तो बरीच वर्ष दत्ताभाऊ सोबत होता.दत्ताभाऊ त्याच्यावर प्रचंड विसंबून असत.भाऊंच्या त्या विसंबून राहण्याचा त्यांनं बऱ्यापैकी गैरफायदा घेतला हे लक्षात येऊनही दत्ता मेघे कठोर कधी झाले नाहीत. त्याच्या गैरफायद्याबद्दलच्या दोन-तीन कथा त्यांनी शेअर केल्या होत्या.पुढे मात्र तो सहाय्यक हाताबाहेर सुटला;त्याला आमदार होण्याची स्वप्न पडू लागली.दत्ता मेघे यांनी जेव्हा त्यांचा थोरला मुलगा सागर याला विधान परिषदेवर पाठवायचं ठरवलं तेव्हा तो सहाय्यक फारच चिडला.मेघे यांचा आधार घेऊन त्याला त्या जागी जायचे होते.त्यावरुन त्यांना मेघे यांच्याशी बराच वादही घातला अखेर दत्ता मेघे यांनी त्याला अलगद बाजूला काढले आणि प्रकरण संपवले.

एक फारच वैयक्तिक अनुभव सांगितल्याशिवाय राहवत नाही आमच्या कन्येला मेघे यांच्याशी संबंधित शिक्षण संस्थेत एमबीए साठी प्रवेश हवा होता.त्यासाठी आम्ही शैक्षणिक कर्ज काढले आणि फी भरली. दोनेक दिवसांनी सागर मेघेचा मेघेचा फोन आला. त्याने विचारले,'काका सायली तुमचीच मुलगी ना?'मी हो म्हणून सांगितल्यावर तो म्हणाला,'तिची फी तुम्ही मुळीच भरायला नको होती.मी ते पैसे परत पाठवतो.उद्या हे जर बाबांना कळले तर बाबा मला खूप रागावतील.'

सागरला मी म्हणालो माझ्या शब्दाखातर इतर अनेकांना दत्ताभाऊंनी भरपूर मदत केली आहे,अजूनही करतात.मला माझ्या कन्येची फी भरण्यासाठी कर्ज काढावे लागले तरी ते फेडण्याची क्षमता माझ्यात आहे.बाबा तुला रागवणार नाही याची खात्री मी देतो आणि त्यासाठी लगेच येऊन त्यांच्याशी बोलतो.'त्याप्रमाणे मी गेलो आणि भाऊंना काय घडले ते सांगितले.मी शुल्क भरणे भाऊंना काही आवडले नाही.त्यबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली पण,त्याचबरोबर माझ्या भूमिकेचंही स्वागत केले.

२०१२ मध्ये मी नागपूर सोडले आणि दिल्लीला गेलो तेव्हा दत्ताभाऊ लोकसभेचे सदस्य होते.दिल्लीतही आमच्या भरपूर भेटी होत असत. संध्याकाळच्या मैफिली रंगत असत. त्या आठवणी खूप आहेत. २०१५ मध्ये परत आल्यावर मी नागपूरही सोडायचे सोडून तेव्हाच्या औरंगाबादला (आता छत्रपती संभाजी नगर) स्थायिक व्हायचे ठरवले.हे सांगायला दत्ता मेघे यांच्याकडे गेलो. मी नागपूर सोडण्याची कल्पना त्याना मुळीच रुचली नाही.तेव्हा मी त्यांना सांगितले की औरंगाबादला माझे घर आहे त्यावर भाऊ म्हणाले,'ते घर विका.नागपूरला या.इथे मी तुम्हाला एक घर घेऊन देतो.पाच-दहा एकर शेतीही घेऊन देतो.ती करा आणि आमचे सल्लागार म्हणून इथेच रहा.या शहराला आणि मलाही तुमची गरज आहे'.दत्ता मेघे यांची माणसे जोडून ठेवण्याची शैली ही अशी होती आणि त्यांनी अशी अनेक माणसे वेगवेगळ्या निमित्ताने त्यांच्या संस्थेसोबत जोडून ठेवलेली होती.ती यादी बरीच मोठी मोठी आहे .

दत्ता मेघेंच्या कामाची शैली 'सॉफ्ट' म्हणता येईल अशा पद्धतीची आणि सकारात्मक होती.कुणाचेही काम करायचे ठरवल्यावर ज्या माणसाकडे त्याला पाठवायचे त्याला आधी फोन करायचा आणि कोण माणूस पाठवतो आहे तसेच त्याचे काम काय आहे,याची कल्पना देण्याची दत्ताभाऊंची पद्धत होती.औरंगाबादला स्थायिक झाल्यावर माझ्या एका नातेवाईकाला त्यांच्या संस्थेत नोकरी हवी होती. त्यासाठी मी दत्ताभाऊंना फोन केला त्यांनी सांगितले,'आता संस्थेच्या कामातून मी जवळजवळ निवृत्त झालो आहे सागर सगळे बघतो.तुम्ही दहा मिनिटांनी सागरला फोन करा,तोपर्यंत मी त्याला तुमचा फोन येणार आहे आणि काय काम आहे ते सांगून ठेवतो.' सागरला फोन केला तर तोपर्यंत दत्ताभाऊंचा फोन सागरला गेलेला होता.लवकरच जागा निघणार आहेत आणि त्याची जाहिरात येणार आहे याची माहिती सागरने लगेच दिली आणि अर्ज पाठवल्यावर आपण बोलू असे आश्वस्त केले.माझ्या त्या आप्ताला पुढे दिल्लीत नोकरी मिळाल्यामुळे दत्ता मेघे यांच्या शिक्षण संस्थेत जाण्याची वेळच आली नाही हा भाग वेगळा पण, दत्ता मेघे यांची कामाची शैली ही अशी होती.

१९७९ साली आमची ओळख झाली,मग घसट वाढली आणि २०१५ हळूहळू आमच्यातला संपर्क कमी कमी होत गेला.पत्रकारितेच्या साडेचार दशकांच्या काळात दत्ता मेघे यांच्यासारखा सहृदयी राजकारणी अपवादानेच पाहण्यात आला. आणखी एक म्हणजे,पाय जमिनीवर ठेवून लोकांशी वागणे हाही त्यांचा दुर्मीळ गुण होता. अशी माणसे राजकारणात फार अपवादाने पाहायला मिळतात. दत्ता मेघे त्यापैकी एक होते. माणसे काळाच्या पडद्याआड जातात...उरतात त्या त्यांच्या आठवणी. दत्ता मेघे गेले पण,त्यांच्या असंख्य आठवणी माझ्या मनात आहेत.त्यांच्याविषयी खूप लिहिता येईल पण, ते लिहिलेले त्यांच्यातला सहृदयी माणूस कसा वैपुल्याने व्यापक होता हे सांगण्यासाठी अपुरे आहे.

दत्ता मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

**प्रवीण बर्दापूरकर**
मो.९१९८२२०५५७९९
www.praveenbardapurkar.com

# रघु देशमुखच्या वावरातील 'दशानन'



**एक टक नाटक**
**समीक्षण**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, अंतर्गत ७१ वा. प्राथमिक नाट्य महोत्सव स्पर्धा २०२५-२६. स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज अमरावती येथे २३ वे दोन अंकी नाटक 'दशानन' कामगार कल्याण केंद्र नवी वस्ती बडनेरा यांनी सादर केले.

अचानक तांत्रिक अडचण त्या विलंबात रंगकर्मीची धडक व दर्शकांचा उत्साह स्तब्ध होताच नाटकाचा प्रयोग सुरू होतो.नाटकाचा परिचय होत असताना सर्वांच्या उत्सुकतेसोबत पडदा उघडतो.प्रभू रामचंद्र जानकी लक्ष्मण व हनुमंतराय यांच्या दर्शनाने भक्तिमय वातावरण निर्माण होणार तेवढ्यात ही नाटकाची तालीम असल्याचा प्रकार पुढे येतो.रघु राम सादर करणार यावर त्याचे मित्र,गावकरी त्याची चेष्टा करतात.कारण तो एकेरी हट्टी व वाह्यातगिरी व व्यसनाधीन अण्णा देशमुखचा मुलगा.दर्यापूरच्या बनोसाचे चावडीवर गावातील दसरा मैदानाची यावर्षी अडचण होणार यासाठी विशेष सभा. सुशांतने लाकूड कारखानदाराला जमीन विकल्यावर दसरा कुठे साजरा करणार यावर सुशांतची समजूत,मात्र रघु सुशांतच्या निर्णयाला समर्थन करतो तेव्हा रघु आगाऊ होत चालला आहे.म्हणून यावर्षी दर्शनाला रघुचा राम गावातील शुभमला देण्याचा निर्णय गावकरी करतात. अण्णा व भाऊ,गावकऱ्यांचा भावी आमदार विक्रम जगताप,प्रकाश ग्रामपंचायत सदस्य,गावची म्हातारी,इतर सर्व रघुला यावर्षी रावणाची भूमिका वठवण्याचा निर्णय घेतात.

रघु,शुभमचे गॅरेजवर रात्री दारू पित शुभमाला राम झेलणार नाही व रघुला रावणाचे स्वातंत्र्य उपभोगण्याची संधी मध्य रात्रीचे प्रकाशातील दृश्य.गावकरी हे दृश्य पाहून रघुला डिवचत असताना शुभम दारूने ओतप्रोत.उपरोधिक भावनेने रघु घरी येतो.ओसरीत स्टूलवर ठेवलेल्या ताटाला अंगणात बसून जेवण करताना शरयू येते.रात्रीचा उशीर आणि रघुचे वागणे बघून निपुटपणे त्याची समज काढताना रघुची जळफळाट आणखी वाढते.वडिलांच्या प्रतिष्ठेला सांभाळत घरची झालेली वाताहत. श्रीरामाचा पालखी सोहळा गावकरी तयारीत, तेवढ्यात रघु एका स्त्रीला (कदाचित गर्भार)घेऊन येतो.गावकरी अचंबित मात्र ती रघुची यवतमाळ येथील मैत्रीण असते. तिला घरात ठेवण्यास आणले म्हणून गावकरी रघुचे निर्लज्जम स्वरूप व अण्णाच्या प्रतिष्ठेची विच्छिन्न दशेची चर्चा.

पालखी निघून जाते. वैदेही रघुची मैत्रीण रात्री पारावर रामनवमीचे निमित्त तालीम करताना सीता होते.तिच्या आयुष्याच्या घटना मांडत रघु बेभान होतो.यावेळीचे दृश्य गावकरी बघून रघु बहिष्कृत.

अण्णा रामनवमीला पालखीची तयारी साठी नात पीहूसहित दीपक काळ करीत, पालखीची तयारी झाली पालखीत रघु टिलक मान नाही.पोलिस फिर्याद रघु विरुद्ध,वैदेही सोबत झालेला प्रकार,रघु बद्दलची गावकऱ्यांची समजूत.भाऊ कडे रघु येतो, कारण गावचे सुशिक्षित व्यक्तिमत्त्व,रघु गुरु. अभिजित अचानक गेल्याने पाणी उपासाचे यंत्र अर्धवट सोडून गेला.ते रघु यंत्र तपास करीत संवाद. भाऊ शेगडीवर शेंगा भाजत, गुळ रघुला देत समजूत घालून रावणाची सकारात्मक भूमिका प्रतिष्ठित करण्याचा सल्ला.सुशांतच्या जमिनीला ताब्यात घेण्यासाठी कंपनीचा मॅनेजर गायकवाड अण्णाला धमकी देताना सुशांत सोबत रघु येतो. व अन्नाची बाजू घेत गावांसाठी रघु कुल एक असल्याचे दाखवत गायकवाड ला परतवतो. गायकवाड आपल्याच अकडेत निघून जाते.

शरयू व वैदेहीचे संवादात रघु बद्दलची समज शरयू घालताना देशमुख वाड्यात दोन टोकाचे व्यक्ती किनारे त्यात शर्युचा प्रवाह. वैदेही रघुची मैत्रीण पण रघुची प्राजक्ता बहिणी ची माया शरयू समजून घेत,रघुला समजून घेताना वैदेही आदर्श रामाच्या मर्यादा व रावणाचे स्वैर शक्तीचे अमर्याद जीवन व्यक्त करत.पुढे रघुला गावकरी चावडीवर अंतिम निर्णय घेऊन गावात झालेल्या प्रकारावर प्रतिबंध लावण्यासाठी तयारीला.दसऱ्याचे दिवशी रंगीत तालमीत रघुला आपले म्हणणे मांडण्याची मुभा भाऊ चे युक्तीने,दसऱ्याला पारावर बसून गावकरी रघुने भाऊची शेती विकसित केल्याचे चित्र.राम प्रवेश, आजी विस्मयीय रावणाची प्रतिक्षा रघु दशानन पेहरावात येतो. राम रघु चे संवाद.भूमिकेची अदलाबदल. आपापल्या जागी दोघेही स्थिर.रघुला त्याचे बदल स्वीकृती, उभय न्याय भूमिकेने अण्णा प्रसन्न व रघु मिळणातून वैदेहीला लेकीचे स्थान देऊन आत्महत्या केलेल्या प्राजक्ताची जागा भरून निघते.सर्व जल्लोषात रावणाचे विचार दहन करून 'दशानन' राम पूजनाने समाप्ती.

देशमुखच्या घरात परंपरागत आदर्श रामाच्या अपेक्षेने रघुला वडिलांकडून मिळालेल्या संस्काराचा परिणाम,पळून लग्न केलेल्या प्राजक्ताला याच घराणेशाहीने गमावल्याची खंत.राम हिरावून घेतल्याने मनातील खदखद.

गावकऱ्यांचे हित व समन्वय साधणारे भाऊ, राजकारणात डाव टाकणारे भावी आमदार अशा वास्तवाला हात घालणाऱ्या नाटकात रघु गावठी(वऱ्हाडी) भाषेवरून शुद्ध भाषेत शुभमचे गॅरेजवर दिसला.अण्णाने रामाला देव्हाऱ्यात अधिष्ठान दिले नाही. राममूर्ती पहिल्या प्रवेशात झाकून.वाड्याला तिन्ही दरात माथ्याचा उंबरठा राहुल गेला.वैदेही शरयू (अडगळ पितळी भांडे घासत) सोबत संवादात गर्भवती दिसली नाही.गायकवाड जमिनीला ताब्यात घेण्यासाठी समन्वयक भूमिकेत कमी पडला.वाड्याला ताटीची संगत उमगत नाही.गावकरी शुभम रघुची रंगीत तालीम बघताना गावकरी अंधारात त्यामुळे त्यांचे हावभाव टिपता आले नाही.कारण यावेळी निर्णय ठरणार होता.

बाकी सर्व उत्तम सादरीकरणात दशानन चे अभय नवाथे यांनी लेखन करून राम,रावण व देशमुखीचे गावव्यवस्थेतील कौटुंबिक, सामाजिक,राजकीय प्रतिबिंब दिग्दर्शक वैभव देशमुख यांनी सादर केले.

शरयू-रेणुका पुराणिक, वैदेही-सिद्धी देशपांडे,सीता-श्रद्धा कडू,आजी व त्रिजटा- रूची वरवट, पीहू - स्वराज्ञी देशपांडे,

राम-शुभम ठाकरे रघु वैभव देशमुख,प्रकाश-अभिजीत झाडे (वेशभूषा),विक्रम- ऋषभ शिरसाट,अण्णा-प्रसाद खरे,भाऊ-अमेय अंसिंगकर,गायवाड-निलेश दद्गाळ (रंगारी) अशा भरगच्च कलावंतसह संगीत अक्षय वैद्य,प्रकाश योजना प्रणव कोर यांनी केले.एक टक नाटक बघताना सुखद क्लायमॅक्स. दर्शकांनी आरंभी तांत्रिक अडचण समजून घेत नाटकाला भरभरून टाळ्या प्रतिसादाने सादरीकरण अव्वल.

**कबीर फादर**
मो.७७९८६४५५६५

## जीवनाचा रंगमंच..

जीवन एक रंगमंच आहे,
आपण सारे कलाकार,
काळाच्या या पडद्यावर
चालतो नित्य व्यवहार।
कधी हसू,कधी
आसवे,कधी सुख-दुःखाचा
वार,
नशिबाच्या या खेळामध्ये
कधी जिंकू, कधी हार।
कोणी राजा,कोणी
रंक,भूमिका वेगवेगळ्या,
क्षणभंगुर या जगात
नातीही होतात बदलणाऱ्या।
कधी मिळतात टाळ्या
इथे, कधी मिळतो अपमान,
शेवटी उरतो फक्त
आपल्या कर्मांचा सन्मान।
कोणी येतो,कोणी जातो,
बदलतात सारे चेहरे,
स्वार्थाच्या या जगात
क्वचितच भेटतात खरे सखे-
नाते रे।
तरीही मनात ठेवूया
आशेचा सुंदर प्रकाश,
अंधाराच्या वाटेवर तोच
देईल जगण्याला नवा श्वास।
स्वप्नांची सजवून दुनिया,
आपण रंगून जातो,
मृगजळाच्या मागे धावत
सत्यापासून दूर होतो।
पण एक दिवस येतो,सारा
प्रवास थांबून जातो,
आणि जीवनाचा पडदा
अलगद खाली होतो।
ना संपत्ती सोबत येते,ना
येतो अभिमान,
ना पद, ना प्रतिष्ठा उरतो
फक्त माणुसकीचा मान।
कर्मांचीच शिदोरी शेवटी
सोबत राहते,
चांगुलपणाची सावलीच
आयुष्यभर साथ देते।
वेळ कुणासाठी थांबत
नाही,तो पुढेच सरतो,
आजचा क्षण जगणारा
खरा आनंदी ठरतो।
म्हणून जगा
मनमोकळे,ठेवा प्रेमाचा
आधार,
दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर
उमटू द्या आनंदाचा झरा।
रंग बदलतात क्षणात,
आयुष्याची ही कहाणी,
हसत-खेळत पार करा ही
जीवनाची वाट सुहानी।
कारण शेवटी संपतोच हा
अभिनयाचा प्रवास,
आणि मागे राहतो फक्त
आपल्या आठवणींचा सुवास।
जीवन एक रंगमंच
आहे..हे सत्य कायम ठेवा,
भूमिका सुंदर निभवा
आणि प्रेमाने जगत राहा।

**गणराज कुमरे,मोर्शी**
मो.७७०९३८८२११

## चैत्रगौर पुजायची

चैत्रगौर पुजायची
चैत्रामध्ये मनोभावे
गाठी,फुल हार देता
गीत देवीसाठी गावे...

सजावट सुंदरशी
गौर खेळे मखरात
नानाविध पुष्प फळे
बघा सजले ताटात..

सण हळदीकुंकाचा
सवाष्णीची ओटी भरा
डाळ. आणि हरभरे
भिजलेली देवू चला...

कैरी पन्हे देवूनिया
रस आनंदाचा घेऊ
एकमेका भेटुनिया
ऐक्य,मैत्री मनी ठेऊ..

आली माहेराशी गौर
तिला सुख द्यावयाचे
तिच्या सहवासा कसे
दुःख दूर सारायाचे...

**ॲड.सुलभा गोगरकर,**
अमरावती

## महाराष्ट्र भूमी

ही भूमी शिवरायांची,
शाहू-फुले-आंबेडकरांची:
अलीकडे इथे विटंबना
होते महापुरुषांच्या
विचारधारेची

आता विसंगती भासते या
सर्वांच्या विचारधारेशी
कारण इथे दिवसाढवळ्या
होते कत्तल
स्त्रीसन्मानाची,शेतकऱ्यांची,
गोरगरिबांची,सर्वसामान्यांची

राखणदार आता इथे कुणी
नाहीएके काळी होते
बहुजनांच्या साठी
अत्रे-ठाकरे आता होत
नाहीत दाभोलकर झाले तर
टिकू देत नाहीत
कारण इथे चूल पेटली
स्वार्थी आणि निर्लज्ज
राज्यकर्त्यांची

तरीही या कपटी आणि
राजकारणी लोकांना न
जुमानता अस्तित्व टिकवते
स्वाभिमानी जनता
कारण ही भूमी
शिवरायांची शाहू-फुले-
आंबेडकरांची
संत महंत आणि
शुरविरांची
ही भूमी महाराष्ट्राची!

**रणजीत बाणखेले**
मो. ९३२५२९६६६४

# पोलीस अधीक्षक कार्यालयाला ई-गव्हर्नन्समध्ये राज्यात तृतीय क्रमांक

## मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते एसपी अर्चित चांडक यांचा गौरव

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्य शासनाच्या ई-गव्हर्नन्स मोहिमेत अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान २८ मार्च २०२६ रोजी प्रदान करण्यात आला.*



महाराष्ट्र शासनातर्फे शासकीय कार्यालयांमध्ये डिजिटल सेवांचा वापर वाढवण्यासाठी १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला होता. या विशेष मोहिमेत अकोला पोलीस दलाने अर्चित चांडक यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी अंमलबजावणी करत राज्यात आपली छाप पाडली.

या मोहिमेअंतर्गत राज्यातील ३४ जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांचे दोन टप्प्यांत मूल्यमापन करण्यात आले. संकेतस्थळाची कार्यक्षमता, 'आपले सरकार' प्रणालीचा वापर, ई-ऑफिस अंमलबजावणी, डॅशबोर्ड सुविधा, व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर तसेच भौगोलिक माहिती प्रणाली या सात महत्त्वाच्या निकषांवर मूल्यांकन झाले. या सर्व निकषांमध्ये अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात तिसरे स्थान मिळवले.

या यशामुळे पोलीस प्रशासनातील डिजिटल कार्यपद्धती अधिक सक्षम झाली असून नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. अकोला पोलिसांच्या या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या यशामागे तांत्रिक पातळीवर महत्त्वपूर्ण योगदान देणारे किशन पनपालीया, पोउपनि पठाण, गोपाल मूकंदे, आशिष आमले तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. हा सन्मान एसपी अर्चित चांडक यांनी अकोल्यातील नागरिक, माध्यम प्रतिनिधी आणि संपूर्ण पोलीस दलाला समर्पित केला आहे.

# रिधोरा जंगलातील खुनाचा २४ तासांत पर्दाफाश; दोन आरोपी जेरबंद

- दारूच्या नशेत मित्राचाच केला खून
- स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

रिधोरा शेतशिवारातील दुर्गम जंगल भागात सापडलेल्या अनोळखी मृतदेहाच्या प्रकरणाचा केवळ २४ तासांत छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेने खुनाचा गुन्हा उघडकीस आणला असून दोन आरोपींना अटक केली आहे. दारूच्या नशेत झालेल्या वादातून मित्रांनीच मित्राचा खून केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

२६ मार्च रोजी दुपारच्या सुमारास रिधोरा परिसरातील जंगलात एक अनोळखी व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाची अवस्था अत्यंत बिकट असल्याने ओळख पटविणे मोठे आव्हान होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बाळापूर उपविभागाचे अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. प्रथमदर्शनी हा घातपात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक शंकर शेळके (स्थानिक गुन्हे शाखा, अकोला) यांनी तत्काळ दोन विशेष पथके तयार करून तपासाची सूत्रे हाती घेतली. मृतदेहावरील कपडे व वस्तूंवरून आजूबाजूच्या गावात शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर मृताची ओळख सचिन वाल्मीक खंडारे (वय २९, रा. अमानतपूर, ता. बाळापूर) अशी पटली.



त्यानंतर पोलिसांनी मृताच्या हालचालींचा तपास करत परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. यात सचिन हा त्याचे मित्र आदेश सुधीर डोंगरे (वय २४) व अभिषेक प्रकाश गवळी (वय २४, दोघेही रा. हाथरून, ता. बाळापूर) यांच्यासोबत मोटारसायकलवर जाताना दिसून आला. संशयाच्या आधारे दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

दारूच्या नशेत झालेल्या वादातून संतापाच्या भरात दोघांनी सचिनचा खून केल्याचे उघड झाले. त्यानंतर मृतदेह जंगलात टाकून आरोपी फरार झाले होते.

दरम्यान, आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी सापळा रचत अभिषेक गवळी याला दर्यापूर (जि. अमरावती) येथून तर आदेश डोंगरे याला भुसावळ (जि. जळगाव) येथून अटक केली. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

तपास पथकात पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक गोपाल जाधव, विष्णू बोडखे, माजिद पठाण तसेच कर्मचारी शेख हसन, अब्दुल माजीद, वसीमुद्दीन, किशोर सोनोने, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, भास्कर धोत्रे, श्रीकांत पातोंड, अशोक सोनवणे, राहुल गायकवाड, भिमराव दिपके व चालक प्रशांत कमलाकर, देवानंद खरात यांचा समावेश होता. अत्यंत दुर्गम भागात कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह, कोणताही ठोस धागा नसताना केवळ २४ तासांत गुन्ह्याचा छडा लावल्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# काही तासांत हत्या उघडकीस; वहिनी-पुतण्याकडून खून

## माना पोलिसांची जलद कारवाई; गावात खळबळ

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

तालुक्यातील माना पोलीस ठाणे हद्दीतील वाई (माना) येथे घडलेल्या हत्येच्या प्रकरणाचा उलगडा काही तासांत करत पोलिसांनी मृतकाची वहिनी व पुतण्याला अटक केली आहे. संजय रामकृष्ण भटकर (वय ५०) यांचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दि. २६ मार्च रोजी सकाळी संजय भटकर हे घरामागील गोठ्यात मृतावस्थेत आढळून आले. याप्रकरणी त्यांचे भाऊ गोपाल भटकर (रा. वाई (माना), सध्या मुक्काम शिवाजीनगर, मूर्तिजापूर) यांनी माना ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. प्रारंभी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती.दरम्यान, मृतदेहाचे मूर्तिजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्राथमिक अहवालानुसार गळा आवळल्याने श्वास गुदमरून मृत्यू (ॲस्फिक्सिया) झाल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे प्रकरणाने हत्या स्वरूप धारण केले.

त्यानंतर ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गोपनीय माहितीच्या आधारे मृतकाची वहिनी संगीता विनोद भटकर (वय ४८) व पुतण्या स्वप्नील विनोद भटकर (वय २५, दोन्ही रा. वाई (माना)) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. घरगुती वादातून दि. २६ मार्च रोजी सकाळी सुमारास दोघांनी मिळून संजय भटकर यांना मारहाण करून गळा आवळत हत्या केल्याचे उघड झाले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये गुन्हा नोंद करून दोघांना अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या कारवाईसाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांचे मार्गदर्शन लाभले. ठाणेदार गणेश नावकार, पोउपनि महाजन तसेच पोलीस पथकातील कर्मचाऱ्यांनी ही कारवाई पार पाडली.

# अकोला पोलीसांची डिजिटल झेप

डिजिटल सेवांचा वापर वाढवून प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता आणण्यासाठी शासनाकडून सातत्याने नवनव्या उपक्रमांची अंमलबजावणी होते. '१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रम' या विशेष मोहिमेतही हा महत्वाचा निकष होता. या मोहिमेत अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयाला राज्यात 'ई-गव्हर्नन्स' मध्ये तृतीय क्रमांक मिळाला आहे.

अकोला जिल्हा पोलीस दलाने डिजिटल सेवांचा प्रभावी वापर करून प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता आणल्याने हा बहुमान मिळाला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचा मुंबई येथे गौरव करण्यात आला.

या मोहिमेत संकेतस्थळाची उभारणी, 'आपले सरकार' प्रणालीची अंमलबजावणी, ई-ऑफिसचा वापर, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सुविधा यासह कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर हे निकष होते. या सर्व निकषांची अंमलबजावणी करून अकोला जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाने डिजिटल प्रशासनाची दिशा अधिक ठळक केली आहे. जिल्हा पोलीस दलाने राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा मिळत आहेत. 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' आणि 'प्रोजेक्ट रक्षा' असे त्यात प्रमुख उपक्रम आहेत. 'प्रोजेक्ट त्रिनेत्र' हा एआय आधारित प्रकल्प असून, गुन्हे घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात. त्यामुळे 'बॉडी क्राईम' प्रकारातील गुन्ह्यांमध्ये तब्बल ६४ टक्के घट झाली आहे. तसेच, 'प्रोजेक्ट रक्षा' या नागरिक प्रतिसाद



प्रणालीद्वारे पोलीस सेवांची गुणवत्ता तपासून आवश्यक सुधारणा करण्यात येतात. यामुळे जिल्ह्याचा नागरिक विश्वास निर्देशांक १० पैकी ८.९ इतका उत्कृष्ट नोंदवला गेला असून, सार्वजनिक सुरक्षिततेची भावना वाढल्याचे ते द्योतक आहे. गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अकोला पोलीस दलाने 'ऑपरेशन प्रहार' राबवून ८.२१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय, 'मिशन उडाण' अंतर्गत १८०० हून अधिक शाळांमध्ये अंमली पदार्थविरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे.

एकूणच, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या जोरावर अकोला पोलीस दलाने गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्याबरोबरच, नागरिकांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यातही यश मिळवले आहे. त्यामुळे ई-गव्हर्नन्स उपक्रमात त्याची ठळक नोंद घेतली गेली आहे.

**हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

# महानगरात निघणार हनुमान जयंतीची भव्य शोभायात्रा

■ प्रतिनिधी | अकोला ■

हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला आकर्षक झाक्या, पारंपरिक दिंडी, भजनी मंडळ व ढोल-ताशांच्या गजरात शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ही शोभायात्रा आकर्षक देखाव्यांसह धार्मिक आणि सांस्कृतिक आकर्षण ठरणार असून महाआरतीने शोभायात्रेचा समारोप करण्यात येणार असल्याची माहिती हनुमान जयंती शोभायात्रा समितीचे अविनाश देशमुख यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.बुधवार दि १ एप्रिल रोजी साय ४ वाजता राजराजेश्वर मंदिरात मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून या शोभायात्रेचा प्रारंभ होणार आहे. त्यानंतर ही शोभायात्रा जयहिंद चौक, मोठा पूल, सिटी कोतवाली, गांधी रोड मार्गे गांधी




चौक, महानगरपालिका, पंचायत समिती मार्गे होमगार्ड ऑफिस, खोलेश्वर परिसरातून सिटी कोतवाली परिसरातील हनुमान मंदिर येथे पोहोचणार आहे. येथे महाआरतीने शोभायात्रेचा समारोप होईल.या महोत्सवाची माजी आ बबनराव चौधरी, माजी आ गोपीकिसन बाजोरिया, हरिदास भदे, बालमुकुंद भिरड, रमाकांत खेतान, रामप्रकाश मिश्रा, प्रा. संतोष हुसे, विनायकराव पवार, प्रदीप खाडे यांच्या मार्गदर्शनात तयारी पूर्ण झाली आहे. बुधवार दि १ एप्रिल रोजी शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर मंदिरात मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून शोभायात्रेचा शुभारंभ होणार आहे. त्यानंतर ही शोभायात्रा जयहिंद चौक, मोठा पूल, सिटी कोतवाली, गांधी रोड मार्गे गांधी चौक, मनपा, पंचायत समिती मार्गे होमगार्ड ऑफिस, खोलेश्वर परिसरातून सिटी कोतवाली परिसरातील हनुमान मंदिर येथे पोहोचणार आहे. येथे महाआरतीने शोभायात्रेचा समारोप होईल.या महोत्सवात सर्व हनुमान भक्तानी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. शोभायात्रेदरम्यान भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची, आरोग्य सुविधा व प्रथमोपचार केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, स्वयंसेवकांची विशेष पथके तैनात राहणार आहेत. हनुमान जयंतीच्या निमित्ताने आयोजित ही शोभायात्रा अकोला शहरात धार्मिक उत्साह, सांस्कृतिक परंपरा आणि एकात्मतेचे प्रतीक ठरणार असून, हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडणार आहे.

## रिपाइं (आठवले)त घेतला अनेक युवकांनी प्रवेश रिपाइंची जिल्हा बैठक संपन्न

**अकोला :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले अकोलाची जिल्हा बैठक जिल्हाध्यक्ष सुनील अवचार यांच्या अध्यक्षतेत शनिवारी शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली. बैठकीत पातूर तालुक्यातील सस्ती येथील युवकांनी रिपाइं मध्ये प्रवेश घेतला. या बैठकीत प्रामुख्याने जिल्ह्यातील ग्रामपंचायत सरपंच यांनी शेतीसाठी १९९० पूर्वी करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यासाठी जी नीती आखली ती कायदेशीर मार्गाने हाणून पाडण्याचा ठराव या बैठकीत घेण्यात आला.तसेच या वर्षीची डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सामाजिक उपक्रम राबवून साजरी करण्यात यावी असा सर्वानुमते ठराव घेण्यात आला.

**Change In Name**

I Have Changed My Name From
**YUSARA SAMIN AHMED**
-TO-
**YUSRA SAMEEN SHAHZAD AHMED**
Passport No :- K6773774
My Residential Address in:- Aqsa Apartment Flat no .2 2nd floor Kalal Ki Chal Momin Pura Akola 444001

**Change In Name**

I Have Changed My Name From
**MAHEZIYA SYED HASNUDDIN**
-TO-
**MAHEZIA SYED HASNUDDIN**
Old Passport No : J9737663My Residential Address: SYED PURA PATUR, AT POST, PATUR TQ, PATUR DIST, AKOLA 444501

**Change In Name**

I Have Changed My Name From
**MAHEZIYA YUNUSODDIN FAROOQUI**
-TO-
**MAHEZIA YUNUSUDDIN FAROOQUI**
Old Passport No :F0181402My Residential Address:SYED PURA PATUR, AT POST, PATUR TQ, PATUR DIST, AKOLA 444501

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४७४/२०२६ — प्रोसेस नं.४२१५/२०२६
चौ.ता. ३०/०४/२०२६ — दिनांक : २५/०३/२०२६

**अर्जदार :** १. मनोज रामजी कावळे रा. हनुमान मंदिर जवळ, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला २. इंदुबाई रामजी कावळे रा हनुमान मंदिर जवळ, लहान उमरी, अकोला, ता जि अकोला ३. शोभा बाळू कैकाली रा. वार्ड नं. ४, रेणुका नगर, मु. पो. कमरगाव, ता. कारंजा, जि. वाशिम ४. शारदा संजय केकाडे रा. वार्ड नं. ३, तेली पुरा, मु. पो. खेळ चौधर (कारजगाव), ता चांदुर बाजार जि. अमरावती. ५. संगिता गजानन ठाकरे रा. तेलीपुरा, ता. कारंजा, जि. वाशिम. ६. आशा यशवंत सहारे रा. मराठी शाळेजवळ, तेलीपुरा, जुना टाउन, बडनेरा, मु. पो. बडनेरा ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामजी पांडुरंग कावळे
**पत्ता :-** रा. हनुमान मंदिर जवळ, लहान उमरी, अकोला ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या असे नमूद केले आहे की, मयत रामजी पांडुरंग कावळे यांचे दि. २०/०८/२०२५ रोजी लहान उमरी, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे..

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इत्तर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकतदाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली उण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### मालमत्ता विक्रीची निविदा नोटीस

सदर नोटीस द्वारे सर्व लोकांना कळविण्यात येत आहे की, श्रीमती बसंती चांडक रिलिक फाउंडेशन अकोला रजिस्टर नंबर ई- २१९ या संस्थेच्या / न्यासाच्या मालकीची व ताब्यात असलेली व सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला येथील रेकॉर्डवर नोंद असलेली स्थावर मालमत्ता जिचे वर्णन:- मौजे अकोला येथील रामदास पेठ भागामधील बिल्डिंग नं. २३६, प्लॉट नं. २९, सर्वे नं. ५० सी, जुना वॉर्ड नं. ३८ याची चतु:सीमा:- उत्तर :- सर्व्हिस गल्ली, दक्षिणेस:- लेआउट रोड, पश्चिमेस :- श्री गाडेकर यांची मालमत्ता (सीटी हॉस्पिटल) पूर्वेस :- लेआउट रोड.

सदरच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या स्थितीमध्ये विक्री करायची आहे. तरी या जाहीर निवेदनाद्वारे इच्छुक लोकांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी कोणालाही सदर मालमत्ता विकत घ्यायची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आपली मागणी किंमत ची निविदा सीलबंद लिफाफ्यामध्ये टाकून खालील पत्त्यावर स्वतः किंवा अधिकृत व्यक्तीद्वारे पाठवावी. तसेच रुपये १,००,०००/- (एक लाख) किंमतीचा डी.डी. (डिमांड ड्राफ्ट) संस्थेच्या नावाने विनाअटी प्रत्यक्ष अधिकृत पत्त्यावर अधिकृत व्यक्तीकडे म्हणजेच निविदा काढणाऱ्यांकडे जमा करावा, तसेच त्यांच्याकडून पोच पावती घ्यावी. पोच पावती शिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा नामंजूर झाल्यास डी. डी. परत करण्यात येईल.

बंद लिफाफे खालील पत्त्यावर संस्थेचे विश्वस्त यांच्यासमोर उघडण्यात येतील. मुदतीनंतर मिळालेल्या कोणत्याही निविदेचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. मालमत्तेची विक्री ही सर्वोच्च निविदा धारकास देण्यात येईल. ज्या निविदाधारकाची निविदा न्यासाने मंजूर केली असेल त्याला इसारा पोटी ३० टक्के रक्कम संस्थेच्या नावे चेक / डिमांड ड्राफ्ट द्वारे जमा करावी लागेल. काही कारणास्तव धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांनी परवानगी नाकारल्यास सदर इसारा पोटी घेतलेली रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल. कोणतेही कारण किंवा पूर्व सूचना न देता निविदा नाकारण्याचा किंवा विक्री प्रक्रिया थांबवण्याचा किंवा सदरच्या प्रक्रियेमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे. मालमत्ता विक्री बाबत सर्व अंतिम अधिकार हे संस्थेला राहतील. तसेच माननीय धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांच्याकडून सदर मालमत्ता विक्रीला परवानगी मिळाल्यानंतर खरेदी व्यवहार करण्यात येईल व मालमत्ताचा त्या स्थितीमध्ये ताबा देण्यात येईल. ज्या नावाने परवानगी प्राप्त झाली त्याला खरेदीचा खर्च व इतर कायदेशीर खर्च करावा लागेल. करिता आज दिनांक २७/०३/२०२६, वार शुक्रवार रोजी सदरची नोटीस विश्वस्त यांच्या सहीने प्रसिद्ध करण्यात येत आहे.

दिनांक २७/०३/२०२६
स्थळ :- अकोला

**निविदा पाठविण्याचा पत्ता:**
कार्यालय,
श्रीमती बसंती चांडक रिलिक फाउंडेशन,
अकोला रामदास पेठ, अकोला ४४४००५

**विश्वस्त यांची सही व शिक्का**
Smt. Basanti Chandak Relief Foundation

### जाहीर नोटिस

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते कि आमचे पक्षकार श्रीमती. किरण सुभाष बोरकर, रा. भीम नगर, पातूर, ता. पातूर, जि. अकोला यांच्या मालकीचे व ताब्यातील मालमत्ता जिचे वर्णन ग्रा. पं. शिर्ला हद्दीतील व नगर परिषद पातूर हद्दीबाहेरील मौजे पट्टी आमराई, ता. पातूर, जि. अकोला येथील प्लॉट क्र. २४अे, सर्वे क्र. ४३१/२, क्षेत्रफळ ११२.५० चौ.मी. म्हणजेच १२१०.५ चौ. फुट व त्यावरील बांधकाम असे असून सदर मालमत्तेच्या चतु:सिमा पूर्वेस - प्लॉट क्र. २३बी; पश्चिमेस - प्लॉट क्र. २४बी; उत्तरेस - प्लॉट क्र. ४२; दक्षिणेस- ९ मी. रोड याप्रकारे आहेत. सदर प्लॉट हा वि. उपविभागीय अधिकारी साहेब, बाळापुर यांचेकडील मा.क्र. एनएपी/३४/पातूर/२२/२००६-०७ या प्रकरणातील दि. २८/११/२००७ च्या आदेशानुसार निवासी प्रयोजनार्थ बिनाशेतीकडे परावर्तीत करण्यात आलेला आहे.

वर नमूद मालमत्ता श्रीमती. किरण सुभाष बोरकर यांनी हबीबशाह याकुबशाह यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखत क्र. ६२२/२०२२ दि. १९/०४/२०२२ नुसार विकत घेतली आहे. सदर मालमत्ता विकत घेतांना श्रीमती. किरण सुभाष बोरकर यांनी सदर मालमत्तेचे यापूर्वीचे मालक अविनाश त्र्यंबक महाजन यांचे कुलमुखत्यार सुधीर वसंतराव पाध्ये यांनी श्रीमती. रजनी अनिल बंड यांना करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. १३७२/२००८ दि. २५/०८/२००८ व श्रीमती. रजनी अनिल बंड यांनी हबीबशाह याकुबशाह यांना करून दिलेले नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३२/२०१२ दि. ०४/०१/२०१२ ताब्यात घेतले होते. सदर मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. १३७२/२००८ दि. २५/०८/२००८ व ३२/२०१२ दि. ०४/०१/२०१२ हे श्रीमती. किरण सुभाष बोरकर यांचे ताब्यातुन आजरोजी गहाळ झालेले आहे. अनेक ठिकाणी शोध घेऊनही सदर दस्तऐवज सापडले नाहीत.

वर नमुद मालमत्ता तसेच गहाळ झालेले वर नमुद मुळ दस्तऐवज कोणत्याही बँकेकडे, वित्तीय कंपनी अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोजा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास किंवा इतर कोणतीही भानगड असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह द्यावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता हि बिनबोजा, बिनभानगडीचे असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मग कुणाची काहीही हरकत आमचे पक्षकारावर लागु व बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर गहाळ झालेले मुळ दस्तऐवज कुणासही सापडले असता त्यांनी खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला,
दि. २८/०३/२०२६.

**ॲड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ७०/२०२५ कलम १९
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** पशुपतीनाथ महादेवाचे मंदिर माझोड ता. जि. अकोला
**अर्जदार :-** श्री. नीलकमल ज्ञानदेव ताले रा.माझोड ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** १७१७/- श्री. नीलकमल ज्ञानदेव ताले यांचे ताब्यात आहे.

**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे माझोड ता. जि. अकोला येथील गट नंबर ५३९ मध्ये सामाईक क्षेत्रातील गावाकडील उत्तरेकडील अर्धे क्षेत्र श्री. नीलकमल ज्ञानदेव ताले यांच्या हिश्यातील असलेले क्षे. १.३६ मध्ये मंदिर बांधकाम, मोजमाप फुटात प्रशांत ताले यांच्या खाली प्लॉटच्या बाजूला २०० चौ.मी.

जागेची चतुःसीमा: पुर्वेस- रोड पश्चिमेस - नीलकमल ज्ञानदेव ताले यांचे शेत उत्तरेस - प्रशांत ताले यांचे शेत दक्षिणेस - रोड स्थावर मालमत्तेची अंदाजे किंमत ३,००,०००/- (तीन लक्ष रुपये)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच, वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दि जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ११५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# शिक्षण विभागाचा गोंधळ की ठरवून केलेला व्यवहार

## बिंदू नामावली डावलून शिक्षकांची सरसकट हलवाफलवी; शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**वर्धा/जनमाध्यम**

नियम धाब्यावर बसवून, पारदर्शकतेच्या नावाखाली गोंधळाचा खेळ मांडत माध्यमिक शिक्षण विभागाने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची प्रक्रिया राबविल्याने शिक्षण क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे. अद्ययावत बिंदू नामावली आणि संचमान्यता अपूर्ण असतानाही २५ मार्च रोजी ९० शिक्षक व ३७ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सरसकट हलवाफलवी करण्यात आली. हा निर्णय म्हणजे शिक्षण व्यवस्थेच्या गाभ्यावर घाव असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

शाळांची संचमान्यता पूर्ण झाल्याशिवाय समायोजन करणे अपेक्षित असताना, १७ मार्चलाच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जयश्री राऊत यांच्या दालनात आक्षेपांवर सुनावणी घेण्यात आली आणि त्यानंतर केवळ आठ दिवसांत प्रक्रिया रेटून नेण्यात आली. वरकरणी सर्व काही सुरळीत आणि पारदर्शक असल्याचा आभास निर्माण करण्यात आला, मात्र वास्तवात अनेक शाळांनी बिंदू नामावली स्पष्टच केली नव्हती, तरीही त्यांच्या शिक्षकांचा समावेश करण्यात आल्याने 'सगळं काही ठरवूनच झालं का असा संशय व्यक्त होत आहे.न.प. शाळा आर्वी, मॉडेल हायस्कूल आर्वी, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावतीसारख्या संस्थांकडून बिंदू नामावली स्पष्ट नसतानाही त्यांच्या शिक्षकांचे समायोजन झाल्याचे समोर येत आहे. यामुळे नियमांचे पालन झाले की केवळ कागदी घोडे नाचवले गेले, यावर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.समायोजन प्रक्रियेदरम्यान 'प्रहार' शिक्षक संघटनेने शून्य शिक्षकी शाळांचा मुद्दा उपस्थित करत सुरुवातीलाच बहिष्काराचे



हत्यार उपसले. शून्य शिक्षक असलेल्या शाळांचे का असा प्रश्न करत त्यांनी प्रशासनाला कोंडीत पकडले. अखेर चर्चेनंतर संघटनेच्या मागण्या मान्य करत सुमारे २३ शिक्षकांना प्रक्रियेतून वगळण्यात आले.

यामुळे संपूर्ण समायोजन प्रक्रियेची विश्वासार्हताच धोक्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या १८ मार्चच्या आदेशाचा आधार घेत मागील वर्षाची संचमान्यता गृहीत धरून समायोजन करण्यात आले. पण हा आदेश कोणाच्या हितासाठी आणि कोणत्या निकषांवर राबविला गेला, याचे उत्तर मात्र अद्याप धूसरच आहे. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत 'हा नियम की अपवाद असा प्रश्न उपस्थित केला आहे.समायोजन प्रक्रिया सायंकाळपर्यंत चालली. सकाळी शिक्षक आणि त्यानंतर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात आले. मात्र, संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकतेपेक्षा दबाव आणि भीतीचे वातावरण अधिक जाणवले. अनेक शिक्षकांनी नाराजी असूनही उघडपणे बोलणे टाळले. 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' सहन करण्याची वेळ आल्याची कुजबुज शिक्षण वर्तुळात रंगू लागली आहे.या संदर्भात शिक्षणाधिकारी जयश्री राऊत यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांनी प्रतिसाद देणे टाळले. त्यामुळे शंका अधिकच गडद होत आहेत.

### प्रश्नांचा भडिमार उत्तरं मात्र गायब

बिंदू नामावली नसताना समायोजन का?
मागील वर्षाची संचमान्यता गृहीत धरण्याचा निकष कोणता?
२३ शिक्षकांना वगळण्याचा निर्णय अचानक का?

### संतापाची ठिणगी पेटलीच

१०० टक्के संचमान्यता नसताना समायोजन करणे अन्यायकारक होते. शून्य शिक्षकी शाळांबाबत धोरण स्पष्ट नसतानाही प्रक्रिया राबविली गेली. मात्र शासनाने २४ मार्चला काही अटी शिथिल केल्याने आम्ही सहकार्य केले.

**अजय भोयर,**
नागपूर विभाग प्रमुख, प्रहार शिक्षक संघटना

### पारदर्शकतेच्या नावाखाली नेमका कोणाचा फायदा

शिक्षण विभागाच्या या कारभारामुळे आता केवळ समायोजन नव्हे, तर संपूर्ण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# ढोंगी बुवाबाबांवर कारवाईची अंनिसची मागणी



**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात उघडकीस येत असलेल्या ढोंगी बुवाबाबांच्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) तर्फे पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. महिलांची शारीरिक, मानसिक व भावनिक फसवणूक रोखण्यासाठी जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात अलीकडे गाजलेल्या अशोक खरात प्रकरणाचा उल्लेख करत अशा ढोंगी प्रवृत्तींची पाळेमुळे शोधून कठोर कारवाई करावी, असे नमूद करण्यात आले. तसेच देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घालून जादूटोणा विरोधी कायद्याचा प्रचार-प्रसार व अंमलबजावणी अधिक सक्षम करावी,अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. जादूटोणा विरोधी कायद्याचा प्रचार-प्रसार, प्रशिक्षण व जनजागृतीसाठी समिती निःशुल्क तज्ञ मदत देण्यास तयार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. गावपातळीवर समित्या स्थापन करून अशा प्रकारांना आळा घालावा व दोषींवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी गजेंद्र सुरकार, डॉ. माधुरी झाडे, द्वारकाताई इमडवार, रोहिणी पाटील, प्रतिभा ठाकूर, प्रकाश कांबळे, सुनील ढाले, ॲड. गजानन पखाले, राजू तेलतुंबडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त



### जंजाळ कुटुंबाला आर्थिक दिलासा

**गौळ-**येथील जंजाळ कुटुंबावर ओढवलेल्या दुःखद प्रसंगात ग्रामसेवा लोक अभियान (विदर्भ) पुढे सरसावले असून, संयोजक बंडू आंबटकर यांनी कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात दिला. त्यांनी कुटुंबीयांची भेट घेऊन पाच हजार रुपयांची मदत सुपूर्द केली. वैशाली दीपक जंजाळ (वय ३५) यांचे २३ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात नव वर्षांची मुलगी असून ती इयत्ता तिसरीत शिक्षण घेत आहे. वडील वेगळे राहत असल्यामुळे सध्या मुलीचा सांभाळ मामा व आजीकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर मुलीच्या शिक्षणासाठी आर्थिक मदतीची गरज ओळखून ही मदत करण्यात आली.ग्रामसेवा लोक अभियान विदर्भात विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय असून, अडचणीत असलेल्या कुटुंबांना मदतीचा आधार देत आहे. चांदूर रेल्वे येथे संस्थेचे कार्यालय असून, अनेक गरजू कुटुंबांना यापूर्वीही सहाय्य करण्यात आले आहे. यावेळी काव्या दीपक जंजाळ हिच्या दहावीपर्यंतच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च ग्रामसेवा लोक अभियान उचलणार असल्याची माहिती बंडू आंबटकर यांनी दिली. या निर्णयामुळे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रसंगी प्रकाश रंगारी, पोलीस पाटील अरविंद काबंळे, प्रजात काबंळे, रमेश मोरे तसेच कुटुंबीय उपस्थित होते.

### कर्मचाऱ्याला मारहाण

**वर्धा-**मजूर वेळेवर न पाठवल्याच्या कारणावरून सोलर कंपनीतील कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आल्याची घटना बोरगाव (मेघे) येथील गिट्टी खदान परिसरात घडली. शेख शकील शेख कालू (३२) हे संबंधित कंपनीत कार्यरत असून तेथे अक्षय पटले हा मजूर म्हणून काम करतो. दरम्यान मजूर वेळेवर उपलब्ध न करून दिल्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. हा वाद चिघळत गेल्याने अक्षय पटले याने शेख शकील यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमीने दिलेल्या तक्रारीवरून वर्धा शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

### जुन्या वादातून मारहाण; इसम जखमी

**वर्धा -** जुन्या वादातून पुन्हा भांडण उफाळून आल्याने सेवाग्राम येथे एका इसमाला मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली. सचिन जंगले (४३) हे पानठेल्यावर बसले असताना गावातील अजय शिवनकर तेथे आला. दोघांमध्ये पूर्वीपासून वाद असल्याने किरकोळ कारणावरून पुन्हा वाद निर्माण झाला. हा वाद वाढत गेल्याने बंटी गोसावी याने हस्तक्षेप करत सचिन जंगले यांना मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले. घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमीच्या तक्रारीवरून सेवाग्राम पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# नवोदय प्रवेशात अद्विकाचे यश

**वर्धा/जनमाध्यम**

सेलूकाटे येथील अद्विका बाबुलाल चावके हिने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश मिळवत विद्यालयात प्रवेशासाठी निवड मिळवली आहे. तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.



अद्विकाने नवोदय प्रवेश परीक्षेसाठी वैशाली मेंढेवार कोचिंग क्लासेस येथे मार्गदर्शन घेतले होते. नियमित अभ्यास, सातत्यपूर्ण मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले. स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवण्यासाठी तिची जिद्द आणि चिकाटी निर्णायक ठरली.तिच्या या यशाचे श्रेय अद्विकाने कोचिंग क्लासेसच्या वैशाली मेंढेवार यांच्यासह वडील बाबुलाल चावके आणि आई नम्रता चावके यांच्या प्रोत्साहनाला दिले आहे.अद्विकाच्या या यशामुळे तिच्या कुटुंबीयांसह शिक्षक व मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण असून, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निसर्गाशी नाळ जपणारा प्रेरणादायी उपक्रम-डॉ.डी.के.अग्रवाल

**वर्धा/जनमाध्यम**

निसर्ग आणि मानव यांचे नाते हे रक्ताच्या नात्याइतकेच घट्ट असताना, आधुनिक धावपळीत माणूस निसर्गापासून दूर जात चालला आहे. या तुटलेल्या नाळेला पुन्हा जुळविण्याची गरज अधोरेखित करत प्रत्येकाने आपल्या वाढदिवशी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असा हृदयस्पर्शी संदेश कराड येथील कृष्णा मेडिकल विश्वविद्यालयाचे संचालक डॉ. डी. के. अग्रवाल यांनी दिला.



### जन्मदिवशी एक वृक्ष...

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजिनिअर भाऊ थुटे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रख्यात होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. अनिल लोणारे उपस्थित होते. यावेळी डॉ. कुंभारे, होमगार्डचे माजी जिल्हा समादेशक कॅप्टन मोहन गुजरकर आणि निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे मंचावर उपस्थित होते.कार्यशाळेची सुरुवात डॉ. दत्तात्रय कुंभारे यांच्या वाढदिवसानिमित्त ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षारोपण करून करण्यात आली. या प्रतीकात्मक कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा ठोस संदेश देण्यात आला.यानंतर डॉ. अनिल लोणारे यांनी होमिओपॅथी उपचार पद्धतीवर सखोल मार्गदर्शन करत तिचे महत्त्व आणि परिणामकारकता उलगडून सांगितली. मुरलीधर बेलखोडे यांनी प्रास्ताविकातून ऑक्सिजन पार्कच्या उपक्रमांची यशोगाथा मांडत निसर्गसेवेचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यशाळेचा समारोप 'होमिओपॅथी मेडिकल असोसिएशन ऑफ इंडिया, शाखा वर्धा'च्या वतीने ऑक्सिजन पार्क परिसरात तब्बल ४० वृक्षांची लागवड करून करण्यात आला. शोभा बेलखोडे यांच्या निसर्गगीताने वातावरण भारावून गेले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद भोयर यांनी केले, विनोद वाघ यांनी भजन सादर केले, तर मुरलीधर बेलखोडे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# मनरेगा निधी अपहार प्रकरण : बीडीओं'ना धरणार 'आयओ' धारेवर

## सोमवारपासून झाडाझडती, २०१४ ते २०२५ मधील अधिकारी रडारावर

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वी पंचायत समितीत उघडकीस आलेल्या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील ७० लाखांहून अधिक निधी अपहार प्रकरणाने आता नवे वळण घेतले आहे. आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणाच्या तपासाला वेग देत ३० मार्च पासून झाडाझडती मोहीम हाती घेण्याचे निश्चित केले आहे. तपासाचा धागा अधिक घट्ट करत २०१४ ते २०२५ या कालावधीत गटविकास अधिकारी (बीडीओ) म्हणून कार्यरत असलेल्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना चौकशीच्या कक्षेत आणले जाणार आहे.

या प्रकरणात केवळ प्राथमिक विचारपूस करून बयाण नोंदवले जाणार की थेट आरोपींची साखळी उलगडत अटकसत्र सुरू होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आर्थिक लाभासाठी हिस्सेवाटणीच्या आरोपांनी आधीच कलंकित झालेल्या या प्रकरणात १२ बीडीओंच्या डिजिटल स्वाक्षऱ्यांचा (डीएससी) वापर झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

त्यामुळे या सर्व अधिकाऱ्यांवर तपास अधिकाऱ्यांची नजर रोखलेली आहे.आर्वी पंचायत समितीतल्या या गैरव्यवहाराने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. आतापर्यंत या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून एक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे, तर दुसरा जामिनावर मुक्त आहे.

मात्र, तपासाची व्याप्ती आता वाढत असल्याने पुढील काही दिवसांत मोठे धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव

या प्रकरणातील मुख्य आरोपी व बडतर्फ सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रणाली कसर हिच्याविरोधात आर्थिक गुन्हे शाखेने दोषारोपपत्र दाखल केले आहे. दरम्यान, जामिनासाठी प्रणाली कसर हिने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेत अर्ज सादर केला आहे. पोलिसांचा अभिप्राय सादर झाल्यानंतर या जामिन अर्जावर पुढील न्यायालयीन सुनावणी होणार आहे.

# सत्र २०२६-२७ साठी इयत्ता ११ वीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

**वर्धा/जनमाध्यम**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयामार्फत इयत्ता ११ वीच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने पार पडणार असून सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी वेळेत नोंदणी करून सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी (Student Registration) करणे आवश्यक असून त्यानंतर अर्जाचा भाग-१ भरून संबंधित कागदपत्रांची पडताळणी करणे बंधनकारक राहील. त्यानंतर भाग-२ (Option Form) मध्ये पसंतीच्या कनिष्ठ महाविद्यालयांची निवड करून प्रवेशासाठी अर्ज सादर करावा लागेल.प्रवेश प्रक्रिया ही गुणांनुसार व आरक्षणाच्या नियमानुसार पार पाडली जाणार आहे.

प्रवेशासाठी CAP Seats, In-House Quota, Management Quota तसेच Minority Quota यानुसार जागांचे वाटप करण्यात येईल. तसेच एससी, एसटी, व्हीजेएनटी, ओबीसी, एसबीसी, एसईबीसी, ईडब्ल्यूएस इत्यादी प्रवर्गासाठी शासनाने निश्चित केलेल्या टक्केवारीनुसार आरक्षण लागू राहील. समांतर आरक्षणांतर्गत दिव्यांग, क्रीडा, सैनिक/माजी सैनिक कुटुंबीय तसेच इतर विशेष प्रवर्गासाठीही तरतूद करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये इ. १० वीचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला (लागू असल्यास), नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, अपंगत्व प्रमाणपत्र इत्यादींचा समावेश असून सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील. प्रवेश प्रक्रियेदरम्यान महाविद्यालय वाटप ऑनलाईन पद्धतीने जाहीर केले जाईल. ज्यांना प्रवेश मिळेल त्यांनी संबंधित महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा. ज्यांना पहिल्या फेरीत प्रवेश मिळणार नाही, त्यांना पुढील फेऱ्यांमध्ये पुन्हा संधी उपलब्ध राहील.शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करावे तसेच आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सर्व संबंधितांनी अधिकृत पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, वर्धा यांनी केले आहे.

# पवनूरात श्री स्वामी महाराज पुण्यतिथी महोत्सव

**वर्धा/जनमाध्यम**

तालुक्यातील पवनूर येथे श्री स्वामी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त गावात भक्तीचा उत्साह उसळला असून १९ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या महोत्सवाला पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभत आहे.

३१ मार्च रोजी सकाळी श्री स्वामी महाराजांच्या समाधीवर अभिषेक मनोहर जोशी (पवनूरकर) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता हभप कमलनयन फॅटिंग महाराज यांच्या वाणीतील काल्याचे कीर्तन होणार असून त्यांना तबला वादक उद्धव कोंडलकर, संवादिनी वादक



दत्तात्रय येवले आणि गायक अतुल बावणे यांची साथ लाभणार आहे.सायंकाळी श्रींची पालखी मिरवणूक काढण्यात येणार असून विविध भजन मंडळांचा यात सहभाग राहणार आहे. महाप्रसादाने महोत्सवाची सांगता होणार असून, या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान समिती व ग्रामस्थांनी केले आहे.या महोत्सवामुळे पवनूर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून गावात चैतन्याचे वातावरण पसरले आहे.

# चला जाऊ वनाला उपक्रमातून विद्यार्थ्यांची निसर्गसफर

**गिरड/जनमाध्यम**

धोंडगाव येथील सरस्वती विद्यालयाच्या इको क्लबतर्फे जागतिक जलदिनानिमित्त चला जाऊ वनाला या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करून त्यांना निसर्ग, जलस्त्रोत आणि जैवविविधतेचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.



या सहलीत विद्यार्थ्यांनी बोर धरण, बोर अभयारण्य तसेच महाराज बाग परिसराला भेट दिली. बोर अभयारण्यात वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाची माहिती देण्यात आली, तर बोर धरण परिसरात जलसंधारणाचे महत्त्व आणि पाण्याचा योग्य वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. महाराज बागेत विविध प्रजातींच्या प्राण्यांचे निरीक्षण करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या सवयी, आहार व संरक्षणाविषयी माहिती जाणून घेतली. या उपक्रमात विद्यालयातील सुमारे ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध वृक्ष, वनस्पती, पक्षी आणि वन्यजीवांचे निरीक्षण करत अभ्यासपूर्ण अनुभव घेतला.या सहलीसाठी मुख्याध्यापक अतुल देवढे यांचे मार्गदर्शन लाभले.

इको क्लब समन्वयक संदेश निखाडे, शिक्षक सुधाकर शहाणे, मोनिका वानखेडे, प्रमोद झांबरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पालक प्रतिनिधी म्हणून सतीश कुंभारे उपस्थित होते.वन विभागाचे सहकार्यही या उपक्रमाला लाभले. वनक्षेत्रपाल सुरेश येडकेवार, वनपाल विजय कापकर, वनरक्षक प्रियंका आवारी, प्रियंका सावरकर तसेच विजय चतुर यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.सहलीदरम्यान विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार व पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आल्याने संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि जलस्त्रोतांचे महत्त्व याबाबत जागरूकता निर्माण झाली असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १२१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# वसुधाताईंचे कार्य आजच्या तरुण पिढीसाठी दीपस्तंभासारखे प्रेरणादायी

## -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे -माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांना 'जीवनगौरव' पुरस्कार प्रदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक कारकिर्दीत केवळ सत्ताकारण न करता समाजकारणाचा वारसा खऱ्या अर्थाने जपला आहे. त्यांनी महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या कार्य कर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे कार्य आणि अनुभव आजच्या तरुण पिढीसाठी एका दीपस्तंभासारखा प्रेरणादायी आहे, असे गौरवपूर्ण उद्गार पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल वसुधाताई देशमुख यांना श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित सोहळ्यात 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले, त्यावेळी पालकमंत्री बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखेडे, आमदार जयंत पाटील, सुलभा खोडके, संजय खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी मंत्री अनिल देशमुख, विलास इंगोले यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, ग्रामीण भागाचा विकास आणि महिला सक्षमीकरण हे वसुधाताईंच्या कार्याचे मुख्य केंद्रबिंदू राहिले असून हा पुरस्कार त्यांच्या तपोनिष्ठ सेवेची समाजाने घेतलेली दखल आहे. ताईंच्या प्रेरणेमुळे आज विदर्भातील महिला आत्मनिर्भर होऊन काम करीत आहेत. वसुधाताईंचे कर्तव्यदक्ष, दिशा देणारे विचार, उत्तम वैचारिक भूमिका इतरांसाठी आदर्श व प्रेरणादायी आहे.

त्यांची विदर्भाच्या प्रश्नाबाबतची जाण सखोल आहे. ते समजून घेण्यासाठी लवकरच मी त्यांची भेट घेऊन त्यांचे विचार जाणून घेणार आहे व पालकमंत्री म्हणून त्या विषयावर कार्य करणार आहे.

विदर्भाचे विकासासाठी वसुधाताई आयुष्यभर कार्य केले. वसुधाताईंनी विदर्भाच्या विकासासाठी रचलेल्या पायाचा कळस पूर्ण करण्याचे कार्य मी पूर्ण करेल. त्यांचे अमरावतीच्या विकासासाठी अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प करतो. विदर्भाच्या विकासासाठी त्यांची तळमळ वाया जाणार नाही. तो विकास पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे पालकमंत्री बावनकुळे यावेळी म्हणाले .

पुरस्काराला उत्तर देताना वसुधाताई देशमुख म्हणाल्या, हा 'जीवनगौरव' पुरस्कार म्हणजे केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून, गेल्या अनेक दशकांपासून माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेल्या सामान्य जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा सन्मान आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सार्वजनिक जीवनात काम करताना समाजाचे ऋण फेडणे हेच आपले मुख्य ध्येय असल्याचे सांगून त्या म्हणाल्या की, राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार आले, परंतु सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवताना मिळणारे समाधान सर्वात मोठे होते.

हा प्रवास कठीण होता, पण लोकांच्या प्रेमामुळे तो सुखकर झाला. माझ्या कामावर विश्वास ठेवून मला सदैव सहकार्य करणारे, माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या माझ्या जनतेचा हा पुरस्कार आहे . शेवटच्या श्वासापर्यंत जनसेवेचे हे व्रत आपण अखंडपणे सुरू ठेवणार असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.या सोहळ्यात अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यातील दहयांद्री गावातील 'रुक्मिणी' या मुलींच्या नवीन वसतीगृह इमारतीचे मान्यवरांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. तसेच प्रा. नवनीत देशमुख लिखित वसुधाताईंच्या जीवनप्रवासावर आधारित 'वसुधा' या कादंबरीचेही प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाचे संचालन शिप्रा मानकर यांनी केले तर प्रा. विनय वसुले यांनी आभार मानले.

# कसबेगव्हान शेतशिवारातील जुगारावर धाड

## -लाखाच्यावर मुद्देमाल जप्त

### खल्लार पोलिसांची कारवाई

**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील कसबेगव्हान शेत शिवारात चालू असलेल्या जुगारावर खल्लार पोलिसांनी दि. २७ मार्चला सायंकाळच्या सुमारास धाड टाकली. जुगार खेळत असलेल्या आरोपीकडून रोख रकमेसह १ लाख ८२ हजार ३५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कसबेगव्हान शेत शिवारात बाबाराव उमाळे यांच्या शेतालगतच्या धुऱ्यावर जुगार चालू असल्याची माहिती खल्लार पोलिसांना मिळाली. त्यानुसार ठाणेदार रविंद्र बारड यांच्या मार्गदर्शनात खल्लार पोलिसांनी काल (दि.२७) सायंकाळी ६ ते ७ वाजताच्या सुमारास धाड टाकली. यात जुगार खेळत असलेले पंकज अशोक तायडे (वय ३८)रा. सहारा नगर अंजनगाव सुर्जी,देविदास काशिराव पातोंड (वय ५६)रा. वनोजा बाग, उमेश महादेव थोरात (वय ३८)रा. कसबेगव्हान,अर्जुन उर्फ गोकुळ रामेश्वर गांजरे (वय३३)रा. कसबेगव्हान, सुरेश गोविंद पातोंड (वय३९) रा. वनोजा बाग, यांना ताब्यात घेतले तर अतुल देशमुख रा. असदपूर, श्रीकांत नवले रा. कसबेगव्हान, रवि गिरी रा. काकडा, राजिक डिक्की रा. अंजनगाव, अब्दुल राजिक सौदागर रा.शिंदी बु हे आरोपी फरार झाले.

पोलिसांनी अटक आरोपीकडून रोख रकमेसह १ लाख ८२ हजार ३५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन ताब्यात घेतला व सर्व आरोपीविरुध्द १२(अ)नुसार गुन्हा दाखल केला.

# अमरावतीत ऑक्टोबरमध्ये भव्य पुस्तक महोत्सव घेणार

## -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे -जिल्हा ग्रंथालय इमारतीचे लोकार्पण

**-गाव तिथे ग्रंथालय उभारणार**
**-स्पर्धा परीक्षेसाठी ई लायब्ररी उपक्रम**



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात विविध ठिकाणी झालेल्या पुस्तक महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अशाप्रकारचा भव्य पुस्तक महोत्सव अमरावतीत येत्या ऑक्टोबरमध्ये घेण्यात येईल. या ठिकाणी पश्चिम विदर्भातील सर्व नागरिक येतील, अशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच येथे आलेल्या नागरिकांनी एक तरी पुस्तक विकत घ्यावे, यासाठी दर्जेदार पुस्तकांचे प्रदर्शन घेण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीचे लोकार्पण आज शनिवारी (दि.२८) करण्यात आले. यावेळी खासदार अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुरज मडावी, सहायक संचालक राजेश पाटील उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, मनुष्याच्या जीवनात पुस्तकांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पुस्तकांमुळे समाज प्रगल्भ होऊन अनेक क्रांती घडल्या आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये वाचन चळवळ निर्माण करण्यासाठी गाव तिथे ग्रंथालय हा उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. यासाठी गावात असलेल्या विनावापर इमारतींची दुरुस्ती करून येथे वाचनालय सुरू करण्यात येतील. यामुळे प्रत्येक गावात वाचनाची चळवळ उभी राहण्यास मदत होईल.

नव्याने निर्माण झालेली जिल्हा ग्रंथालयाची इमारतीमध्ये वाचन चळवळ निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवतील. त्यासोबतच ग्रंथालयाचे आधुनिकीकरण करून या ठिकाणी डिजिटल लायब्ररी निर्माण करण्यात येतील. प्रामुख्याने या ठिकाणी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या डिजिटल लायब्ररीचा उपयोग होईल. यासोबतच स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिर घेण्यात येतील. यासोबतच मॉड्यूलर अभ्यासिका उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

सुरुवातीला बावनकुळे यांनी जिल्हा ग्रंथोत्सवाचे उद्घाटन केले. तसेच नूतन इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण केले. मडावी यांनी प्रास्ताविक केले. पाटील यांनी आभार मानले.

**पाहिजे**

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क -**
**९६०७५८२०९४**

**पाहिजे**

गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत. तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५

**जाहीर नोटीस**

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार **नामे विलास सीताराम रेखाते** यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णनः मौजे ब्राह्मणवाडा थडी, नझुल शीट क्रं. ४, प्लॉट क्रं. ७९७, ता. चांदूर बाजार आणि जिल्हा. अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **विलास सीताराम रेखाते** यांच्या मालकीची आहे. तदनंतर विलास सीताराम रेखाते यांनी **VASTU HOUSING FINANCE CORPORATION LTD. BR. AMRAVATI.** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि. २४/०२/१९९३ रोजीचे दस्त क्र. २२५ सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/ राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल नं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ३ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि सदर मालमता **VASTU HOUSING FINANCE CORPORATION LTD. BR. AMRAVATI** येथे गहन करण्यात येईल. करिता हि जाहीर सूचना देत आहे.

आपला
**ॲड.रवींद्र रू. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५

शिक्का

# पाणीपुरवठा व घरकुल मुद्द्यावरून अचलपूर पंचायत समितीची आमसभा गाजली

**आ.केवलराम काळे , दर्यापूर चे आ.गजानन लवटे प्रामुख्याने उपस्थित**

## -ग्रामस्थांनी मांडलेल्या समस्या मार्गी लावा -आमदार प्रवीण तायडे यांचे दिले निर्देश



**अचलपुर/प्रतिनिधीः-** अचलपूर पंचायत समिती परिसरात तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अंतर्गत विविध विभागांच्या कामाचा आढावा म्हणून वार्षिक आमसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष म्हणून मेळघाट मतदार संघाचे आ. केवलराम काळे,प्रमुख उपस्थितीती म्हणून अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,दर्यापूर मतदार संघाचे आमदार गजानन लवटे,पंचायत समिती गट विकास अधिकारी सुधीर अरबट, माजी सरपंच राजेंद्र गोरले,भाजपा पक्षाचे नेते सुधीर रसे, अतुल वाठ,विशाल काकड,समीर हावरे ,तालुकाध्यक्ष शंकर मालखेडे तसेच पंचायत समिती येथील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वार्षीक आमसभेचे प्रास्ताविक अचलपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधीर अरबट यांनी केले. या सभेत उपस्थित विविध ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच तसेच सदस्य व ग्रामस्थांनी राज्य शासनाच्या विविध योजना तसेच शिक्षण तसेच मूलभूत सुविधांचा अभाव आदी विषयावर संदर्भात समस्या मांडल्या. त्या विविध समस्या तत्काळ मार्गी लावण्याचे आदेश अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर पंचायत समिती विभागाला दिली. ही आमसभा प्रामुख्याने अचलपूर ,मेळघाट आणि दर्यापूर मतदार संघातील शिक्षण ,पाणीपुरवठा, पांदण, रस्ते, घरकुल योजना राज्य व केंद्र शासनाचे विवीध योजना पासून वंचित लाभार्थी असे विविध विषयावर चांगलीच गाजली. विशेष म्हणजे दर्यापूर मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे,अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे आणि मेळघाट मतदार संघाचे आमदार केवलराम काळे असे तिन्ही मतदार संघातील विधानसभा सदस्यांची प्रामुख्याने उपस्थितीती असल्याने ग्रामस्थानी अनेक समस्या मांडल्या.

या आमसभेमध्ये ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध समस्या बाबत महिन्यातून एक दिवस तरी जनप्रतिनिधी, लोकप्रतिनिधी व संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या उपस्थितीत जनता दरबार आयोजन करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. जेणेकरून नागरिकांना समस्या सोडविण्याकरिता माराव्या लागणाऱ्या चकरा आणि पाठपुरावा यातून मुक्तता मिळले, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

मान्यवरांनी पाणी टंचाई चा आढावा घेतला.

अचलपूर पंचायत समिती परिसरात आज आयोजित वार्षिक आमसभेमध्ये शिवसेना उ.बा.ठा. गटाचे नरेंद्र पडोळे यांनी सामाजिक वनीकरण विभाग मार्फत केलेल्या कामाची चौकशी व पिण्याचा पाण्याचा टंचाई चा मुद्दा मांडला . तसेच जल जीवन मिशन अंतर्गत प्रलंबित कामामुळे नागरिकांना विविध समस्यांच्या सामना करावा लागत असून पाणीपुरवठा विभागाने लवकरात लवकर ही कामे मार्गी लावण्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर वाघडोह गावात मूलभूत सुविधांचा अभाव बाबतचा मुद्दा ही गाजला .अनेक गावातील ग्राम पंचायत सदस्यांनी शासनाची रोजगार हमी योजना बाबत वंचित असलेल्या मजुरांची व्यथा मांडली . त्यानंतर शिवसेनेचे नरेंद्र पडोळे यांनी जलसंधारण अंतर्गत घरघर नळ योजना असो की अचलपूर पंचायत समिती बांधकाम विभागाचे अंतर्गत झालेली विविध विकास कामांची चौकशी असो असे विविध मुद्दे त्यांनी मांडले आणि २०२४ वर्षात संपन्न झालेल्या आमसभेत कारवाई न करता प्रलंबित असलेल्या मुद्द्यावर चौकशी समिती नेमण्याचे आदेश सुद्धा आ . प्रवीण तायडे यांनी दिले. शहापूर नवीन पुनर्वसन गावातील विविध समस्यांबाबत ग्रामस्थ आक्रमक झाले होते. विशेष म्हणजे ग्रामपंचायत कोठारा येथे सरपंचांनी पाणी टंचाई ,स्मशान भूमी आणि शाळा बंद चा मुद्दा सुद्धा समोर आणल्याने सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. स्मार्ट मीटर वीणा परवानगी महावितरण विभाग ग्राहकांच्या घरी लावत असल्याचे अनेक तक्रारी सुद्धा ग्रामस्थांनी मांडल्या. या सभेमध्ये ग्रामस्थांनी समस्यांचा पाढाच वाचल्याने अचलपूर पंचायत समिती अंतर्गत समस्यांचे माहेरघर ग्रामपंचायत क्षेत्र बनले आहे का ? हा प्रश्न निर्माण झालेला आहे .विशेष म्हणजे कांडली येथील ग्रामपंचायत मधील अनेक ग्रामस्थांनी मूलभूत सुविधांचा अभावाबाबत प्रश्न मांडला. ग्रामस्थांनी मांडलेल्या समस्यांबाबत अनेक कर्मचाऱ्यांकडे उत्तरच नसल्याचे सुद्धा चित्र दिसून आले.मल्हारा ग्रामपंचायतचे माजी सरपंच नारायण बोरकर ,नायगाव बोर्डी चे सरपंच मंगला संतोष चव्हाण , बाजार समितीचे संचालक अमोल बोरकर,रुपेश ढेपे,सतीश शर्मा आणि विविध ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते .

# आमदार राजेश वानखडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## -मित्र परिवाराच्या वतीने जिल्हास्तरीय पोलीस पाटील परिषद व अभिष्टचिंतन सोहळा



**अमरावती/प्रतिनिधीः-** तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय पोलीस पाटील परिषद व अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत उत्साहात व भव्य स्वरूपात पार पडला. या कार्यक्रमाला राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

या परिषदेला जिल्हाभरातील पोलीस पाटील, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पोलीस पाटील यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच ग्रामीण सुरक्षा, कायदा-सुव्यवस्था, तंटामुक्त गावे आणि विकासात्मक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामप्रशासनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या घटकांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी सरपंच-उपसरपंच परिषद आयोजित करण्यात आली होती. त्याच मालिकेत यंदा पोलीस पाटील परिषदेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मंचावर खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, महाराष्ट्र पोलीस पाटील महासंघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील, दिनेश सूर्यवंशी, शिवराय कुलकर्णी, आमदार प्रवीण तायडे, माजी आमदार साहेबराव तट्टे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मानव सेवा संघ व आधार फाउंडेशन यांच्या वतीने तिवसा मतदारसंघासाठी तीन सुसज्ज ॲम्ब्युलन्सचे लोकार्पणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मान्यवरांनी राजेश वानखडे यांचे अभिनंदन करताना अल्पावधीतच त्यांनी विधिमंडळ व मंत्रालयीन कामकाज आत्मसात करून मतदारसंघासाठी भरघोस निधी आणल्याबद्दल कौतुक केले. नव्याने निवडून आलेल्या प्रभावी आमदारांमध्ये त्यांचा समावेश होत असल्याचेही गौरवोद्गार काढण्यात आले.

आमदार राजेश वानखडे यांनी आपल्या भाषणात पोलीस पाटील यांच्या भूमिकेवर प्रकाश टाकत सांगितले की, 'पोलीस पाटील हे ग्रामीण भागातील कायदा-सुव्यवस्थेचे पहिले रक्षक आहेत. त्यांच्या समस्या सोडवून त्यांना अधिक सक्षम बनवणे आणि ग्रामस्थांशी समन्वय वाढवणे हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे.'

परिषदेत पोलीस पाटील यांच्या अडचणी, सुविधा, प्रशिक्षण आणि भविष्यातील योजनांवर चर्चा झाली. अनेकांनी आपले अनुभव मांडत शासनाकडे अपेक्षा व्यक्त केल्या. तसेच मतदारसंघातील सर्व पोलीस पाटील यांचा शाल व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यामुळे जिल्ह्यातील पोलीस पाटील बांधवांमध्ये नवी ऊर्जा व प्रेरणा निर्माण झाली असून भविष्यात अशा उपक्रमांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

याप्रसंगी वाढदिवसानिमित्त मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावतीत इंधन तुटवड्याची अफवा

## -जिल्हा प्रशासनाचे नागरिकांना शांततेचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** गेल्या काही दिवसांपासून अमरावती शहरासह जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याच्या अफवा सोशल मीडियावर पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले असून नागरिकांनी घाबरून न जाता संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे.

शहरातील अग्रसेन पेट्रोल पंप, (आयटीआय कॉलेज समोरील पंप ) तसेच राजेश आणि विदर्भ गॅस एजन्सी या ठिकाणी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी सर्व ठिकाणी साठा पुरेसा असल्याचे निदर्शनास आले. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी गॅस एजन्सीवर पिण्याचे पाणी, ग्राहकांना बसण्यासाठी आसनव्यवस्था, सावलीसाठी शेड उभारण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक तासाला पेट्रोल पंपावरील उपलब्ध साठ्याची माहिती दर्शनी भागात लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, इंधन पुरवठा साखळी सुरळीत असून तेल कंपन्यांचे प्रतिनिधी सातत्याने यावर लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे 'पॅनिक बाइंग' (गरजेपेक्षा जास्त खरेदी) टाळावी, कारण यामुळेच विनाकारण गर्दी होऊन वाहतुकीची कोंडी व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

# सातेगाव ग्रामपंचायतींच्या वतीने पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार



**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सातेगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रातील विद्यार्थ्याने महाराष्ट्र पोलीस दलात अकोला ग्रामीण येथे निवड मिळविल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने भव्य व जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २८ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमास गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

१४ एप्रिल २०२५ रोजी स्थापन झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राने अवघ्या एका वर्षात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभ्यासिकेतील विद्यार्थी सय्यद फहीम सय्यद हुसेन यांची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याने सातेगाव ग्रामपंचायत तसेच संपूर्ण गावासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे. त्यांच्या या यशाबद्दल शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अभ्यासिका यशस्वीपणे चालवण्यासाठी सरपंच छाया राजेंद्र वानखडे व भानुदास वानखडे यांचे विशेष सहकार्य लाभत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या सत्कार समारंभास सातेगावच्या सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी उपसरपंच पुरुषोत्तम काळे, ग्रामपंचायत सदस्य संजय हाडोळे, कपील देशमुख, अतुल काळे, संजय गावंडे, बाळा गावंडे, अर्चना संजय गावंडे,राजेंद्र वानखडे, श्याम इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामविकास अधिकारी जगदीश गावंडे, आणि अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या केंद्रातून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून शासकीय सेवेत स्थान मिळवतील, असा विश्वास राजेंद्र वानखेडे यांनी व्यक्त केला. सय्यद फहीम यांच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून, त्यांच्या मेहनतीचे सर्वत्र कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भानुदास वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुमारी तेजस्विनी सुभाष निर्मळ यांनी मानले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २००
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेतकऱ्यांच्या कायम पाठीशी राहू

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे कर्जमाफीबद्दल सत्कार



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या विकासासाठी कायम सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय निकाली निघाला आहे. केवळ कर्जमाफी करून चालणार नसून शेतकऱ्यांना त्याच्या शेतीवर निर्भर करून उभे करावे लागणार आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या कायम पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.


जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबद्दल पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सत्काराचे आयोजन केले होते. यावेळी खासदार अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, राजेश वानखेडे, महापौर श्रीचंद तेजवानी, बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासह बँकेचे संचालक उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, सहकार क्षेत्रामध्ये कार्य करीत असताना सर्व भेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या विकासासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. बँकेने शेतकऱ्यांसाठी विविध ३१ योजना दिल्या आहेत. या योजना परिणामकारकरित्या राबविण्यात येत आहे. सहकार क्षेत्रात अत्यंत चांगल्या पद्धतीचे काम बँक करीत आहे. शेतकरी जगला तरच देश जगू शकणार असल्याने शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे.

अमरावती जिल्हा बँकेने १४०० कोटी रुपयांचा व्यवहार केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पैशाचा गैरवापर होणार नाही, यासाठी संचालकांनी कार्य करावे, सहकारी बँका बुडाल्यास सर्वाधिक वेदना शेतकऱ्यांना होतात, याची जाण ठेवावी. त्यामुळे या बँकांचा विकासासाठी पूर्ण सहकार्य आणि मदत करण्यात येईल. शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी विविध निर्णय घेण्यात येत आहे. प्रामुख्याने शेतामध्ये☞ (पान २ वर)

# कॅफेवर धाड, ६ युवक-युवती ताब्यात

**ब्रेव अँड बडी कॅफेत आक्षेपार्ह वर्तन**




**अमरावती/प्रतिनिधीः-** नियमबाह्य वर्तन होत असल्याच्या माहितीवरून राजापेठ परिसरातील 'ब्रेव अँड बडी कॅफे'वर छापेमारी कारवाई करण्यात आली. भरोसा सेल आणि दामिनी पथकाच्या संयुक्त कारवाईत ६ युवक-युवतींना ताब्यात घेण्यात आले असून कॅफे चालकांसह एकूण ८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. गोपाल नगर चौक परिसरातील या कॅफेमध्ये युवक-युवतींकडून नियमबाह्य वर्तन होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ पथक सक्रिय झाले आणि छापा टाकण्यात ☞ (पान २ वर)

### ■ कॅफेवर नजर; पोलिसांचा इशारा

शहरात काही कॅफेच्या ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यानुसार पोलिसांकडून अशा ठिकाणांवर सतत लक्ष ठेवले जात असून अचानक छापेमारी मोहीम राबवली जात आहे. या कारवाईनंतर पोलिसांनी स्पष्ट संकेत दिले आहेत की, कॅफे किंवा सार्वजनिक ठिकाणी नियमभंग आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल.या घटनेनंतर शहरात युवक-युवतींच्या वर्तनावर आणि कॅफे संस्कृतीच्या वापरावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

# अतिक्रमणाची तक्रार केल्याने एकाला मारहाण

**राजापेठ परिसरातील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पोस्टमन कॉलनी परिसरात महापालिकेकडे अतिक्रमणाची तक्रार केल्याच्या कारणावरून एका व्यक्तीस मारहाण करण्यात आल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे. राजेश वासुदेव दारोकार (वय ४०) असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी जीतू पिवाल (रा. चिमोटे लेआउट) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारीनुसार, राजेश दारोकार हे पोस्टमन कॉलनी परिसरात चक्की चालवतात. या कॉलनीत एकूण ५८ प्लॉट असून, त्यातील प्लॉट क्रमांक १ रिकामा आहे. मात्र या प्लॉटवर एका व्यक्तीने अतिक्रमण केल्याचा आरोप आहे. याबाबत राजेश दारोकार यांनी महानगरपालिकेकडे तक्रार दाखल केली होती. दरम्यान २७ मार्च रोजी सायंकाळी ☞ (पान २ वर)

# मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव

## ई-गव्हर्नन्समध्ये अमरावतीची राज्यात उल्लेखनीय कामगिरी



**मुंबई/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री १५० दिवस ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री सभागृह, मुंबई येथे आयोजित समारंभात गौरव करण्यात आला.

या राज्यस्तरीय मूल्यमापनात अमरावती महानगरपालिकेने २९ महानगरपालिकांमधून २०० पैकी १७९.५० गुण मिळवत पाचवा क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, विदर्भ व मराठवाडा विभागातून या मानाच्या यादीत स्थान मिळवणारी अमरावती महानगरपालिका ही एकमेव संस्था ठरली आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या ☞ (पान २ वर)

# सराईत गुन्हेगार गजाआड, चार दुचाकी जप्त

**फ्रेजरपुरा डीबी पथकाची कामगिरी**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वाहनचोरीच्या घटनांचा छडा लावत फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच (डीबी) पथकाने मोठी कारवाई करत सराईत गुन्हेगार सचिन शामराव वानखडे (वय ४२, रा. फ्रेजरपुरा) याला अटक केली आहे. या कारवाईत चार चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या असून वाहनचोरीच्या चार गुन्ह्यांचा उलगडा☞ (पान २ वर)

# बेनेगलांच्या 'सिने-स्वरांची' उलगडणार गुपिते!

**-अभ्यासक अजेय गंपावार यांच्याशी रंगणार संवाद**

**'मानस प्रबोधिनी' चा उपक्रम**




**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय समांतर चित्रपटांची स्वतंत्र वाट चोखाळणारे दिग्गज दिग्दर्शक श्याम बेनेगल आणि त्यांच्या चित्रपटांतील 'सांस्कृतिक' संगीताचा समृद्ध प्रवास आता अमरावतीकर रसिकांना अनुभवता येणार आहे. अमरावती येथील १९९३ मध्ये स्थापन झालेल्या आणि २०१८ मध्ये पुनरुज्जीवित झालेल्या 'मानस प्रबोधिनी' या मानसिक आरोग्य व मानसशास्त्र क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेच्या वतीने २९ मार्च रोजी, रविवारी सायंकाळी ६ वाजता कॅम्प परिसरातील विद्याभारती शैक्षणिक संकुलातील 'एमबीए सभागृहात' एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील संगीत' या विषयावर चित्रपट अभ्यासक आणि क्रिएटिव्ह डायरेक्टर अजेय गंपावार हे उपस्थित रसिक प्रेक्षकांशी संवाद साधणार आहेत.

अजेय गंपावार यांनी प्रख्यात अभिनेते नसीरुद्दीन शहा, अमृता सुभाष आणि डॉ. जब्बार पटेल यांसारख्या दिग्गजांच्या मुलाखती घेण्यासोबतच अनेक फिल्म फेस्टिव्हल्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.☞ (पान २ वर)

# बिजीलॅंड संकुलात कर्मचा-याची आत्महत्या

**शेअर मार्केटमध्ये नुकसान झाल्याची चर्चा**



**अमरावती/प्रतिनिधीः-** शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पाच राष्ट्रीय बँकेमधून लाखों रुपयाचे लोन घेणाऱ्या एका कर्मचा-याने नांदगाव पेठ येथील बिजीलॅंड व्यापारी संकुलामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. रोहित छगनलाल रंक (वय ३०,जामनगर गुजरात ) असे आत्महत्या करणाऱ्या कर्मचा-याचे नाव आहे.

माहिती नुसार बिजीलॅंड व्यापारी संकुलामध्ये मोटर पंप विक्रीचे गोदाम आहे. या गोदामामध्ये रोहित रंक आणि गुजरात वरून आलेले त्याचे अनेक साथीदार काम करतात. ते एकाच जागेत राहतात. गेल्या चार दिवसापासून काम जास्त असल्याने☞ (पान २ वर)

# चाकू घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाला अटक

**नागपुरी गेट परिसरातील घटना**




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नागपुरी गेट चौक परिसरात सार्वजनिक ठिकाणी चाकू घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या तरुणाला गुन्हे शाखेच्या पथकाने वेळेत कारवाई करत ताब्यात घेतले. या कारवाईमुळे संभाव्य गंभीर प्रकार टळला. शेख जमीर शेख जमील (वय २२, रा. पठाणपुरा, अमरावती) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून धारदार चाकू जप्त केला आहे. २८ मार्च २०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक नागपुरी गेट पोलीस☞ (पान २ वर)

# बनडेरात कुल्फी विक्रेत्यावर चाकूने हल्ला

**आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल**



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या जय हिंद शॉपमध्ये सबुरी भोजनालासमोर एका कुल्फी विक्रेत्यावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात जखमी मुकुंदलाल रामनिहारे प्रजापती (वय ५१, देशपांडे प्लॉट) यांचा मुलगा आशिष प्रजापती यांच्या तक्रारीवरून आरोपी अंक्या उर्फ अनिकेत गणवीर (वय ३०,बनडेरा ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले आहे. माहिती नुसार मुकुंदलाल प्रजापती जय हिंद चौकात कुल्फी विकत होते.यावेळी आरोपी अनिकेत गणवीर त्यांच्या ☞ (पान २ वर)

# विपश्यना केंद्र, सांस्कृतिक भवनाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



**अमरावती/प्रतिनिधीः-** मार्डी रोडवरील विपश्यना केंद्र आणि सांस्कृतिक भवनाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी सांस्कृतिक भवनाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी केले. लोकार्पण कार्यक्रमाला खासदार अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखेडे, नगरसेविका सुरेखा लुंगारे आदी उपस्थित होते. सुरुवातीला बावनकुळे यांनी बुद्ध वंदेनेत सहभाग घेतला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन आणि विपश्यना केंद्राची पाहणी केली.

# चांगापूर रेल्वे अंडरपास समस्येवर खासदार वानखडे यांच्या नेतृत्वात उच्चस्तरीय बैठक

## भुसावळ विभागाचे डीआरएम पोहोचले अमरावतीत, सुधारणांचे संकेत



**अमरावती/प्रतिनिधीः-** चांगापूर रेल्वे अंडरपासच्या प्रश्नावरून गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या जनआक्रोशाची दखल रेल्वे प्रशासनाला घ्यावी लागली आहे. स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध आणि नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर रेल्वे प्रशासन सक्रिय झाले असून, या समस्येवर सुधारणांचे संकेत दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर आज खासदार बळवंत वानखडे यांच्या नेतृत्वाखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली.

या बैठकीत खासदार बळवंत वानखडे, महापालिकेचे माजी महापौर विलास इंगोले, नगरसेवक बबलू शेखावत आणि अनिल अग्रवाल यांनी भुसावळ विभागाचे डीआरएम पुनीत अग्रवाल यांच्याशी सविस्तर चर्चा केली. लोक ☞ (पान २ वर)

# तृतिय पंथीयांची भव्य मंगल कलश यात्रा



**ढोल-ताशांचा गजर**

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक एकवीरा देवी मंगल कार्यालय येथे गेल्या चार दिवसांपासून 'किन्नर हिंदू आणि संत मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या सांगता दिनी, आज शनिवार २८ मार्च रोजी तृतीयपंथीयांच्या वतीने शहरातून भव्य मंगल कलश यात्रा काढण्यात आली. ढोल-ताशांच्या निनादात आणि भक्तीमय वातावरणात निघालेल्या या यात्रेने अमरावतीकरांचे लक्ष वेधून घेतले.

राजापेठ चौकातून या भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. या यात्रेमध्ये किन्नर आखाड्यांचे महामंडलेश्वर, पीठाधीश्वर आणि विविध संत रथावर विराजमान होते. राजापेठ येथून निघालेली ही यात्रा राजकमल चौक, गांधी चौक मार्गे अंबादेवी आणि एकवीरा देवी☞ (पान २ वर)

# बकऱ्या चोरीतील कुख्यात टोळीचा एलसीबीकडून पर्दाफाश



**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागात बकऱ्या चोरण्यासाठी अनोखी शक्कल लढवणाऱ्या टोळीचा अखेर पर्दाफाश करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला (एलसीबी) यश आले आहे. मका टाकून बकऱ्यांना आमिष दाखवत गाडीत भरून चोरी करणाऱ्या या टोळीत अकोल्यातील तिघा सराईतांना पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत आरोपींकडून चोरीच्या बकऱ्या विकून मिळालेली सुमारे ४० हजारांची रोकड आणि २० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अंजनगाव सुर्जी येथील तनवीर खान जमीर खान यांनी २७ फेब्रुवारी रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, ☞ (पान २ वर)

# मजूरांना घेऊन जाणारा पिकअप पलटी, दोघे गंभीर

**महिलांसह मुलेही किरकोळ जखमी**



**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदुरबाजार मार्गावर मजूरांना घेऊन जाणारा पिकअप पलटी होऊन दोघे गंभीर झाले असून महिलांसह मुलेही किरकोळ जखमी आहेत.

मध्य प्रदेश राज्यातील बैतूल जिल्ह्यात भैसदेही तालुक्यातील धोला रधिवार येथील दहा ते बारा मजूर शुक्रवारीं रात्री चांदूरबाजारमध्ये पिकअप उलटल्याने जखमी झाले. यामध्ये गंभीर जखमी दीपक दिनकर (वय १७), भानु दिनकर (वय ३०, भैसदेही) या दोघांना गंभीर जखमी अवस्थेत अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. ☞ (पान २ वर)

# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

▢ रविवार, २९ मार्च २०२६ ▢ E-paper - www.janmadhyam.com







**“ आज शहरात, खेड्यात किंवा आदिवासी पाड्यावर असे भोंदूबाबा पावलोपावली सापडत आहेत. अशा भोंदूबाबांविषयी किंवा धर्माच्या नावाखाली चाललेल्या भोंगळ कारभाराविषयी कोणीही बोलत नाही. कारण धर्माच्या आडून चाललेला अनैतिक व्यवहार, विषमता, भेदाभेद याविषयी कोणी आवाज उठवत असेल तर त्यालाही देशद्रोही ठरवले जाते. ”**



# ऐसे कैसे झाले भोंदू..

प्रा. डॉ. सतीश मस्के

कॅप्टन अशोक खरात या ६७ वर्षीय भोंदू बाबाला पोलिसांनी बलात्काराच्या प्रकरणात अटक केली, हे प्रकरण सध्या गाजते आहे. धार्मिक आस्था, दैवी शक्ती, मंत्र तंत्र, ज्योतिषी या सगळ्या गोष्टींच्या बळावर अनेक महिलांना तो आपल्याकडे आकर्षित करायचा. त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्यावर बलात्कार करायचा. तो अनेक महिलांना त्याने ब्लॅकमेलिंग केले. त्याची एकंदरीत संपत्ती अंदाजे ५०० कोटीच्या वर असल्याचे सांगितले जाते. हे सगळे देवाधर्माच्या नावावर सुरू होते. त्याचे वेगवेगळ्या प्रकारचे व्हिडिओही आता यायला लागले आहेत. त्याच्याबरोबर अनेक बड्या बड्या नेते मंडळीचेही फोटो दिसत आहेत.विविध टीव्ही चॅनेल्सवरून ते दाखवले जात आहेत. आजचे आपले राजकारणी कशा प्रकारे अशा भोंदूगिरींला खतपाणी घालत आहेत, हेही त्यावरून दिसते. खरेच राजकीय कार्यकर्त्यांना किंवा पोलिसांना हे काय चालले आहे माहित नसेल ? अहो, जाळ असला की धूर निघतोच ना मग इथे का कुठूनच धूर निघाला नाही? खरे तर हे सत्तेच्या दबावाखाली अशी अनेक प्रकरणे दाबली जातात म्हणूनच अशांची हिंमत वाढते. हे जे काही सगळं चालत आहे ते केवळ आणि केवळ देवाधर्माच्या नावाने. कारण त्यावरील विश्वासाने सामान्य माणसे चालतात आणि हे भोंदू त्यांचा गैरफायदा घेतात.

आज शहरात, खेड्यात किंवा आदिवासी पाड्यावर असे भोंदूबाबा पावलोपावली सापडत आहेत.

अशा भोंदूबाबांविषयी किंवा धर्माच्या नावाखाली चाललेल्या भोंगळ कारभाराविषयी कोणीही बोलत नाही. कारण धर्माच्या आडून चाललेला अनैतिक व्यवहार, विषमता, भेदाभेद याविषयी कोणी आवाज उठवत असेल तर त्यालाही देशद्रोही ठरवले जाते.

आपल्या सरकारला सर्वसामान्य माणसांचे, सुशिक्षित बेरोजगारांचे, तरुणांचे, शेतकऱ्यांचे, स्त्रियांचे प्रश्न दिसत नाहीत ?. त्यांचे जीवनमान उंचावणे, त्यांच्या जीवनामध्ये वैज्ञानिकता निर्माण करावी असे अजिबात वाटत नाही? या सगळ्यांना अज्ञानात कसे ठेवता येईल याचा खटाटोप मात्र वेगवेगळ्या माध्यमातून केला जातो. आज देशात वेगवेगळ्या ठिकाणची मोठमोठी मंदिरे सुशोभित केली जात आहेत, कुंभमेळे घेतले जात आहेत, साधूसंतांना बोलावून वृत्तपत्रातून, टीव्हीवरून जाहिराती देऊन त्यांचे मोठेपण सांगितले जात आहे. वेगवेगळ्या प्रकारची संमेलने घेऊन, कुठे वेगवेगळ्या प्रकारच्या बाबा, बुवा, महाराज यांना बोलवून लाखोंच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रम घडवून आणले जात आहेत. अशा माणसांना धर्माच्या गर्दीत अडकवण्यासाठी छोट्या-मोठ्या बाबा बुवांची संख्या वाढताना दिसत आहे. ते भविष्य सांगण्याच्या माध्यमातून लोकांना आकर्षित करत आहे. त्यातूनच खऱ्या अर्थाने विषमतेला, जातीयतेला, धर्मांधतेला, भ्रष्टाचाराला जोरदार खतपाणी मिळत आहे.

आजचा सामान्य माणूस याच्या पलीकडे जाऊन विचार करण्यास असमर्थ ठरत आहे. भारतीय संविधानामध्ये कुणाला कोणताही धर्म स्वीकारता येईल हे सांगितले आहे. तरीही सरकारने धर्मांतर बंदीचा कायदा करून भारतीय संविधानाला धक्का दिला. म्हणे लव्ह जिहादच्या नावाखाली बळजबरीने धर्मांतर केले जात आहे. काही ठिकाणी तर वेगवेगळ्या धर्मातील मुला-मुलींना लग्न करण्यासाठी आई-वडिलांची परवानगी घ्यावी लागणार आहे. अनेक ठिकाणी तळागाळातील सर्वसामान्य माणसे हिंदू धर्म सोडून ख्रिश्चन धर्मात व बौद्ध धम्मात प्रवेश करताना दिसत आहेत.

म्हणून असा कायदा केल्याचे म्हटले जात आहे. सरकारच्या अशा धोरणामुळे संविधानाचे तत्व बाजूला सारले गेले आहे.

एक माणूस दुसऱ्याकडे धर्माच्या, जातीयतेच्या आणि तुच्छतेच्याच नजरेने पाहताना दिसत आहे. धर्म वाढविण्याच्या दृष्टिकोनातून असे अनेक भोंदूगिरीचे, बाबा, बुवांचे प्रकार वाढताना दिसत आहेत. सर्वसामान्य माणसाला व भोळ्या भाबड्या माणसांना लुटताना आणि लुबाडताना दिसत आहे. कुंभमेळा आणि त्यातील साधू, संत, बाबा, बुवांसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. त्यांच्यासाठी झाडे तोडली जातात. रस्ते बांधले जात आहेत. परंतु सर्वसामान्यांच्या मुलांसाठीच्या गावातल्या शाळा मात्र बंद केल्या जात आहे. आता तर अनेक महाविद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. अनेक शाळा, महाविद्यालयात शिक्षक, प्राध्यापक भरती केलेली नाही. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून सगळी शिक्षण व्यवस्था खिळखिळी करून टाकली आहे. याच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा म्हणजे अनुसूचित जाती – जमातीचा पैसा मतांसाठी लाडक्या बहिणीकडे वळवला जातो. पण शाळा महाविद्यालये सुधारली जात नाहीत. अनेक संशोधन केंद्रे बंद पाडली गेली आहेत. शाळा महाविद्यालयासाठी अनुदान देणे बंद केले गेले आहे. अनेक आरक्षणेही उडवून टाकली गेली आहेत. आरक्षणाच्या नावाखाली जाती-जातीत भांडणे लावली जात आहे. शाळा शिकली तर मुलं ज्ञानी होतील. ज्ञानी झाली तर चांगले काय आणि वाईट काय हे त्यांना कळेल. शिक्षणामुळे त्यांच्या जीवनमानात बदल होईल. घर सुधारेल. पुढच्या पिढ्या समृद्ध होतील. अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, धर्म, जातीयता यापासून दूर राहतील. हे असे होऊ द्यायचे नाही म्हणून सरकार धर्माचे अवडंबर, जातीयता, भ्रष्टाचार, विषमता, भोंदूगिरी जाणून बुजून पसरवित आहे. यातून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना हरताळ फासला जात आहे. या महापुरुषांनी कुठल्याही प्रकारची जातीयता, विषमता, धर्मांधता, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी - परंपरा पेरण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी तळागाळातील, कुठल्याही जाती धर्मातील माणूस सुधारला पाहिजे, घडला पाहिजे, शिकला पाहिजे, पुढे गेला पाहिजे यासाठी प्रयत्न केले. आज मात्र त्यांच्याच विचारांना, कार्याला, कर्तुत्वाला तिलांजली दिली जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा वापर केवळ अन् केवळ फक्त राजकारणासाठीच केला जातो.

आज त्यांचे नाव घेऊन, त्यांची प्रतिमा ठेवून त्यांच्यासमोरच धर्मांधतेला आणि जातीयतेला खतपाणी घातले जाते.

# भारताची ‘एफडीआय’ नीती

सत्यसाईपीएम

नुकताच केंद्र सरकारने चीनसह शेजारी राष्ट्रांतून थेट विदेशी गुंतवणुकीसंदर्भात नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे चीनचे तंत्रज्ञान आणि भांडवल वापरून भारतात उत्पादन करणे हे भारताच्या हिताचे ठरेल. आखातातील भूराजकीय तणाव, खनिज तेलाच्या तापलेल्या किमती आणि इंधनटंचाई अशा प्रतिकूल वातावरणाचा विदेशी गुंतवणुकीसही फटका बसू शकतो. भारताला आपल्या उत्पादन क्षेत्राचा विस्तार करायचा असल्यामुळे आणि पुरवठासाखळीत खंड पडू नये यासाठी संकटातूनही मार्ग काढावा लागणार आहे. केंद्र सरकारने चीनसह शेजारी राष्ट्रांतून थेट विदेशी गुंतवणुकीसंदर्भात (एफडीआय) नियम शिथिल करण्याचा निर्णय घेतला आहे.

भारताच्या शेजारी देशांमध्ये चीन, पाकिस्तान, बांगलादेश, भूतान, नेपाळ, म्यानमार आणि अफगाणिस्तानचा समावेश आहे. यापूर्वी पाकिस्तान आणि बांगलादेश या दोन शेजारी राष्ट्रांसाठी एफडीआयसंदर्भात सरकारी परवानगीचा नियम होता. करोनाकाळात यामध्ये चीनचाही समावेश करण्यात आला होता, मात्र हा नियम चीनबाबत शिथिल करण्यात आला.

सीमावाद कायम असतानाही आर्थिक हितसंबंधांसाठी चीनशी संवाद सुरू करणे, हा भारताचा व्यावहारिक दृष्टिकोन दाखवतो. भारत आता एका अशा वळणावर आहे, जिथे तो रशियाशी मैत्री ठेवू शकतो, अमेरिकेसोबत संरक्षण करार करू शकतो आणि त्याचवेळी चीनच्या गुंतवणुकीचा वापर आपल्या प्रगतीसाठी करून घेऊ शकतो.

अमेरिका आणि चीनमधील व्यापारयुद्ध शिगेला पोहचले आहे. अमेरिकेकडून भारतावर सातत्याने दबाव आहे की, चीनपासून लांब राहावे. पण सत्य हे आहे, की भारताची चीनसोबतची व्यापारतूट जवळपास १०० अब्ज डॉलर्सच्यापुढे गेली आहे. आपण चीनकडून बराच माल आयात करतो, पण त्या प्रमाणात निर्यात करत नाहीत. भारतात उत्पादित मोबाइलमधील ७० टक्के सूटे भाग अजूनही चीनमधून येतात. भारतीय औषधनिर्मिती क्षेत्राला लागणारे ८० टक्के कच्चे साहित्य चीन पुरवतो. म्हणजेच, भारताची आर्थिक नाकेबंदी करण्याची क्षमता चीनकडे आहे. चीनबरोबरची भारताची व्यापारतूट २०२५ च्या आकडेवारीनुसार, ११६ अब्ज डॉलर्सच्या विक्रमी



पातळीवर पोहचली आहे. भारत चीनकडून १३५ अब्ज डॉलर किमतीचा माल आयात करतो, तर केवळ १९ अब्ज डॉलर्स किमतीचा माल निर्यात करतो. ही स्थिती भारताला आर्थिकदृष्ट्या चीनवर अवलंबून ठेवते. जर उद्या पुन्हा सीमेवर तणाव निर्माण झाला, तर चीन या व्यापाराचा शस्त्र म्हणून वापर करून भारताची पुरवठासाखळी खंडीत करू शकतो. या परिस्थितीत चीनशी मर्यादित भागीदारी करणे हीच काळाची गरज आहे.

एप्रिल २०२० ते डिसेंबर २०२५ या काळात भारतात झालेल्या एकूण थेट परकीय गुंतागुंतीच्या प्रवाहात चीनचा वाटा २.९१ अब्ज डॉलर्स म्हणजे गुंतवणुकीच्या ०.३२ टक्के इतका होता. जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या भीषण चकमकीनंतर भारत-चीन संबंध बिघडले. त्यानंतर भारताने टिकटॉक, वीचॅट आणि अलिबाबाच्या यूसी ब्राउझरसारख्या दोनशेहून अधिक चिनी मोबाइल ॲप्सवर बंदी घातली. चीनमधून भारतात होणाऱ्या गुंतवणुकीवरही निर्बंध घातले. त्यामुळे तेथून येणाऱ्या एफडीआय मध्ये घट झाली. मोठ्या प्रमाणात येणारी एफडीआय ही ऑटोमॅटिक रूटने येते. गेल्या काही वर्षांत एफडीआयला प्रोत्साहन देण्यासाठी नियम सैल करण्यात आले.

काही क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारच्या मंजुरीविना परदेशी कंपन्याना भारतीय कंपन्यामध्ये थेट गुंतवणूक करता येते. मात्र संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, दूरसंचार, औषध निर्मिती, अणुऊर्जा आदी १७ क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय थेट गुंतवणूक करता येत नाही. नीति आयोगाचे सदस्य आणि अर्थतज्ज्ञ राजीव गौबा यांनी चीनमधून येणाऱ्या भांडवलावरील नियंत्रणे काढून टाकण्याची शिफारस केली होती. चीनमधील गुंतवणूक अधिक प्रमाणात येईल आणि त्यामुळे विविध क्षेत्रातील उत्पादनही वाढेल. हे उत्पादन काही प्रमाणात निर्यातही करता येईल. यामुळे रोजगारनिर्मितीस चालना मिळू शकेल. अर्थात गेल्या पाच वर्षांत चीनमधून येणाऱ्या विदेशी भांडवलाची आवक घटली असली तरी त्या देशाशी व्यापार प्रचंड प्रमाणात वाढला. चीन हा भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनलेला आहे.

२०२४-२५ मध्ये चीनला होणारी निर्यात १४.५ टक्क्यांनी घटून १४.२५ अब्ज डॉलर्स इतकी झाली. उलट आयात त्याच वर्षात ११.५२ टक्क्यांनी वाढून ११३.४५ अब्ज डॉलर्स झाली. परंतु एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान हे चित्र पूर्णपणे बदलले. निर्यात घसघशीत अशा ३८ टक्क्यांनी वाढली. यामुळे चीनबरोबरची व्यापारतूट बऱ्यापैकी घटली.

आता सीमेलगतच्या देशांमधून भांडवली माल, इलेक्ट्रॉनिक्स घटक आणि अन्य महत्त्वाच्या क्षेत्रातील गुंतवणूक आल्यास त्याबाबत दोन महिन्यांच्या आत निर्णय घेतला जाणार आहे. कारखानदारीतील महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये देशांतर्गत क्षमता वाढणे, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी चीनबरोबर भारतीय कंपन्या जॉईंट व्हेंचर्सदेखील स्थापन करू शकतील.

चीनमुळे नवनवीन आद्ययावत तंत्रज्ञान भारतात येऊ शकेल आणि जागतिक पुरवठासाखळीचा भाग होण्याच्या दृष्टीने हे धोरण उपयुक्त ठरू शकेल. यापूर्वीच्या एका केंद्रीय अर्थ खात्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये चीनमधून भांडवली गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पावले उचलण्याचे महत्त्व विषद करण्यात आले.

एकेकाळी पूर्व आशियाई देशांनी चीनमधून भांडवल खेचून घेऊन देशांतर्गत उत्पादन वाढवले आणि त्या देशांच्या अर्थव्यवस्थांचे रूपांतर निर्यातप्रधान देशांमध्ये करण्यात आले.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मरण

प्रसाद ताम्हनकर

हिंदुस्थान सरकारने नुकतीच नव्या आयटी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी नियम) कायद्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. हा नवा कायदा जुन्या २०११ साली लागू केलेल्या कायद्याची जागा घेईल. सध्या याच नव्या कायद्याचा आधार घेऊन सरकारने एक्स (पूर्वीचे ट्विटर) आणि इन्स्टाग्रामला मोदींशीसंबंधित अनेक पोस्ट हटवण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे या सर्व पोस्ट तीन तासात हटवण्यास सांगण्यात आले असून जुन्या कायद्यानुसार हा कालावधी ३६ तासांची वेळ देणारा होता.सरकारने या दोन्ही सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सला ज्या पोस्ट हटवण्यास सांगितले, त्या मुख्यत मोदींवर टीका करणा?या, उपहासात्मक पोस्ट, सरकारच्या कारभारावर जळजळीत शब्दांत टीका करणा?या, विरोधी पक्षांनी शेअर केलेल्या, एआयद्वारे बनवलेल्या पोस्ट आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात सरकारने अदानी कंपनीची आलोचना करणारे १३८ यूटयूब व्हिडीओ आणि ८३ इन्स्टाग्राम पोस्ट हटवण्याचे आदेश अचानक दिले होते. अनेक पत्रकार आणि यूटयूबर्सने याचा निषेध करत हा दिवस ‘अदानी व्हिडीओ टेकडाऊन दिवस’ म्हणून जाहीर करत आपल्या वेदना प्रगट केल्या होत्या.

नवे आयटी नियम हे अत्यंत जाचक आणि गुंतागुंतीचे असल्याची टीका सर्वत्र होत आहे. अनेक सायबर तज्ज्ञांच्या मते एखादी पोस्ट ही विवादित आहे का नाही आणि ती हटवावी की नाही याचा अभ्यास करण्यासाठी पूर्वी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना ३६ तासांचा अवधी मिळत असे. मात्र नव्या कायद्यात हा अवधी अवघ्या तीन तासांवर आणून ठेवल्याने ही माध्यमं कोणताही धोका पत्करायला नको म्हणून कोणतेही परीक्षण न करता सरकारने सांगितलेल्या पोस्ट त्वरेने हटवत आहेत. तंत्रज्ञान कंपन्यांनीदेखील या तीन तासांच्या अवधीविषयी चिंता व्यक्त केली आहे. हा वेळ अत्यंत कमी असल्याने अनेक कंपन्यांना स्वयंचलित प्रणालीवर अवलंबून राहावे लागणार आहे. त्यामुळे नियमांना धरून असणा?या पोस्टदेखील हटवल्या जाण्याची शक्यता वाढणार आहे. अशा परिस्थितीत छोटया़ कंपन्यांना हिंदुस्थानात आपला कारभार चालवणे अधिक खर्चाचे आणि जिकरीचे होणार आहे.



सरकार या कंपन्यांकडे एखाद्या पोस्टचा सोर्स अर्थात ती पोस्ट लिहिणा?याची, शेअर करणा?याची माहितीदेखील मागू शकते. व्हॉट्सअ?पसारख्या कंपन्या वापरकर्त्यांची माहिती गोपनीय ठेवतात त्यांना आता सरकारच्या नव्या कायद्याशी झुंजावे लागणार आहे. नव्या नियमांनुसार एखादी कंपनी नव्या कायद्याचे पालन करण्यास अयशस्वी ठरल्यास तिला दंड आणि कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते. सध्या अनेक कंपन्यांनी याविषयी सावध भूमिका घेतली असली तरी पुढील काळात त्यांना एकत्र येत एक ठोस भूमिका घ्यावी लागणार आहे. सरकारने लादलेली ही अघोषित सेन्सॉरशिप म्हणजे सामान्य माणसाची मुस्कटदाबी असल्याची भावना अनेक समाजधुरीणींनी जाहीरपणे व्यक्त केली आहे.

महत्त्वाचे म्हणजे कायम सरकारच्या बाजूने आवाज उठवणारी आणि स्वाभिमानी हिंदुत्व मिरवणारी काही सोशल मीडिया अकाऊंटदेखील अचानक हिंदुस्थानात ब्लॉक करण्यात आली आहेत. त्यांनी बहुदा युजीसी रेग्युलेशन, २०२६ च्या विरोधात आवाज उठवल्याचा फटका त्यांना बसला असावा अशी कुजबूज आहे.

मथितार्थ काय, तर तुम्ही आपले असा वा परके असा, तुम्ही कधी, कुठे आणि काय बोलावे हे सरकार ठरवणार आणि तुम्ही त्याचे पालन करणार.



# सनोज मिश्रा याने मला अनेकदा.....

प्रयागराज महाकुंभ मध्ये चर्चेत आलेली मोनालिसा सध्या तिच्या लग्नामुळे चर्चेत आहे. आता तिने 'द डायरी ऑफ मणिपूर'चे दिग्दर्शक सनोज मिश्रा यांच्यावर पत्रकार परिषद घेत, गंभीर आरोप केले आहेत. मोनालिसाच्या म्हणण्यानुसार, सनोज मिश्रा यांनी तिला अनेक वेळा अयोग्यरित्या स्पर्श केला आहे. तिने तिच्या कुटुंबावरही आरोप केला आहे की त्यांनी तिला मदत केली नाही.

मोनालिसाने नुकतेच केरळमध्ये राहणाऱ्या तिचा प्रियकर फरमान खानसोबत लग्न केले आहे. ती सध्या कोचीमध्ये राहते. मंगळवारी कोचीमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत भावनाविवश होऊन तिने गंभीर आरोप केले. मोनालिसा पत्रकार परिषदेत म्हणाली, 'सनोज मिश्रा चांगला माणूस नाही. चित्रपटादरम्यान त्याने मला अनेक वेळा अयोग्यरित्या स्पर्श केला. मी त्याच्या स्पर्शाबद्दल माझ्या कुटुंबालाही सांगितले, पण त्यांनी मला पाठिंबा दिला नाही. माझ्यासोबत काय घडले हे मला माहीत आहे. माझ्यावर अन्याय झाला आहे. मला फक्त न्याय हवा आहे. सनोज मिश्राने मला दोनदा स्पर्श केला. जेव्हा मी माझ्या कुटुंबाला सांगितले, तेव्हा ते म्हणाले, 'नाही, नाही, हा तुझा पहिला चित्रपट आहे.'

ोनालिसाच्या पत्रकार परिषदेनंतर सनोज मिश्रा यांनीही एक निवेदन जारी केले. त्यांनी आरोप केला की, माझ्या विरोधात एक कट रचला जात आहे. मोनालिसाला माझ्या विरोधात खोटे बोलण्यासाठी प्रवृत्त केले जात आहे. माझ्यावरील सर्व आरोप खोटे आहेत. मी मोनालिसाला माझी बहीण मानतो. मोनालिसा नेहमीच माझ्याबद्दल चांगल्या गोष्टी बोलायची, पण रातोरात असं काय घडलं की ती माझ्या विरोधात बोलू लागली?

मोनालिसाने ११ मार्च रोजी तिरुवनंतपुरम येथील एका मंदिरात हिंदू रितीरिवाजानुसार, केरळमधील तिचा प्रियकर फरमान खानसोबत लग्न केले. दुसऱ्या दिवशी, तिने या घटनेबद्दल तपशील देण्यासाठी पत्रकार परिषद घेतली. तिने तिच्या वैयक्तिक आयुष्यातील काही पैलू देखील सांगितले, ज्यामुळे तिला हे पाऊल उचलावे लागले.

# आमिर खानने पाहिला नाही रणवीर सिंहचा 'धुरंधर २', म्हणाला....

रणवीर सिंहची मुख्य भूमिका असलेला 'धुरंधर २' सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. पहिल्याच आठवड्यात या चित्रपटाने विक्रमी कमाई केली आहे. पहिला वीकेंड गाजवणाऱ्या या चित्रपटाच्या दुसऱ्या वीकेंडच्या कमाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बॉलीवूडसह दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गजांनी सोशल मीडियावर या चित्रपटाचे कौतुक केले आहे. मात्र, या सगळ्यात आमिर खानची प्रतिक्रिया आली नाही, कारण त्याने अद्याप हा चित्रपट पाहिलेला नाही.

**धुरंधरबद्दल आमिर खान म्हणाला**

रणवीर सिंहच्या या चित्रपटाबद्दल एका कार्यक्रमात आमिर खानने विधान केलं. 'मला वाटतं हा चित्रपट खूप चांगली कामगिरी करत आहे. मी अजून तो पाहिलेला नाहीये, पण मी त्याचं कौतुकच ऐकत आहे. 'धुरंधर १' आणि आता 'धुरंधर २' या दोन्ही चित्रपटांनी उत्तम कामगिरी केली आहे, धुरंधरच्या टीमला खूप शुभेच्छा,' असं आमिर खान म्हणाला.


धुरंधर रिलीज झाल्यावर बऱ्याच बॉलीवूड कलाकारांनी पोस्ट केल्या होत्या. त्यातल्या अनेकांनी धुरंधर २ बद्दल बोलणं टाळलंय. यात हृतिक रोशनचाही समावेश आहे. या चित्रपटातील विचार पटले नसले, तरी त्यातील भव्यता आणि मांडणीचे कौतुक आहे, असं हृतिक रोशनने म्हटलं होतं.

**इमरान खानचे परखड मत चर्चेत**

धुरंधर २ मधील रक्तपात, हिंसा याबद्दल चर्चा होत आहे. या वादात आमिर खानचा भाचा, अभिनेता इमरान खान याने 'हिंसक हिरो' दाखवण्याच्या वाढत्या ट्रेंडवर उघडपणे भाष्य केलं आहे. एका रेडिट सेशनमध्ये इमरान म्हणाला, 'रक्ताने माखलेला आणि रागीट माणूस साकारण्यात मला रस नाही. मला वाटतं सध्या असाच प्रकार खूप जास्त प्रमाणात दाखवला जात आहे.'



अशा चित्रपटांमधून वाढत्या हिंसेचे उदात्तीकरण केले जात आहे, याबद्दल इमरानने काळजी व्यक्त केली. 'नकार पचवू न शकणाऱ्या आणि भावनिकदृष्ट्या अपरिपक्व पुरुषांच्या हिंसक वागण्याला ज्या प्रकारे या चित्रपटांतून खतपाणी घातलं जातंय, ते पाहून मी अस्वस्थ होतो.' हिंसा दाखवणं आणि तिचं समर्थन करणं यात फरक आहे, असं स्पष्ट मत इमरान खानने मांडलं. 'हिंसा पडद्यावर दाखवणं आणि तिला योग्य ठरवणं यात मोठा फरक आहे. लोक विचार न करता केवळ ट्रेंडच्या मागे धावत आहेत असं मला वाटते. माझी सदसद्विवेकबुद्धी मला अशा बेजबाबदार कथेचा भाग होण्याची परवानगी देत नाही,' असं इमरान खान स्पष्टच बोलला.



# पेस्टल ग्रीन साडी, चोकर हार....

बॉलीवूडची लोकप्रिय अभिनेत्री आलिया भट्ट सध्या तिच्या ग्लॅमरस फोटोंमुळे सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. नुकतेच आलियाने तिचे काही सुंदर फोटो शेअर केले असून, चाहत्यांकडून त्यावर लाईक्सचा वर्षाव होत आहे. या फोटोंमध्ये आलियाने अतिशय सुंदर अशा पेस्टल ग्रीन रंगाची ट्रान्सपरंट साडी परिधान केली आहे. साडीवर असलेल्या नाजूक फुलांच्या नक्षीकामाने तिच्या सौंदर्याला एक वेगळीच मोहिनी घातली आहे.

या लूकला पूर्ण करण्यासाठी तिने गळ्यात एक आकर्षक मोत्यांचा चोकर परिधान केला असून तो उठून दिसतोय. मिनिमल मेकअप आणि मोकळ्या केसांच्या स्टाईलमध्ये आलिया एखाद्या अप्सरेसारखी भासत आहे.सूर्यास्ताच्या पार्श्वभूमीवर काढलेले हे फोटो तिच्या चाहत्यांच्या मनाचा ठाव घेत आहेत. तिची ही साडी आणि एकंदरीत स्टाईल सध्या फॅशन जगतात जोरदार ट्रेंड करत आहे.

# रश्मिकाला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार



अभिनेत्री रश्मिका मंदानाला 'तेलंगणा गदर फिल्म अवॉर्डस् २०२५' मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रश्मिका मंदानाला तिच्या 'द गर्लफ्रेंड' चित्रपटातील 'भूमा देवी' या भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून निवडण्यात आले. अभिनेता राम चरणने मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या उपस्थितीत रश्मिकाला ही ट्रॉफी दिली. लग्नानंतर रश्मिकाचा हा पहिला मोठा पुरस्कार आहे.

# 'धुरंधर-२' एक हजार कोटींच्या क्लबमध्ये ...




रणवीर सिंहची प्रमुख भूमिका असलेला 'धुरंधर : द रिवेंज' हा चित्रपट अवघ्या सात दिवसात १ हजार कोटींच्या क्लबमध्ये पोहोचला आहे.

सर्वात वेगाने १ हजार कोटी रुपये कमवण्याच्या रेकॉर्डमध्ये या चित्रपटाने 'पुष्पा-२'ची बरोबरी साधली आहे. 'धुरंधर'ने जगभरात १००६.५० कोटी रुपये कमावले आहेत. 'धुरंधर-२'चे हिंदुस्थानात एकूण नेट कलेक्शन ६२३.४२ कोटी रुपये आहे.

तर परदेशात या चित्रपटाने २६१.९२ कोटी रुपये कमावले आहेत.

'धुरंधर-२'ने पेड प्रिव्ह्यू शोमधून ४३ कोटी, पहिल्या दिवशी १०२.५५ कोटी, दुसऱ्या दिवशी ८०.७२ कोटी, तिसऱ्या दिवशी ११३ कोटी, चौथ्या दिवशी ११४.८५ कोटी रुपयांची कमाई केली आहे.

# वयाच्या पन्नाशीतही तरुणींनाही लाजवेल अशी फिगर...

शिल्पा शेट्टी ही बॉलिवूडमधील मोजक्या अभिनेत्रींपैकी एक आहे, जिने आपल्या अभिनयासोबतच फिटनेस आणि फॅशनच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. ९० च्या दशकापासून आजपर्यंत तिचा ग्लॅमरस प्रवास कायम आहे. 'योग क्वीन' शिल्पा शेट्टीने आपल्या हटके फॅशन सेन्सने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. फ्युजन आऊटफिटमध्ये ती एखाद्या अप्सरेसारखी सुंदर दिसत असून, तिचा हा लूक सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. या फोटोमध्ये शिल्पाने परिधान केलेला ड्रेस हा 'फ्युजन गाऊन' प्रकारातील आहे. तिच्या या ड्रेसमध्ये हिंदुस्थानी साडीची नजाकत आणि पाश्चात्य



गाऊनची आधुनिकता यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो. हा 'मिंट ग्रीन' किंवा 'पेस्टल शाईन' रंगाचा ड्रेस असून सध्या खूप ट्रेंडमध्ये आहे.लूक पूर्ण करण्यासाठी शिल्पाने यावर हिरव्या खड्यांचा चोकर सेट घातला आहे, जो या पेस्टल ड्रेसवर अत्यंत शोभून दिसत आहे.

# ५१व्या वर्षी अक्षय खन्ना जगतोय सिंगल

१९९० च्या दशकात आपल्या अभिनयानं प्रेक्षकांची मनं जिंकणाऱ्या अक्षय खन्नाचा मोठा चाहतावर्ग आहे. अनेक मुली अक्षयच्या प्रेमात होत्या. मात्र, अभिनेता अविवाहित राहिला असून त्यानं कधीही लग्न केलेलं नाही. पण, अक्षय खन्नाचं नाव अनेक अभिनेत्रींसोबत जोडले गेलं आहे. असं म्हटलं जातं की, त्याचा करिश्मा कपूरसोबत साखरपुडाही झाला होता, पण गोष्टी बिघडल्या.

विनोद खन्ना यांचा मुलगा, अक्षय खन्नानं काही वर्षांपूर्वी एका मुलाखतीत सांगितलं होतं की, तो कधीही लग्न करणार नाही. त्याला कमिटमेंटची भीती वाटते आणि त्याला आपलं आयुष्य एकट्यानं जगायचं आहे. मुंबईतील किशोर इन्स्टिट्यूटमध्ये अभिनयाचं प्रशिक्षण घेतल्यानंतर अक्षय खन्नानं १९९७ मध्ये 'हिमालय पुत्र' या चित्रपटातून अभिनयात पदार्पण केलं. त्यानंतर तो 'बॉर्डर' या चित्रपटात दिसला आणि या सिनेमानं तो रातोरात स्टार बनला.



फार कमी कालावधीतच अक्षय खन्ना ९० च्या दशकातील सर्वात लोकप्रिय कलाकारांपैकी एक बनला. 'ताल', 'दिल चाहता हैं', 'गांधी माय फादर', 'आक्रोश' आणि 'हमराज' यांसारख्या चित्रपटांमधील त्याच्या दमदार अभिनयाचं खूप कौतुक झालं. पण, २०१० मध्ये अक्षय खन्नानं चित्रपटांमधून चार वर्षांचा ब्रेक घेतला आणि २०१२ मध्ये पुन्हा पदार्पण केलं. आपल्या दुसऱ्या इनिंगमध्ये, अक्षय खन्नानं उत्कृष्ट कामगिरी केली आणि 'डिशूम', 'इत्तेफाक' आणि 'दृश्यम २' यांसारख्या चित्रपटांमुळे तो घराघरात पोहोचला.

अजय देवगणसोबतच्या ब्रेकअपनंतर करिश्मा कठीण काळातून जात असताना अक्षय खन्ना तिला भेटला. वृत्तानुसार, अक्षय खन्ना आणि करिश्मा यांच्यातील जवळीक वाढली आणि त्यांचा साखरपुडा झाला. रणधीर कपूर यांनाही अक्षय आवडत होता आणि त्यानं आपली मुलगी करिश्माशी लग्न करावं अशी त्यांची इच्छा होती. मात्र, असं म्हटलं जातं की, करिश्माची आई, बबिता, यांनी या नात्याला मान्यता दिली नाही. यामुळे अक्षय आणि करिश्मा यांचा ब्रेकअप झाला.

अक्षय खन्नाचं नाव ऐश्वर्या रायसोबतही जोडलं गेलं होतं. त्यांनी 'ताल' आणि 'आ अब लौट चलें' यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं. अक्षय आणि ऐश्वर्याची ऑनस्क्रीन केमिस्ट्री आधीच चर्चेत होती आणि त्यांच्या ऑफस्क्रीन रिलेशनशिप चीही चर्चा सुरू झाली. एका मुलाखतीत अक्षय खन्नानं सांगितलेलं की, जेव्हाही तो ऐश्वर्याला भेटायचा, तेव्हा तो तिच्याकडे एकटक पाहायचा. तो तिच्यावरून आपली नजर हटवू शकत नव्हता, असं अक्षयने सांगितलेलं.अक्षय खन्नाचं नाव अभिनेत्री श्रिया सरनसोबतही जोडले गेलं आहे. वृत्तानुसार, 'गली गली में चोर है' या चित्रपटात एकत्र काम करत असताना अक्षय आणि श्रिया सरन यांच्या नावांची चर्चा सुरू झाली होती. अक्षय आणि श्रिया सरन पहिल्याच भेटीत एकमेकांच्या प्रेमात पडले. नंतर त्यांचं नातं तुटलं असलं तरी, त्यांच्यात चांगली मैत्री होती.

# अभिनय, लेखन, कॉमेडीनंतर समीर चौघुले आता सादर करणार कथ्थक नृत्य

छोट्या पडद्यावरचा प्रेक्षकांचा आवडता विनोदी कार्यक्रम 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी हसवणुकीचा नवा डोस घेऊन येत आहे . येत्या सोमवार, रात्री ९ वाजता प्रसारित होणाऱ्या भागात प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे काहीतरी अगदी वेगळं आणि खास.

सोनी मराठी आपल्या प्रेक्षकांसाठी निरनिराळे कार्यक्रम नेहमीच घेऊन येते आणि प्रेक्षकांचं भरघोस मनोरंजन करते. महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमाने देखील नेहमीच प्रेक्षकांचे मनोरंजन केलंय. या कार्यक्रमातील लोकप्रिय आणि बहुगुणी कलाकार समीर चौघुले आपल्या अफलातून अभिनय, भन्नाट कॉमेडी आणि उत्तम लेखनासाठी ओळखला जातो. प्रत्येक भागात तो काहीतरी अनोखं सादर करून प्रेक्षकांना खळखळून हसवताना दिसतो. कधी त्यांच्या अभिनयातून, कधी हटके गाण्यांमधून तर कधी भन्नाट डान्स स्टाइलमधून ते नेहमीच प्रेक्षकांचं मनोरंजन करत आला आहे.

आतापर्यंत विविध डान्स प्रकार सादर केल्यानंतर, या नव्या भागात तो सादर करणार आहेत कथ्थक नृत्य, होय...कथ्थक शिकवणी या एका नव्या प्रहसन कथानकात तो पोहोचतो एका



कथ्थक शिकवणाऱ्या संस्थेत, आणि त्यानंतर घडतं भन्नाट असं काही तरी.

ही हसवणारी धमाल, जी प्रेक्षकांना नक्कीच पोट धरून हसायला भाग पाडेल.

समीर प्रत्येक वेळी मनापासून प्रेक्षकांना हसवण्याचा प्रयत्न करतो आणि यावेळीही तो त्यांच्या खास अंदाजात कथ्थक सादर करून कशाप्रकारे प्रेक्षकांची मनं जिंकणार, याची उत्सुकता सगळ्यांनाच लागली आहे.

दरम्यान, समीर चौघुले याच्या इतर कामाबद्दल बोलायचं झालं तर तो गेल्या वर्षी 'गुलकंद' या सिनेमात दिसला होता. या सिनेमातील भूमिकेसाठी मानाच्या पुरस्कार सोहळ्यात त्याला 'सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता' हा पुरस्कार मिळाला आहे. याबद्दल समीर चौघुले यानं आनंद व्यक्त करत लिहिलं की, सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता (चित्रपट गुलकंद) .रसिक प्रेक्षकांचे मनःपूर्वक आभार..आणि खास आभार सचिन गोस्वामी सर आणि सचिन मोटे सर यांचे. तुम्ही दाखवलेल्या विश्वासामुळं हे शक्य झालं आहे.

# केळी न खाताही पोटॅशियमची कमतरता कशी भरून काढायची?



पोटॅशियम हे एक महत्त्वाचे खनिज आहे. ते शरीराची अनेक महत्त्वाची कार्ये योग्यरित्या पार पाडण्यास मदत करते. ते हृदय, स्नायू आणि मज्जासंस्थेसाठी महत्त्वाचे आहे. पोटॅशियमयुक्त पदार्थांचे सेवन केल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते. हे खनिज ब्लड प्रेशर नियंत्रित करते आणि हृदयविकारांना प्रतिबंध करते. ते स्नायूंना शिथिल करण्यास मदत करते आणि चेतासंकेत प्रसारित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. ते शरीरातील द्रवांचे संतुलन राखते. केळी पोटॅशियमचा सर्वात समृद्ध स्त्रोत मानली जातात. मात्र, काही लोकांना केळी आवडत नाहीत किंवा त्यांची ॲलर्जी असते. त्यामुळे ते केळी खाणे टाळतात. जर तुम्हाला पोटॅशियमची कमतरता दूर करायची असेल आणि केळी खाणे टाळायचे असेल तर तुम्ही पोटॅशियमचे प्रमाण वाढवण्यासाठी काही विशिष्ट पदार्थांचे सेवन करू शकता.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, आहारात पोटॅशियमचे प्रमाण वाढवल्याने तरूणांमधील ब्लड प्रेशर मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. दिद्ध.म्दस् वर प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, जर तुम्हाला केळी खायची नसतील, तर तुम्ही पोटॅशियमयुक्त इतर फळे खाऊ शकता. तर मग जाणून घेऊया की, एका प्रौढ व्यक्तीला दररोज किती पोटॅशियमची गरज असते आणि केळ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्या पदार्थांमधून पोटॅशियम मिळू शकते.

**प्रौढ व्यक्तींसाठी पोटॅशियमचे सेवन किती असावे?**

हेल्थलाइननुसार, एका मध्यम आकाराच्या केळ्यामध्ये अंदाजे ४५१ मिग्रॅ पोटॅशियम असते. एका निरोगी व्यक्तीला दररोज अंदाजे २,६०० ते ३,४०० मिग्रॅ पोटॅशियमची आवश्यकता असते. हे प्रमाण स्त्री-पुरूष यांच्यानुसार बदलू शकते. जे लोक हाय ब्लड प्रेशर नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांना ५,००० मिग्रॅपर्यंत पोटॅशियम घेण्याचा सल्ला दिला जाऊ शकतो. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे योग्य प्रमाणात पोटॅशियमचे सेवन करणे महत्त्वाचे आहे.

**शरीरातील पोटॅशियमच्या कमतरतेची लक्षणे**- पोटॅशियमच्या कमतरतेला वैद्यकीय भाषेत हायपोकॅलेमिया म्हणतात, तसंच समस्या उद्भवू शकतात. स्नायू आणि नसांमध्ये बधिरता आणि पेटके येऊ शकतात व्यायामानंतर किंवा रात्रीच्या वेळी अचानक पेटके येऊ शकतात. थकवा आणि अशक्तपणा, अनियमित हृदयाचे ठोके, मुंग्या येणे किंवा बधिरता, पचनाशी संबंधित समस्या असू शकतात.

**नारळाचे पाणी**

जर्नल ऑफ फिजिओलॉजिकल अँथ्रोपोलॉजीनुसार, साध्या पाण्यापेक्षा आणि स्पोर्ट्स ड्रिंक्सपेक्षा नारळाचे पाणी शरीरातील पाण्याची पातळी पूर्ववत करण्यासाठी अधिक प्रभावी आहे. व्यायामानंतर शरीराला हायड्रेट करण्यासाठी नारळाचे पाणी एक उत्तम पर्याय मानले जाते. एक कप नारळाच्या पाण्यात सुमारे ६०० मिलीग्रॅम पोटॅशियम असते. ते शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखण्यास मदत करते. पोटॅशियम व्यतिरिक्त त्यात इतर आवश्यक इलेक्ट्रोलाइट्स देखील आढळतात. ते थकवा दूर करण्यास आणि स्नायूंना आराम देण्यास उपयुक्त ठरतात. हे कमी कॅलरी असलेले पेय वजन नियंत्रणासाठी एक उत्तम स्त्रोत आहे.

**ॲवोकाडो**

न्यूट्रिएंट्स जर्नलनुसार, ॲवोकाडोमधील पोटॅशियम-सोडियमचे प्रमाण हृदयरोगाचा धोका २० टक्क्यांनी कमी करू शकते. जर तुम्हाला पोटॅशियमचे सेवन वाढवायचे असेल, तर केळ्यांऐवजी तुमच्या आहारात ॲवोकाडोचा समावेश करा. एक मध्यम आकाराचे साल काढलेले आणि बीविरहीत ॲवोकाडोमध्ये अंदाजे ६९० मिग्रॅ पोटॅशियम असते. त्यात कमी सोडियम आणि हृदयासाठी आरोग्यदायी फॅट्स देखील असतात. ते हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. ॲवोकाडो स्मूदी आणि सॅलडमध्ये खाल्ला जाऊ शकतो. तो केवळ चविष्टच नाही, पोषक तत्वांनी समृद्ध असे एक सुपरफूडही आहे.

**कलिंगड**

कलिंगड उन्हाळ्यात केवळ स्वादिष्टच नाही, तर ते शरीर थंड ठेवण्यास आणि शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यासही मदत करते. कलिंगडाच्या सुमारे दोन फोडींमध्ये अंदाजे ६४० मिलीग्रॅम पोटॅशियम असते. ते शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढते आणि तहान शमवण्यासाठी अत्यंत प्रभावी आहे. उन्हाळ्यात थंड कलिंगड ताजेतवाने करणारे ठरते. काही लोक ते मीठ लावून खातात, तर काही जण त्यात मसाले घालतात. कलिंगड शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवते आणि पोटॅशियमची गरज पूर्ण करते.

**मनुके**

मनुका हा छोटासा पण पौष्टिक नाश्ता आहे. फक्त अर्धा कप मनुक्यांमध्ये अंदाजे ६१५ मिग्रॅ पोटॅशियम असते. हा एक गोड आणि खायला सोपा पर्याय आहे जो तुमच्या पोटॅशियमची गरज पूर्ण करण्यास मदत करतो. इतर सुक्या मेव्यासोबत मिसळूनही तो खाल्ला जाऊ शकतो.

**ॲप्रिकॉट (जर्दाळू)**

सुकवलेले जर्दाळू पोटॅशियमचा उत्तम स्त्रोत आहेत. फक्त अर्धा कप सुकवलेल्या जर्दाळूमध्ये अंदाजे ७५५ मिग्रॅ पोटॅशियम असते. ते शरीराची दैनंदिन गरज पूर्ण करते. याची चव किंचित गोड आणि आंबट असते.

**भोपळा**

भोपळ्याची साधारणपणे भाजी बनवली जाते. मात्र, वनस्पतीशास्त्रानुसार, ते एक फळ आहे. अर्धा कप भिजसवलेल्या भोपळ्यात अंदाजे ४६५ मिग्रॅ पोटॅशियम असते. तो पोषक तत्वांनी समृद्ध असून त्याचा वापर विविध पदार्थांमध्ये केला जाऊ शकतो. भोपळ्याचा वापर सूप, स्ट्यू, करी आणि अगदी गोड पदार्थांमध्येही केला जातो.


# दोषमुक्त रस धातू

आयुर्वेदातील शरीरशास्त्राच्या संकल्पनांपैकी एक म्हणजे रस धातू. ज्या व्यक्तीमध्ये रस धातू उत्तम दर्जाचा असतो, त्याला 'रस सार' किंवा 'त्वक सार' व्यक्ती म्हणतात.

याबाबत अधिक जाणून घेऊया. मागील लेखात आपण पाहिले त्या सात धातूंमधील पहिला धातू आहे रस धातू. ज्या व्यक्तीमध्ये रस धातू उत्तम दर्जाचा असतो, त्याला 'रस सार' किंवा 'त्वक सार' व्यक्ती म्हणतात. त्याची त्वचा स्निग्ध, मऊ आणि चमकदार असते. त्वचेवरील लव (केस) कोमल आणि खोलवर रुजलेली असते. त्वचा दिसायला प्रसन्न आणि निर्दोष असते. या बाह्य लक्षणावरून रस धातू उत्तम असणा?या व्यक्ती लगेच ओळखता येईल.

रस धातूचे मुख्य स्थान हृदय मानले जाते. अन्न आमाशय आणि पक्वाशयात पचले जाते, त्यानंतर तयार होणारा पोषक अंश (आहार रस) हृदयात जातो आणि तिथून संपूर्ण शरीरात पसरतो असे सुश्रुत संहितेत सांगितले आहे.

सर्व वयोगटातील लोकांचे (मुले, तरुण आणि वृद्ध) पोषण करणे. मुलांमध्ये शरीराची वाढ आणि विकास करणे, मध्यम वयात इतर धातूंना स्थिर आणि सुस्थितीत ठेवणे, वृद्धपकाळात शरीराची झीज रोखणे आणि धातूंना



पूर्णपणे नष्ट होण्यापासून वाचवणे, शरीराचे अवयव आणि पेशी मऊ व स्निग्ध ठेवणे, शरीराला स्थिरता देणे. मानसिक समाधान आणि तृप्ती देणे.

**रस क्षय लक्षणे**

जेव्हा शरीरात रस धातूची कमतरता निर्माण होते, तेव्हा महत्त्वाचे लक्षण म्हणजे शब्दसहिष्णुता- कुठलाही आवाज सहन न होणे हे महत्त्वाचे लक्षण दिसते. रसाद्वारे होणारे पोषण थांबते, ज्यामुळे शरीराला अन्नाचा पुरेसा अंश मिळत नाही. इतर धातूंची झीज होणे, तोंड कोरडे पडणे, त्वचा आणि शरीराचे अवयव कोरडे पडणे, शरीर कृश किंवा बारीक होणे, अतिशय तहान लागणे, पोट, हृदय आणि मनात रिकामेपणा जाणवणे, लवकर थकवा येणे, हृदयात वेदना होणे किंवा कोणीतरी हृदय जोरात हलवत असल्यासारखे वाटणे, हृदयाचे ठोके वाढणे आणि धडधड होणे, हृदयात तीव्र वेदना होणे, थोडेसे काम केल्यावरही प्रचंड थकवा जाणवणे, अशी लक्षणे दिसतात. रस धातू क्षय झाला की शरीरात 'वात' दोष वाढतो. वरील सर्व लक्षणे वाढलेल्या वात दोषामुळे दिसतात.

जेव्हा रस धातू दूषित होतो, तेव्हा महत्त्वाचा आजार म्हणजे अन्नाबद्दल अनास्था निर्माण होणे. अन्नाला चव न लागणे, तोंडात विचित्र चव जाणवणे, चव ओळखता न येणे, मळमळणे किंवा तोंडात पाणी सुटणे, शरीरात जडपणा जाणवणे, झापड किंवा गुंगी येणे, अंगदुखी, ताप येणे, डोळ्यांसमोर अंधारी येणे, अ?निमिया (रक्तपांढरी), शरीरातील विविध मार्गांमध्ये अडथळा निर्माण होणे, नपुंसकत्व, उत्साह नसणे, अवयवांची कार्यक्षमता कमी होणे, वजन घटणे, पचनशक्ती (अग्नी) मंदावणे किंवा नष्ट होणे, अकाली सुरकुत्या पडणे आणि केस पांढरे होणे, असे आजार आणि लक्षणे दिसून येतात.

**रस धातू कसा सुधारावा?**

सहा रसांनी युक्त, संतुलित आणि ताजा गरम आहार घेतल्यास उत्तम रस धातू तयार होतो. तसेच आहार कितीही चांगला असला तरी तो पचण्यासाठी 'अग्नी' प्रबळ असणे गरजेचे आहे. वेळेवर झोप, भूक लागल्यावरच जेवणे, नियमित व्यायाम आणि ध्यानधारणा यामुळे रस धातू निरोगी राहतो. रस हा मुळात जलीय द्रव स्वरूपाचा असतो. त्यामुळे आहारात ताज्या फळांचा रस, ताक, सुंठ घातलेले पाणी किंवा नारळ पाण्याचा समावेश करावा. गाईचे दूध आणि शुद्ध साजूक तूप हे रस धातूसाठी 'अमृत' मानले जाते.

आहारात नैसर्गिक गोडवा असलेल्या पदार्थांचा समावेश करा (उदा. गहू, तांदूळ, मूग डाळ). जेवण कोरडे नसावे, त्यात थोड्या प्रमाणात तेलाचा किंवा तुपाचा अंश असावा. द्राक्षे, डाळिंब, आवळा आणि खजूर हे रस धातूची शुद्धी व वृद्धी करण्यासाठी सर्वोत्तम आहेत. जर रस क्षयामुळे थकवा येत असेल, तर दुधासोबत 'शतावरी कल्प' घेतल्यास रस धातूचे उत्तम पोषण होते. चांगले जेवण पचणे आवश्यक असते. त्यासाठी जेवणापूर्वी आल्याचा छोटा तुकडा, थोडे सैंधव मीठ आणि लिंबू रस घेतल्यास अग्नी प्रदीप्त होतो, ज्यामुळे आहार रसाची निर्मिती चांगली होते.

दररोज शरीराला किंवा किमान तळपायांना तिळाच्या तेलाने मसाज केल्याने त्वचेवरील 'भ्राजक पित्त' सुधारते आणि रस धातूचे लक्षण असलेल्या त्वचेला चमक येते. रात्रीची शांत झोप रस धातूच्या संवर्धनासाठी अत्यंत आवश्यक आहे. जागरणामुळे वात वाढतो आणि रस धातू सुकतो. रस धातूचा थेट संबंध मनाशी असतो. अतिचिंता केल्याने रस धातूचा क्षय होतो. त्यामुळे प्राणायाम आणि ध्यान फायदेशीर ठरते.

# वर्क फ्रॉम सिनेमा हॉल!



सध्या रणवीर सिंहचा बहुचर्चित चित्रपट धुरंधर-२ची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटाने अवघ्या चारच दिवसांत जगभरात ७०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी थिएटर मालकांनी शो वाढवले आहेत. धुरंधर चित्रपट पाहण्यासाठी एक महिला थेट थिएटरमध्ये लॅपटॉप घेऊन गेल्याचे दिसत आहे. या महिलेने थिएटरमधूनच वर्क फ्रॉम होम ऐवजी थिएटर केल्याचे दिसत आहे. याचा एक फोटोही तिने सोशल मीडियावर शेअर केला आहे. बंगळुरूमध्ये संपूर्ण थिएटर भरलेले दिसत असून यात ही महिला लॅपटॉपवर काम करताना दिसत आहे. या तिच्या फोटोवर नेटक-यांनी वेगवेगळ्या कमेंट्स केल्या आहेत. रात्री ११ च्या शो दरम्यान ही महिला काम करत असल्याने कॉर्पोरेटमधील लाइफस्टाइलवरही अनेकांनी कमेंट केल्या आहेत. वर्क फ्रॉम सिनेमा हॉलष्ठ अशा कमेंटही काहींनी केल्या आहेत.

# केसांमध्ये कोंडा झाला तर

केसामधील कोंडा दूर करण्यासाठी लिंबाचा रस, खोबरेल तेल, कोरफड आणि टी ट्री ऑईल हे अत्यंत प्रभावी घरगुती उपाय आहेत.


खोबरेल तेलात लिंबाचा रस मिसळून टाळूला मसाज करा. कोरफडीचा गर टाळूवर लावल्याने खाज आणि जळजळ शांत होते.सफरचंद सायडर व्हिनेगर पाण्यात मिसळून त्याने केस धुतल्यास टाळूची पीएच पातळी संतुलित राहते आणि कोंडा दूर होतो. कडुनिंबाच्या पानांचा रस किंवा पेस्ट टाळूवर लावल्यास कोंडा कमी होतो आणि खाज थांबते.

# नेटवर्क नसताना यूपीआय पेमेंट करायचय

सध्याच्या काळात आपण भाजीवाल्या पासून अगदी मोठ्या शोरूमपर्यंत सगळीकडे यूपीआयने पेमेंट करतो. इंटरनेट किंवा वाय-फाय नसतानाही आपल्याला पैसे पाठवता येतात.

ग्रामीण भागात इंटरनेट नसताना यूपीआयने पेमेंट करताना अडचणी येतात. यावर पर्याय म्हणून नॅशनल पेमेंट ऑफ कॉर्पोरेशनने ही सुविधा सुरू केली आहे.

विना इंटरनेट पैसे पाठवण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. त्यासाठी मोबाईलच्या डायलपॅडवरून ङ९९क्ष् हा कोड डायल करा.



थोड्याच वेळात तुमच्या स्क्रीनवर एक मेनू दिसेल.

पैसे पाठवण्यासाठी 'एाह् श्दहा' पर्याय निवडा. त्यानंतर समोरच्या व्यक्तीचा मोबाईल नंबर किंवा यूपीआय आयडी टाकण्यास सांगितले जाईल. त्याप्रमाणे कार्यवाही करा.या सुविधेचा वापर घेण्यापूर्वी तुमचा मोबाईल नंबर बँकेशी लिंक असणे अनिवार्य आहे.

# वजन करा झपाट्याने कमी

वजन कमी करणे हे वाटते तितके सोपे नाही. वजन कमी करण्यासाठी खूप संयम, शिस्त आणि नियंत्रण असावे लागते. वजन कमी करताना लोक सर्वात आधी आहारावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात जी सर्वात मोठी चूक आहे. आहारावर नियंत्रण ठेवण्याच्या नादात अनेकदा लोक उपाशी राहतात. हेल्थ तज्ज्ञांच्या मते, वजन कमी करण्यासाठी उपाशी राहणे गरजेचे नाही पण योग्य पोषण मिळेल याची काळजी घेणे आवश्यक आहे. योग्य पोषण म्हटलं की, सॅलडचा उल्लेख हा येतोच. सॅलडमध्ये कॅलरी अल्प प्रमाणात असतात आणि पोषक तत्व भरपूर प्रमाणात असतात जे शरीरात साचलेले फॅट वाढू देत नाही आणि शरीराला भरपूर पोषण देतात.

एम्सचे माजी सल्लागार आणइ साओल हार्ट सेंटरचे संस्थापक आणि डायरेक्टर, डॉ. विमल झाजर यांच्या मते, ४ असे सॅलड ज्यामध्ये कमी कॅलरी असतात जे पोट दिर्घकाळ भरलेले ठेवतात आणि फॅट्स नियंत्रण करतात आणि काही सॅलड शरीरात आवश्यक व्हिटॅमिन आणि मिनरल्स देतात आणि शरीराला आवश्यक पोषक तत्वांची गरज पूर्ण करू शकतो. तज्ज्ञांकडून जाणून घ्या की सॅलड सेवन करण्याची योग्य पद्धत काय आहे ज्यामुळे चयापचय सुधारेल आणि हट्टी चरबी कमी होण्यास मदत होईल.

**टोमॅटो, काकडी आणि गाजराचे सॅलड**

काकडी, टोमॅटो आणि गाजर सॅलड म्हणून खाल्यास दिर्घकाळापर्यंच पोट भरलेले राहते आणि भुकेवर नियंत्रण राहते.

कॅलरीचे प्रमाण कमी असते यात भरपूर फायबर असते. पाण्याने समृद्ध भाज्या शरीराला हायड्रेट करतात आणि पचन क्रिया दुरुस्त करतात.

हे सॅलड तयार करण्यासाठी गाजर, काकडी टोमॅटो कापून त्यात लिंबाचा रस आणि काळे मीठ टाकून रोज जेवणाच्या आधी १५-२० मिनिटे खा त्यामुळे पोट भरलेले

**राहील आणि जेवण कमी खाल्ले जाईल.**

अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन मध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, जे लोक कमी-कॅलरीयुक्त कच्च्या भाज्यांचे सेवन करतात, त्यांचे वजन तितक्याच प्रमाणात उच्च-कॅलरीयुक्त पदार्थांचे सेवन करणाऱ्यांपेक्षा अधिक वेगाने कमी होते. १०० ग्रॅम काकडीमध्ये अंदाजे ९५ज्ञ् पाणी असते आणि त्यात केवळ १५ कॅलरीज असतात.

टोमॅटो आणि गाजरामध्येही कॅलरीज अत्यंत कमी असतात. हे पदार्थ अतिरिक्त कॅलरीज न देता पोट भरल्याची भावना देतात. दररोज या सॅलडचे सेवन केल्याने



वजन प्रभावीपणे नियंत्रित करणे सोपे होते.स्प्राउट सॅलड हे प्रथिने आणि फायबरचा एक उत्कृष्ट स्रोत आहे. ते तुम्हाला दीर्घकाळ पोट भरल्यासारखे ठेवते आणि तुमची चयापचय क्रिया वाढवते. ते तयार करण्यासाठी, मोड आलेले मूग किंवा हरभरा, चिरलेला कांदा, टोमॅटो, लिंबाचा रस आणि ताजी कोथिंबीर एकत्र मिसळा. याचा आस्वाद नाश्त्याचा पर्याय म्हणून किंवा संध्याकाळच्या नाश्त्यामध्ये घेतला जाऊ शकतो. हा जंक फूडपेक्षा खूपच आरोग्यदायी पर्याय आहे.

'जर्नल ऑफ ॲग्रीकल्चरल अँड फूड केमिस्ट्री'नुसार, धान्य अंकुरित करण्याच्या प्रक्रियेमुळे त्यातील प्रथिनांचे प्रमाण आणि गुणवत्ता दोन्ही ने वाढते.

# दिसतात स्वच्छ, पण असतात 'धोकादायक'....

नवीन कपडे खरेदी केल्यानंतर ते लगेच घालून मिरवण्याचा आनंद काही वेगळाच असतो. मग ते आवडीचे आऊटफिट असोत किंवा एखाद्या खास कार्यक्रमासाठी घेतलेला ड्रेस, तो कधी एकदा घालतोय असं आपल्याला होतं. पण आपण एक महत्त्वाची गोष्ट विसरतो की, हे कपडे दिसतात तितके स्वच्छ नसतात. फॅक्टरीपासून ते दुकानापर्यंत हे कपडे अनेक प्रक्रियांतून आणि हातांतून जातात, ज्यामुळे त्यात रसायने आणि घाण असू शकते.


**नवीन कपडे धुवूनच का वापरावेत?**

कपडे तयार करताना त्यावर रंग, फिनिशिंग केमिकल्स आणि इतर प्रक्रिया केल्या जातात, जेणेकरून वाहतुकीदरम्यान किंवा डिस्प्लेमध्ये ते चांगले दिसावेत. हे केमिकल्स खरेदी केल्यानंतरही कपड्यांवर त तसेच राहतात. त्यामुळे पहिल्यांदा वापरण्यापूर्वी ते धुणे हा एक शहाणपणाचा निर्णय ठरतो.

याव्यतिरिक्त, कपडे अनेक ठिकाणांहून प्रवास करत दुकानात पोहोचतात. या काळात त्यावर धूळ, बॅक्टेरिया आणि इतर अशुद्धी जमा होऊ शकतात. दुकानातही अनेक लोक ते कपडे 'ट्राय' करून पाहतात, ज्यामुळे संसर्ग किंवा फंगस पसरण्याची शक्यता असते.

**केमिकल्सचा त्वचेवर परिणाम**

विविध अहवालांनुसार, कपड्यांना सुरकुत्या पडू नयेत यासाठी 'फॉर्मल्डिहाइड' सारख्या रसायनाचा वापर केला जातो. तसेच कपड्यांना कडकपणा आणि आकार देण्यासाठी 'स्टार्च' वापरले जाते. ही रसायने त्वचेला खाज, जळजळ किंवा ॲलर्जी निर्माण करू शकतात. विशेषतः संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांसाठी हे अधिक त्रासदायक ठरू शकते.



केवळ स्वच्छतेसाठीच नाही, तर कपड्यांच्या फिटिंगसाठीही ते धुणे फायद्याचे असते. फॅक्टरीमध्ये कपडे ताणून तयार केले जातात. पहिल्या धुण्यानंतर ते त्यांच्या नैसर्गिक आकारात येतात आणि अधिक आरामदायक वाटतात.

**तज्ज्ञ काय म्हणतात?**

ओहायो स्टेट युनिव्हर्सिटी वेक्सनर मेडिकल सेंटरच्या त्वचाविकारतज्ज्ञ डॉ. सुसान मॅसिक यांच्या मते, त्यांच्याकडे अनेकदा असे रुग्ण येतात ज्यांना नवीन कपडे घातल्यानंतर त्वचेवर रिॲक्शन येते. विशेषतः शरीराचे असे भाग जिथे घ षण जास्त होते म्हणजे काख, कंबर, मान आणि जांघेचा भाग. तिथे खाज आणि जळजळ होण्याची शक्यता अधिक असते.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

अपवाद: जॅकेट किंवा असे कपडे जे थेट त्वचेच्या संपर्कात येत नाहीत, ते न धुता घालता येतात.

ड्राय क्लीन: ज्या कपड्यांवर 'ओन्ली ड्राय क्लीन' अशी सूचना असेल, ते घरी धुवून खराब करू नका.

गडद रंग: गडद रंगाचे कपडे (उदा. डेनिम जीन्स) पहिल्यांदा धुताना रंग सोडू शकतात, जो तुमच्या त्वचेला किंवा इतर कपड्यांना लागू शकतो.

# लग्नानंतरची गोष्ट


पती-पत्नीच्या नात्यात एकमेकांना आहे तसं स्वीकारण्याची तयारी नसली की, ते नातं फारसं तग धरून राहू शकत नाही. थोडासा संयम बाळगत समंजस स्वीकारासाठी नात्याला वेळ देणं गरजेचं असतं. गौरेशचं आणि आरतीचं (नावे बदलली आहेत) लग्न होऊन वर्ष होत आलेलं. तरीही त्या दोघांमधली दरी कमी होत नव्हती. लग्नाच्या आधीपासूनच गौरेश तसंही हे नातं मान्य करत नव्हता आणि आरतीचीही काही वेगळी मनःस्थिती नव्हती, पण वडीलधा-यांचा मान राखत दोघंही नाखुशीनेच बोहल्यावर चढले होते.

गौरेश आणि आरती ही दोघंही सामान्य कुटुंबातली मुलं होती. गौरेशचं कुटुंब मुंबईमध्ये तर आरती ही दुर्गम अशा खेडय़ात राहणारी मुलगी होती. मुंबईत राहिल्यामुळे गौरेशच्या सहचारिणीबद्दलच्या कल्पना वेगळ्या होत्या. त्याला स्वतंत्र, शिक्षित आणि प्रगत विचारांची मुलगी हवी होती. मात्र आरतीला पाहिल्यावर, तिच्याशी बोलल्यावर त्याच्या स्वप्नांचा चुराडा झाला. एकतर दोघांमध्येही नऊ वर्षांचं अंतर होतं. या मुलीशी आपलं जुळेल का? ही चिंता त्याला सतावू लागली.

तिकडे आरतीची मनःस्थिती काही वेगळी नव्हती. आरती ही स्वप्नाळू, थोडी अल्लड होती. ती आता कुठे पौगंडावस्थेतून बाहेर येत होती. गौरेशला पाहिल्यावर तिचा हिरमोड झाला. दोघंही पहिल्या भेटीत अवघडलेलीच होती. दोघांना घरातल्यांनी रीतीभातीच्या नावाखाली एकमेकांशी स्वतंत्र बोलायला दिलं नाही. त्यामुळे साहजिकच दोघांचा म्हणावा तसा संवाद झालाच नाही. लग्नानंतर गौरेश लगेच कामावर जायला लागला. त्याला आरतीमध्ये तसाही इंटरेस्ट नव्हता. नव?याने थोडा वेळ द्यावा, लाड करावेत असं वाटणारी आरती या वागण्याने दुखावली होतीच.

'इतकी बालिश आणि बावळट मुलगी आहे की, मला तिच्याशी बोलायची इच्छाही होत नाही.'' समुपदेशन सत्राला आल्यानंतर गौरेश सांगत होता. 'फिरताना हात पकडा आणि सेल्फी काढा यात बालिशपणा तो काय?'' आरतीनेही आपली बाजू मांडली. 'तुला मॅनर्स नसतील तरी मला आहेत.'' आवाज चढवून जसा गौरेश बोलला तसं तिच्या डोळ्यांत पाणी तरळलं. 'म्हणून मी यायला तयार नव्हतो. काही लोक हे गावंढळच राहतात.'' गौरेश धुमसत म्हणाला. त्याचं बोलणं ऐकून आरती अजूनच रडायला लागली. 'मलाही इथे राहावंसं वाटत नाही. एकटं वाटतं. गावात मोकळेपणा होता.'' एवढं बोलून तिने मनातला सल उलगडली आणि खरंही होतं ते. मुंबईत तिचा वेळ जात नव्हता. सगळी घरातली कामं सासूबाईंच्या मदतीने ती उरकून टाकायची आणि नंतर तिच्याकडे करण्यासारखं काहीही नसायचं. गौरेशचं तिच्याशी कमी बोलणं, अवास्तव अपेक्षा करणं, नवीन जागा, नवीन नाती आणि कमी वयात आलेली जबाबदारी या सगळ्या गोष्टी आरतीला झेपल्या नाहीत. सरतेशेवटी विसंवाद वाढला आणि दोघांनी घटस्फोटाचा निर्णय घेतला.

'हा निर्णय तुम्ही घेतलाय तर आता समुपदेशनाची गरज काय?'' असं दोघांना विचारताच दोघंही शांत बसले. मग गौरेशने सुरुवात केली, 'आम्ही घाई करतोय असं मला वाटलं आणि'' आरतीलाही हाच प्रश्न विचारताच तिनेही राजीखुशीने हा निर्णय घेतला नसल्याचं सांगितलं, पण पुढे ती असंही म्हणाली की, 'जर या नात्यात एकजण खुश नसेल तर नातं टिकवण्यात अर्थ नाही.'' या वेळी मात्र गौरेशने चमकून तिच्याकडे पाहिलं. आरती समंजसपणे बोलतेय यावर त्याचा विश्वास नव्हता.



आरतीने त्याच्याकडे न बघता तिची बाजू मांडायला सुरुवात केली. 'मॅम, मला मी व्यवस्थित माहीत आहे. थोडी बालिश आहे मी, पण कायम तशी राहणार नाही हेही मला माहीत आहे. माझ्या मैत्रिणींची लग्नाची गोष्ट ऐकून मी माझ्याही नव?याबद्दल काही कल्पना केल्या. जेव्हा वयाचा प्रश्न आला तेव्हाही मी मनाला समजावलं, पण हे स्वतचाच हेका घेऊन बसले आहेत. आज मला सासू-सास?यांसारखी सांभाळणारी माणसं आहेत. मी का राजीखुशी घटस्फोट घेऊ? मला पुढे शिकायचंय, पण यांना माझी लाज वाटते हे कळल्यावर माझंही मन उडालंय.'' आरती हे सर्व प्रांजळपणे बोलत होती.

'हे तुझे विचार आहेत?'' गौरेशने मध्येच विचारलं. 'हो.'' म्हणत आरतीने दुसरीकडे पाहिलं आणि ती शांत बसली. गौरेश मग बोलता झालाष्ठ.'तुझी ही बाजू आज कळतेय.'' 'मग तुझा फेरविचार काही आहे का?'' असं त्याला विचारताच त्याने किंचित होकारार्थी मान हलवली.

वैवाहिक समुपदेशनामध्ये गौरेश-आरतीसारख्या जोडप्यांना समुपदेशन करताना एक गोष्ट सतत जाणवते की, पतीपत्नीच्या नात्यामध्ये मनमोकळा संवाद कमी झालेला आढळतो.

शिवाय स्वप्नरंजनाची सवय ही नात्याला घातक ठरते. गृहीत धरलेल्या अवास्तव अपेक्षांमुळे इतर समवयस्क जोडप्यांशी तुलना केली जाते आणि हीच तुलना आणि जोडीदाराबद्दल बाळगलेली अपेक्षा संसार फुलण्याआधीच मोडून टाकते. त्यातही जोपासलेला 'स्व' अधिक घातक. 'मी झुकणार नाही, मला कोणाची गरज नाही.'' अशा प्रकारचे स्वप्रेरित संवाद पतीपत्नीच्या नात्याला मारक ठरतात.

गौरेशला सत्रामध्ये जाणवलं की, जितका त्याने आरतीबद्दल गैरसमज करून घेतला होता तितकी ती उथळ नाही. तिला समजून घेण्यासाठी 'क्वालिटी टाईम' काढणं गरजेचं होतं. त्यामुळे सत्रांमधील समुपदेशनाच्या आधारे गौरेशने आरतीविषयीचा दूषित पूर्वग्रह सोडला. आरतीनेसुद्धा तिच्यामध्ये अजून काही बदल केले. ती स्वतकडे, स्वतच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यायला लागली. त्या दोघांचं नातं बहरत होतं याचा प्रत्यय लवकरच आला जेव्हा गौरेशच्या डीपीमध्ये आरतीही दिसायला लागली.

आरतीने तेव्हा समाधानाने सांगितलं की, गौरेश आता स्वत पुढाकार घेऊन नात्यासाठी प्रयत्न करू लागला आहे. आता दोघेही जेव्हा येतात तेव्हा त्या दोघांच्याही नजरेत एकमेकांबद्दल आपुलकी आणि प्रेम असतं.


गौरेशने कबूल केलं की, नातं टिकवण्यासाठी जोडीदाराला आहे तसं स्वीकारलं की, नातं आपोआप बहरतं.

# शिल्पसमृद्ध पितळखोरा

**डॉ. मंजिरी भालेराव**

छत्रपती संभाजीनगर मधील पितळखोरा स्थळाचे सौंदर्य आणि महत्त्व वृद्धिंगत होते ते येथील शिल्पवैभवाने. गौतम बुद्धाच्या आयुष्यातील प्रसंग दाखवणारी, मानव, प्राणी आणि पक्षी यांचे मिश्रण असलेली स्फिन्क्ससारखी शिल्पं, भारवाहक यक्ष, द्वारपाल रक्षक यक्ष अशा शिल्पांनी ही लेणी समृद्ध आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील कन्नड तालुक्यातील डोंगररांगांमधून वाहणारे धबधबे आणि दरीत दडलेला एक अलौकिक प्राचीन खजिना म्हणजे पितळखोरा. आतापर्यंतच्या भागात आपण येथील शैलगृह आणि अनुषंगिक शिल्प, स्थापत्य आणि जलव्यवस्थापनाची माहिती पाहिली; पण पितळखोरा परिसरातील सफाईकामात अनेक सुटी शिल्पेही मिळाली होती. त्यातील काही गौतम बुद्धाच्या आयुष्यातील प्रसंग दाखवणारी होती, तर काही भारवाहक आणि रक्षक यक्षांची होती.

गौतम बुद्धाचे महाअभिनिक्रमण सूचित करणारे अश्व आणि त्याचा छत्र धरलेला सेवक छंद यांचे रात्रीची सूचना देण्यासाठी मशाल घेऊन जातानाचे शिल्प, राजवाडय़ातील वाटाव्यात अशा व्यक्तींची काही शिल्पं या सफाई कामानंतर उजेडात आली. याशिवाय येथील उल्लेखनीय शिल्पांमध्ये विहाराच्या दरवाजाजवळचे मानव, प्राणी आणि पक्षी यांचे मिश्रण असलेली स्फिन्क्ससारखी शिल्पं यांचा समावेश होतो. चैत्यगृहात जाण्यासाठी ज्या पाय-या तयार केलेल्या आहेत त्याच्या दोन्ही बाजूंना दोन बुटके स्थूल यक्ष आणि त्यांच्या मागे एक पंख असलेला घोडा हे कोरलेले आहेत. या यक्षांनी आपल्या दोन्ही हातांनी जणू काही सगळा भार तोलला आहे, असा त्यांच्या उभे राहायच्या पद्धतीवरून आणि चेह-यावरच्या भावांवरून आभास होतो. त्यांच्याबरोबरचा पंख असलेला घोडा म्हणजे ग्रीक पुराणकथांमधील पेगासस असावा असे वाटते. या यक्षांचे कान हे पक्ष्यांच्या पंखांसारखे आहेत. अशी चमत्कृतीपूर्ण शिल्पं कोरून जणू काही अतिमानवी शक्तीच याचे रक्षण करत आहेत असे इथे सुचवले आहे. इथे मिळालेल्या अद्भुत शिल्पांमध्ये अजून दोन महत्त्वाच्या शिल्पांचा समावेश करावा लागतो. त्यापैकी एक



म्हणजे भारवाहक यक्ष आणि दुसरा म्हणजे द्वारपाल रक्षक यक्ष. भारवाहक यक्ष हा स्थूल, बुटका आणि डोक्यावर एक उथळ पात्र घेतलेला आहे. त्याचे पाय गुडघ्यापासून खाली तुटले आहेत; पण या शिल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, त्याच्या हातावर एक कोरीव लेख आहे. 'कन्हदासेनहिरणकारेनकता' म्हणजे कन्हदास (कृष्णदास) या हिरण्यकार (सोनार) याने केले आहे (दान दिले आहे). अशा प्रकारचा कोरीव लेख यक्षमूर्तींवर क्वचितच सापडतो. त्यामुळे या यक्षाचे तत्कालीन समाजात बरेच महत्त्व असणार, असे मत म.न. देशपांडे यांनी मांडले.

या सर्व शिल्पांच्या उजेडात येण्याच्या बातम्या वर्तमानपत्रात जेव्हा आल्या होत्या तेव्हा सुप्रसिद्ध कलातज्ज्ञ प्रमोद चंद्र यांनी देशपांडे यांचे इ.स.सहाव्या शतकातील बौद्ध ग्रंथ 'महामायूरी' ग्रंथातील एका उल्लेखाकडे लक्ष वेधले. या ग्रंथामध्ये काही रक्षक कवच मंत्र दिले आहेत. प्राचीन काळी भिक्षूंना धर्मप्रसारासाठी पायी पायी फिरावे लागे. तेव्हा सर्पदंशाची भीती असे. जर साप चावला तर त्यांनी महामायूरी या देवतेचे आवाहन करून या ग्रंथातील मंत्र म्हणायचे, त्याचबरोबर ते ज्या गावात असतील त्या गावातील रक्षक यक्षांना आवाहन करून सर्पदंशाची बाधा होऊ नये अशी त्यांची प्रार्थना करायची. त्यासाठी भारतातील महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांची आणि तेथील रक्षक यक्षांची यादी 'महामायूरी' या ग्रंथामध्ये दिली आहे. त्यामध्ये 'पितंगल्य' येथील रक्षक यक्ष 'संकारीन' नावाचा होता असा उल्लेख आहे. 'पितंगल्य' म्हणजे पितळखोरा आणि तिथे सापडलेला, हातावर कोरीव लेख असलेल्या यक्ष म्हणजे 'संकारीन', असा निष्कर्ष देशपांडे यांनी काढला. त्यावरून पुढे १९६१मध्ये भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याला जेव्हा १०० वर्षे पूर्ण झाली तेव्हा या यक्षाचे चित्र देऊन टपाल तिकीटही काढले गेले.

यानंतर पुरातत्त्वज्ञ डॉ. म.माटे यांनी प्राचीन भारतीय कलेत दिसणारा भारवाहक यक्ष आणि त्याचे सेवक किंवा तत्सम असे खालच्या दर्जाचे स्थान असल्याचे पुरावे देऊन हे शिल्प 'संकारीन' याचे नसावे असे प्रतिपादन केले. त्यांनी दाखवून दिले की, 'महामायूरी' या ग्रंथात विविध व्यापारी केंद्रांच्या रक्षक यक्षांची यादी जरी दिली असली तरी त्यांची त्या ठिकाणी मंदिरे होती की त्यांच्या मूर्ती होत्या की त्यांची अमूर्त रूपात पूजा केली जात असे याबद्दल काही स्पष्ट निर्देश नसल्यामुळे, त्याची मूर्ती करून त्याची पूजा केली जात असावी अशीही शक्यता नसल्याचे नमूद केले.

पितळखोरा येथील चैत्य गृहाच्या आणि विहाराच्या समोरच्या साफसफाईत अजून एक मोठे शिल्प सापडले. चैत्यगृहाच्या दरवाजाशेजारी हे शिल्प असावे असे या अहवालात नमूद केले आहे. या शिल्पाचेही गुडघ्यापासून खाली पाय तुटले आहेत. पण जर ते जोडले तर जवळ जवळ ७ फुटांपेक्षा जास्त उंचीचे हे शिल्प होते असे लक्षात येते. त्याच्या हातात त्याने बहुतेक तलवारीसारखे शस्त्र धरले असावे, जे आज तुटले आहे. कमरेला एक सुरा पण खोचलेला दिसतो. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, याचेही कान पक्ष्यांच्या पंखांसारखे आहेत आणि त्याने कानात सर्पकुंडले घातली आहेत. यावरून जशी पक्ष्यांना इतरांपेक्षा आधीच संकटाची जाणीव होते तशीच यालाही होते, असे कदाचित यामधून कलाकाराला सुचवायचे असेल. तसेच जे जनावर जंगली, विषबाधा करू शकणारे आहे, म्हणून त्यापासून लोक लांब पळतात, ते जनावर हा यक्ष कानात दागिन्यांसारखा सहज घालतो आहे. म्हणजे त्याला सर्प काहीही करू शकत नाहीत हेच यातून सुचवायचे आहे. कदाचित 'महामायूरी' मधला सर्पदंश निष्प्रभ करणारा यक्ष म्हणजे 'संकारीन' हाच तर नाही ना, असाही प्रश्न आपल्याला पडून जातो. पक्ष्यांच्या पंखासारखे कान हे पाश्चिमात्य पुराणकथांमध्ये दिसणा?या एल्फ किंवा पिक्सी यांच्या कानासारखे आहेत. तत्कालीन युरोपीय कथांमध्ये यासंबंधीच्या कथा होत्या की नाही हे माहीत नाही, पण इथे असलेल्या अद्भुत शिल्पांमध्ये परकीय प्रभावाची काही शिल्पे असल्यामुळे कदाचित हाही परकीय प्रभाव असू शकेल. यवनांच्या निवासासाठी प्रसिद्ध असलेल्या धेनुकाकट या गावातील एका व्यक्तीचा दानलेख इथे मिळाला आहे हेसुद्धा नोंद घेण्यासारखे आहे.

# युद्ध

**सुमंत पांडे**

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धाने आता धोकादायक वळण घेतले आहे. इराणने बहरीनमधील पाणी प्रकल्पावर हल्ला केला, तर अमेरिकेने इराणमधील पाणी प्रकल्पाला लक्ष्य केले. या घटनांमुळे पाणी हे केवळ नैसर्गिक संसाधन नसून राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक स्थिरतेचा कणा बनले आहे, हे स्पष्ट झाले आहे. पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षात पाणीपुरवठा व्यवस्था आणि समुद्राचे पाणी गोड करणारे प्रकल्प हे युद्धाचे नवे लक्ष्य बनले आहेत. या हल्ल्यांमुळे लाखो लोकांच्या पिण्याच्या पाण्यावर थेट परिणाम होण्याची भीती आहे. इराणसारख्या देशात, जिथे नैसर्गिक गोड्या पाण्याचे स्रोत मर्यादित आहेत, तिथे समुद्राचे पाणी गोड करणारे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे आहेत. या प्रकल्पांवर होणारे हल्ले मानवी संकटांना आमंत्रण देऊ शकतात. इस्त्रायलने मात्र मर्यादित जलस्रोतांवर तंत्रज्ञान, नियोजन आणि सामाजिक सहभागातून प्रभावी जलव्यवस्थापन उभारले आहे, जे भारतासारख्या पाणीटंचाई असलेल्या देशांसाठी एक आदर्श ठरू शकते.

पश्चिम आशियातील सध्याची परिस्थिती एक महत्त्वाचा धडा शिकवते. पाणी ही केवळ निसर्गाची देणगी नाही, तर भविष्यातील संघर्षांमध्ये ती एक सामरिक शक्ती बनली आहे. पूर्वी युद्धात लष्करी तळ, तेलसाठे किंवा ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य केले जायचे. पण आता पाणीपुरवठा व्यवस्था आणि समुद्राचे पाणी गोड करणारे प्रकल्पही संभाव्य लक्ष्य बनले आहेत. इराणमधील घडामोडींनी हे स्पष्ट केले आहे की भविष्यातील युद्धांमध्ये पाणी हा राष्ट्रीय सुरक्षेचा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

मध्यपूर्वेतील अनेक देशांमध्ये नैसर्गिक गोड्या पाण्याचे स्रोत खूपच कमी आहेत. त्यामुळे बहुतेक देश पिण्याच्या पाण्यासाठी समुद्राचे पाणी गोड करणाऱ्या प्रकल्पांवर अवलंबून आहेत. कुवेतमध्ये सुमारे ९० टक्के लोकसंख्या या प्रकल्पांवर अवलंबून आहे, ओमानमध्ये ८६ टक्के आणि सौदी अरेबियामध्ये सुमारे ७० टक्के लोकसंख्या या प्रकल्पांवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत या प्रकल्पांवर होणारे हल्ले लाखो लोकांच्या जीवनावर थेट परिणाम करू शकतात. उदाहरणार्थ, बहरीनमध्ये दररोज सुमारे ६७ कोटी घनमीटर पाणी गोड करून वापरले जाते आणि या प्रकल्पावर सुमारे १६ लाख लोकसंख्या अवलंबून आहे.

अलीकडील घटनांमध्ये, इराणने बहरीनमधील एका गोडीकरण प्रकल्पावर ड्रोन हल्ला केल्याचे वृत्त आहे. दुसरीकडे, इराणचा दावा आहे की अमेरिकेच्या हल्ल्यामुळे केश्म बेटावरील एका गोडीकरण प्रकल्पाचे नुकसान झाले, ज्यामुळे सुमारे ३० गावांचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला. या घटनांनी हे स्पष्ट केले आहे की युद्धात पाणीपुरवठा व्यवस्था हे लक्ष्य बनत आहे. या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ले होऊ लागल्यामुळे हा संघर्ष आता केवळ ऊर्जा किंवा लष्करी सुविधांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो त्या प्रदेशातील लोकांच्या मूलभूत पाण्याच्या उपलब्धतेलाच धोका निर्माण करू लागला आहे. गोडीकरण प्रकल्प सहसा समुद्रकि नाऱ्यावर आणि मर्यादित ठिकाणी उभारलेले असल्यामुळे, ते क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ल्यांसाठी तुलनेने असुरक्षित असतात. एखादा मोठा प्रकल्प बंद पडल्यास संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो. यामुळे मोठ्या प्रमाणावर मानवी संकट निर्माण होण्याची भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.या संघर्षात तेलसाठे, ऊर्जा प्रकल्प आणि पाइपलाइन यांच्यावरही हल्ले झाले आहेत. काही ठिकाणी तेलसाठ्यांना लागलेल्या आगीमुळे पर्यावरणीय प्रदूषणाचा धोका वाढला आहे. विषारी रसायने माती आणि भूजलामध्ये मिसळल्यास भविष्यातील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर त्याचा दीर्घकालीन परिणाम होतो. पाण्याची कमतरता, हवामान बदल आणि वाढती लोकसंख्या यामुळे आधीच जलसंकट गंभीर होत असताना, युद्धामुळे या संकटाची तीव्रता अधिक वाढू शकते.

इराणचे हवामान भौगोलिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण आहे. देशाचा मोठा भाग उच्च पठारी आणि अर्धवाळवंटी प्रदेशात येतो. बहुतेक पाऊस डिसेंबर ते मार्च या हिवाळी कालावधीत पडतो. इराणमध्ये सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे २०० ते २५० मिमी इतके आहे. इराणमधील प्रमुख नद्यांमध्ये कारून, कर्केह, देझ, सेफीदरूद, झायांदेह रूद आणि अत्रक या आहेत. यापैकी अनेक नद्यांवर मोठी धरणे बांधण्यात आली आहेत. मात्र, अलीकडील वर्षांमध्ये दुष्काळ, भूजलाचा अतिवापर आणि हवामान बदल यामुळे काही नद्यांचे प्रवाह कमी झाले आहेत. या उलट इस्त्रायलमध्ये परिस्थिती अनेक पटीने सुसह्य आहे असे दिसते.

पश्चिम आशियातील जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर इस्त्रायलने उभारलेली राष्ट्रीय जलजाळ्याची व्यवस्था जगभरात अभ्यासाचा विषय ठरली आहे. ही व्यवस्था एखाद्या वीज वितरण जाळ्यासारखी कार्य करते, परंतु त्यामध्ये विजेऐवजी पाण्याचे वितरण केले जाते. देशातील विविध पाणीस्रोत - समुद्राच्या पाण्याचे गोडीकरण प्रकल्प, जलाशय, भूजलस्रोत आणि प्रमुख शहरे - हे सर्व मोठ्या पाइपलाइन, पंपिंग स्टेशन आणि जलसाठ्यांच्या माध्यमातून एकमेकांशी जोडलेले आहेत. या व्यवस्थेचे मूलभूत तत्त्व असे आहे, की ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे तेथून देशातील कोणत्याही भागात आवश्यकतेनुसार पोहोचवता येते. इस्त्रायलमध्ये पाऊस प्रामुख्याने उत्तर भागात पडतो, तर लोकसंख्या आणि शेती मध्य व दक्षिण भागात अधिक असल्यामुळे अशा राष्ट्रीय जाळ्याची आवश्यकता निर्माण झाली. इस्त्रायलमध्ये पिण्याच्या पाण्यापैकी सुमारे ५० ते ७० टक्के पाणी समुद्राच्या पाण्याच्या गोडीकरणातून मिळते. सोरेक, हदेरा, अश्केलॉन, पाल्माखीम आणि अश्दोद हे प्रमुख गोडीकरण प्रकल्प देशाच्या पाणीपुरवठ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

इस्त्रायलमध्ये प्रामुख्याने भूमध्यसागरी हवामान आढळते. येथे दोन मुख्य ऋतू मानले जातात - थंड आणि ओला हिवाळा, उष्ण व कोरडा उन्हाळा. साधारणपणे नोव्हेंबर ते मार्च या कालावधीत पाऊस पडतो, तर एप्रिल ते ऑक्टोबर या सहा महिन्यांच्या कालावधीत जवळजवळ पाऊस होत नाही. उत्तर इस्त्रायलमध्ये सरासरी ५०० ते ८०० मिमी पाऊस पडतो, तर दक्षिणेकडील नेगेव वाळवंटी भागात १०० मिमीपेक्षा कमी पर्जन्य होतो. त्यामुळे मर्यादित जलस्रोतांवर प्रभावी व्यवस्थापन करणे इस्त्रायलसाठी अत्यावश्यक ठरले. इस्त्रायलमध्ये पाण्याचे दर इस्त्रायल वॉटर ऑथॉरिटी निश्चित करते. घरगुती वापरासाठी साधारणपणे आवश्यक वापरासाठी सुमारे २०० रुपये प्रति १००० लीटर आणि अधिक वापरासाठी ३६० ते ३८० रुपये प्रति १००० लीटर इतका दर आकारला जातो. इस्त्रायलमध्ये पाणी तुलनेने महाग असले, तरी तेथील नागरिकांनी हे स्वीकारले आहे. पाण्याला राष्ट्रीय संपत्ती मानण्याची सामाजिक जाणीव, प्रत्येक घरात डिजिटल वॉटर मीटर, सांडपाण्याचा मोठ्या प्रमाणावर पुनर्वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वर्षभर; परंतु सातत्यपूर्ण पाणीपुरवठा हे त्याचे कारण होय.






# मराठीचा टक्का का घसरला?

मराठी माध्यमातून परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारां मध्ये इंग्रजी विषयी असलेला न्यूनगंड, प्रयत्नांची गुणवत्ता आणि लेखन-वाचन कौशल्याचा अभाव याकडे झालेले दुर्लक्ष यंदाच्या 'यूपीएससी'च्या निकालत अधोरेखित होते. करोनानंतर ऑनलाइन मंचांवर विसंबून राहण्याची वृत्ती वाढली. लिखाणाची जागा टायपिंगने घेतली. एकाच छताखाली नोट्स, मेंटरशिप आणि चाचणी परीक्षा मुबलक प्रमाणात मिळू लागल्या. यात इंग्रजी आणि हिंदीचा पर्याय सहज उपलब्ध होणारा. अशाच प्रकारची बाजारपेठ मराठी उमेदवारांसाठीही उदयाला येत आहे. एका बाजूला साधन-साहित्याची उपलब्धता वाढते आहे. विद्यार्थ्यांना सर्व काही आयते हवे आहे. एक वेळ तेही उपलब्ध करून दिले जाते. मात्र, दृष्टिकोन विकत घेता येत नाही, हे कोण सांगणार? विद्यार्थ्यांमधील कष्ट करण्याची तयारी, जिद्द, आत्मविश्वास कमी होत चालल्याचे निरीक्षण या क्षेत्रातील जाणकार नोंदवतात. घरगुती व्यवहार ते प्राथमिक शिक्षणापासून मराठीची होत असलेली दैना 'यूपीएससी'च्या परीक्षेतही प्रतिबिंबित होत आहे.

**हे चित्र बदलण्यासाठी पर्याय काय?**

'यूपीएससी'ला लिखाणाची परीक्षा म्हटले जाते. त्यात कमी वेळेत आणि कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय सांगण्याचे कसब कामी येते. ऐन वेळी आलेल्या अडचणींकडे बघण्याचा दृष्टिकोन निकालातही दिसतो. इंग्रजीतून 'की-वर्ड्स' आणि जास्तीत जास्त मुद्दे लिहिता येतात, असा एक कल आहे. मात्र, अधिकारी म्हणून काम करण्यासाठी प्रत्यक्ष आयुष्यातील आणि व्यवस्थेतील आव्हाने समजून त्यावर मार्ग काढण्याची दृष्टी असलेले निवडले जातात. सोप्या भाषेत आपले मुद्दे पटवून, स्थानिक संदर्भ देण्याची पद्धत उत्तरांना समृद्ध करते. त्यामुळे आपला सगळा सांस्कृतिक-भाषिक व्यवहार समृद्ध होणे, नव्या बदलांना सामावून घेऊन वाचन-लिखाणासारखी मूलभूत कौशल्ये मरू न देणे, हाच अशा प्रश्नांवरचा तोडगा.

नाही तर, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, असे केवळ उत्तरात लिहिण्यापुरतेच मर्यादित राहील.